


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय


✦ अमरावती, शुक्रवार १७ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





# 'प्रत्येक व्यक्तीचा जीव अनमोल'

## वांगचुक यांच्या प्रकृतीवर दिल्ली उच्च न्यायालयाकडून चिंता व्यक्त



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्ली उच्च न्यायालयाने हवामान कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या सुरक्षिततेे आणि आरोग्यासंदर्भात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी घेतली. वांगचुक गेल्या १९ दिवसांपासून जंतर मंतर येथे उपोषणावर आहेत. सुनावणीदरम्यान, सालिसिटर जनरल यांनी केंद्र सरकारच्या वतीने न्यायालयात हजर राहून माहिती दिली की, या प्रकरणी बुधवारी नोटीस बजावण्यात आली आहे.

न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, सरकारी डाक्टरांकडून त्यांची नियमित तपासणी केली जावी आणि डाक्टरांच्या अहवालाच्या आधारे तातडीने कारवाई केली जावी, कारण प्रत्येक मानवी जीवन मौल्यवान आहे.सुनावणीदरम्यान, न्यायालयाने सर्वप्रथम विचारले की सोनम वांगचुक यांच्या आरोग्य तपासणीसाठी कोणती निश्चित प्रणाली आहे का. सालिसिटर जनरल यांनी उत्तर दिले की, त्यांची दररोज तपासणी केली जाते आणि त्यांना व त्यांच्यासोबत असलेल्यांना आरोग्यासंबंधी सर्व आवश्यक माहिती दिली जाते. त्यांनी स्पष्ट केले की, जेव्हा जेव्हा वांगचुक यांनी परवानगी दिली, तेव्हा सरकारी डाक्टरांनी आणि खाजगी डाक्टरांनीही त्यांना भेट दिली.यानंतर, उच्च न्यायालयाने सांगितले की, सोनम वांगचुक यांची वैद्यकीय तपासणी सरकारी डाक्टरांकडून व्हावी आणि आवश्यक असल्यास, डाक्टरांच्या अहवालाच्या आधारे तात्काळ हस्तक्षेप केला जावा. न्यायालयाने म्हटले की, प्रत्येक नागरिकाचे जीवन मौल्यवान आहे आणि ते वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत.सीलिसिटर जनरल यांनी याला सहमती दर्शवली आणि सांगितले की, प्रत्येक नागरिकाचे जीवन मौल्यवान आहे. त्यांनी न्यायालयाला आश्वासन दिले की, डाक्टरांच्या सल्ल्यानुसार कोणतीही आवश्यक मदत पुरवली जाईल. न्यायालयाने सांगितले की, सोनम वांगचुक यांच्या ढासळत्या प्रकृतीबद्दलच्या चिंतेतून ही याचिका दाखल करण्यात आली आहे. सॉलिसिटर जनरल यांनी न्यायालयाला माहिती दिली की, सरकारी डॉक्टर आणि या क्षेत्रातील तज्ज्ञ त्यांच्या आरोग्यावर सतत लक्ष ठेवतील. त्यांनी असेही आश्वासन दिले की, डाक्टरांच्या सल्ल्यानुसार सर्व आवश्यक पावले उचलली जातील. न्यायालयाने सरकारच्या भूमिकेचे कौतुक केले आणि सांगितले की, डाक्टरांच्या सल्ल्यानुसार आवश्यक हस्तक्षेप केला जाईल.

# प्रकाश आंबेडकरांनी घेतली वांगचुक यांची भेट

## राहुल गांधींना करून दिली कर्तव्याची आठवण

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** 'नीट' परीक्षेतील कथित दिल्लीतील गैरव्यवहारांविरोधात जंतरमंतर येथे आमरण उपोषणाला बसलेले प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा १९वा दिवस असून, त्यांची प्रकृती चिंताजनक बनली आहे. या उपोषण आंदोलनाची दखल दिल्ली उच्च न्यायालयानेही घेतली आहे. देशभरातून सोनम वांगचुक यांना मिळणारे समर्थन वाढत आहे. यातच आता वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी दिल्ली गाठली आणि सोनम वांगचुक यांची भेट घेत पाठिंबा दर्शवला. यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी राहुल गांधी यांना कर्तव्याची आठवण करून दिली आहे. प्रकाश आंबेडकर यांनी एक्सवर एक पोस्ट



केली आहे. यात ते म्हणतात की, सोनम वांगचूक यांचा आज उपोषणाचा १९ वा दिवस आहे. दिल्लीत जाउन त्यांची भेट घेतली आणि समर्थन दिले. भाजपाने त्यांच्याशी तातडीने संवाद सुरू केला पाहिजे. संवाद साधण्याची सरकारची कोणतीही सदिच्छा दिसत नाही. संवाद साधणे ही एक घटनात्मक जबाबदारी आणि नैतिक कर्तव्य आहे, असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

**आपल्या लोकशाहीसमोर गंभीर प्रश्न निर्माण होतात-** नवोपक्रमशील व्यक्ती, शिक्षण क्षेत्रातील सुधारक आणि हवामान बदलविषयक कार्यकर्ते म्हणून देश-विदेशात अनेक सन्मान प्राप्त केलेल्या व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेण्यासही सरकार नकार देत आहे, असे आपण समजायचे का? अशा (पान २ वर)

# दोन्ही ठाकरेंचा वांगचुक यांना पाठिंबा

**मुंबई / प्रतिनिधी-**देशभरातील तरुणांच्या प्रश्नांसाठी लढणा-या सोनम वांगचुक आणि अभिजित दिपके यांना उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने, तसेच मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पाठिंबा दिला आहे. दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि निष्ठूर भाजप सरकारला जाब विचारण्यासाठी येत्या १९ जुलैला शिवाजी पार्क मैदानावर एकत्र येण्याचे आवाहन उद्धव ठाकरे गटाने केले आहे. नीट आणि इतर स्पर्धा परीक्षांमधील घोटाळ्यांची व पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्वरित राजीनामा द्यावा, या मागणीसह तरुणांच्या विविध मागण्यांसाठी प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांनी दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. गेल्या १८ दिवसांपासून त्यांचे उपोषण सुरू असून त्यांची प्रकृतीही



खालावली आहे. केंद्र सरकारने मात्र अजूनही या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेतलेली नाही. त्यामुळे (पान २ वर)

# एमपीएससीच्या ऑनलाईन परीक्षांचा निर्णय २०२७ पर्यत लांबणीवर; मुख्यमंत्री

**मुंबई /प्रतिनिधी-**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पद्धतीत संगणकआधारित प्रणाली लागू करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक महत्त्वाची बैठक घेउन हा निर्णय तूर्तास ऑगस्ट २०२७ पर्यंत पुढे ढकलण्याचा सल्ला एमपीएससीला दिला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने गट-अ, गट-ब आणि गट-क पदभरतीच्या पूर्व परीक्षा संगणकआधारित पद्धतीने घेण्याच्या निर्णयाला विद्यार्थ्यांनी विरोध केला आहे. देशातील बहुतांश राज्यांच्या नागरी सेवा परीक्षा तसेच केंद्रीय लोकसेवा आयोग यांची परीक्षा अजूनही ऑफलाईन पद्धतीनेच घेतली जाते. मग महाराष्ट्र लोकसेवा आयोगच सीबीटी पद्धतीचा आग्रह का धरत आहे, असा प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केला आहे.



विविध विद्यार्थी संघटनांकडून सातत्याने होत असलेल्या मागण्यांची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत एक उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीला एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार, राज्याचे मुख्य सचिव आणि सामान्य प्रशासन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सातत्याने विविध विद्यार्थी संघटनांकडून होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार तसेच राज्याचे मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासमवेत एक बैठक मुंबई येथे घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एक सुरक्षित, पारदर्शी निवड प्रक्रिया हा कायमच माझा आग्रह राहिला आहे. त्यादृष्टीने परीक्षापद्धती सुद्धा पारदर्शीच असली पाहिजे. परीक्षा वेळेत (पान २ वर)

# पावसाअभावी खरीप पिके संकटात

**मुंबइ/प्रतिनिधी-**राज्यात पावसाअभावी खरीप पिके संकटात सापडली आहे. तर अनेक शेतक-यांवर पाउस नसल्याने दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले आहे. विदर्भ, मराठवाड्यातील काही भागात कमी पाउस झाला. राज्यातील अनेक भागांत खरीपाची पेरणी जवळपास ७० टक्के झाली आहे. अजून ३० टक्के पेरणी राहिली आहे. त्यामुळे राज्यातील उर्वरित भागात पाउस कधी कोसळणार, याकडे शेतक-यांचे डोळे लागले आहेत.



राज्यातील विविध जिल्ह्यांवर एल निनोच्या परिणामाचे संकट घोंगावू लागले आहे. त्याचवेळी बदलते हवामान, पावसातील अनियमितता आणि शेतीवरी संभाव्य परिणामाच्या शक्यतेमुळे शेतक-यांची चिंता वाढली आहे. एल निनोच्या प्रभावामुळे पिकांचे नुकसान, पेरणी परिणाम आणि उत्पादन घटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे राज्यातील उर्वरित भागात पाउस कधी कोसळणार, याकडे शेतक--यांचे डोळे लागले आहेत. परंतु उर्वरित महाराष्ट्रात म्हणजे मराठवाडा, विदर्भात जुलै अखेरीस पावसाची शक्यता व्यक्त केली जात आहे.राज्यातील शेतक-यांच्या परिस्थितीवर कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी महत्त्वाचे भाष्य केले आहे. दत्ता भरणे म्हणाले, ही गोष्ट खरी आहे की, राज्यातील काही भागात जोरदार पाउस झाला. तर काही भागात कमी पाउस झाला. ज्या ठिकाणी पाउस झाल्याने तिथे वाफसा नाही. काही ठिकाणी जमीन ओली नसल्याने पेरणी करण्यात आलेली नाही. पाउस नसल्याने पेरणी उगवलेली नाही. साधारणपणे ३० टक्के पेरणी राहिली आहे. शासनाचे जे उद्दिष्ट असून ते जुलै अखेर होईल.शेवटी हवामान विभागाच्या सांगण्यांनुसार, महाराष्ट्रावर एल निनोचं संकट आहे. शेवटी निश्चितपणे आपल्याला सामोरे जावे लागेल. अजूनही हवामान विभागाचा अंदाज आहे की, एक जुलै अखेरपर्यंत विदर्भझ्र मराठवाडा म्हणजे ज्या भागात पाउस झाला नाही, त्या भागात पाउस पडेल, अशी माहिती मंत्री भरणे यांनी दिली.

**अमरावतीत सर्वाधिक पेरणी**

राज्यात सर्वाधिक पेरणी ही अमरावतीत ८६ ते ९० टक्के झाली आहे. सर्वात कमी पेरणी ही ठाणे विभागात झाली आहे. पाउस पडावा हीच अपेक्षा आहे. कोकण विभागात सर्वाधिक पाउस पडला आहे. तर नागपूर विभागात सर्वात कमी पाउस पडला आहे. नंदूरबार जिल्ह्यातील नंदूरबार, शहादा, तळोदा, अक्राणी या चार तालुक्यात सर्वात कमी पाउस पडला आहे. परंतु जुलै महिन्याच्या अखेरी पाउस पडेल, अपेक्षा ठेवुयात. या वर्षी सोयाबीनची पेरणी केली. त्यात काही ठिकाणी बियाणे उगवलं नाही. त्याचा फटका १० जिल्ह्यांना बसला आहे, अशीही माहिती दत्तात्रय भरणे यांनी पुढे दिली.




# मोकाट जनावरे-पिसाळलेल्या श्वानांच्या त्रास; मनपाकडून हेल्पलाईन क्रमांक जाहीर

**अमरावतीः** शहरात मोकाट, पिसाळलेले श्वान (कुत्रे) आणि रस्त्यांवर फिरणाऱ्या मोकाट जनावरांमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येची गंभीर दखल घेत अमरावती महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने नागरिकांसाठी अधिकृत हेल्पलाईन क्रमांक जाहीर केले आहेत. नागरिकांनी खालील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आपल्या तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन मनपा प्रशासनाने केले आहे.

**तातडीच्या संपर्कासाठी हेल्पलाईन क्रमांकः**

**डॉ. तुषार पोहनकर (पशुशल्य चिकित्सक):- ९४०३४२२३०६**

**श्री निलेश सोळंके (पशुधन निरीक्षक) :- ७०३०९४०२२७**


**श्री पंकज कल्याणकर (स्वा. निरीक्षक) :- ९८६०२३८९१४**

# इस्त्रोच्या 100 वैज्ञानिकांनीही नोकरी सोडली

**बंगळुरू :** इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (इस्त्रो) च्या गगनयान आणि इतर महत्त्वाच्या मोहिमांशी संबंधित वैज्ञानिक आणि तांत्रिक कर्मचा-यांच्या राजीनाम्यांना आणि स्वेच्छानिवृत्तीला (व्हीआरएस) आता पूर्वीसारखी सहज मंजुरी मिळणार नाही. अंतराळ विभागाने (डीओएस) १४ जुलै रोजी नवीन निर्देश जारी केले आहेत. यात म्हटले आहे की, गट अ मधील वैज्ञानिक आणि तांत्रिक कर्मचा-यांचे राजीनामे किंवा व्हीआरएसचे अर्ज नियमित प्रक्रियेनुसार स्वीकारले जाउ नये. मीडिया रिपोर्ट्सनुसार, हे निर्देश अशा वेळी आले आहेत, जेव्हा मागील १० महिन्यांत १०० हून अधिक कर्मचा-यांनी इस्त्रो सोडले आहे. सर्वाधिक राजीनामे बंगळुरू येथील यू.आर. राव सॅटेलाइट सेंटर (यूआरएससी) आणि तिरु वनंतपुरम येथील विक्रम साराभाई स्पेस सेंटरमधून (व्हीएसएससी) झाले आहेत. राजीनामा देणा-यांमध्ये (पान २ वर)

# रायपूरमध्ये E-20 पेट्रोल टाकल्याने इंजिन खराब

**रायपूर/वृत्तसंस्था :**देशभरात पेट्रोलमध्ये E20 (२० टक्के इथेनॉल मिश्रित इंधन) च्या वापराला प्रोत्साहन दिले जात आहे. याच दरम्यान रायपूरमध्ये E20 पेट्रोलमुळे



कारचे इंजिन खराब झाल्याचे प्रकरण

समोर आले आहे. या संबंधित प्रकरणात ग्राहक न्यायालयाने मारुती सुझुकी इंडिया लिमिटेड आणि तिच्या अधिकृत डीलरला जबाबदार धरले आहे. न्यायालयाने सांगितले की, नवीन कार द्यावी किंवा २० लाख रुपये परत करावेत. न्यायालयाने मान्य केले की, गाडीचे इंजिन क२० इंधनानुसार नव्हते, तरीही ती कार ग्राहकाला विकण्यात आली. न्यायालयाने सांगितले की, ४५ दिवसांच्या आत ग्राहकाला त्याच माडेलची नवीन कार द्यावी, जी क२० इंधनासाठी अनुकूल असेल. जर असे केले नाही, तर कंपनीला वाहनाची संपूर्ण किंमत सुमारे २०.५ लाख रुपये आणि इतर खर्च देखील परत करावे लागतील.E-20 मुळे कार खराब झाल्याबद्दल ग्राहकाला नुकसान भरपाई देण्याचे हे देशातील पहिले प्रकरण आहे.

## ग्राहक न्यायालय म्हणाले- मारूती सुझुकीने नवी कार किंवा 20 लाख परत द्यावे; देशातील पहिले प्रकरण



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# शहरातील संघटित गुन्हेगारीवर पोलिसांचा मोठा प्रहार; दोन टोळ्यांवर एकाचवेळी मोक्का लागू

### २८ आरोपींविरुद्ध कठोर कारवाईला मंजुरी

### नागपुरी गेट व राजापेठ हद्दीतील संघटित गुन्हेगारीवर

### प्रहार -प्रथमच दोन टोळ्यांवर एकाचवेळी मोक्का लागू

**अमरावती/प्रतिनिधीः-**

अमरावती शहरातील संघटित गुन्हेगारीला मोठा धक्का देत शहर पोलिसांनी दोन कुख्यात गुन्हेगारी टोळ्यांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यास मंजुरी मिळवली आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी १५ जुलै रोजी या कारवाईला मंजुरी दिली. मागील पाच वर्षांत प्रथमच शहरातील दोन वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सक्रिय असलेल्या दोन गुन्हेगारी टोळ्यांवर एकाचवेळी मोक्का लागू करण्यात आला आहे.नागपुरी गेट पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ३२३/२०२६ मध्ये टोळीप्रमुख शेख मुन्नु शेख सलीम याच्यासह मोहम्मद सोफियान उर्फ गोलू मोहम्मद मन्नान, अरबाज खान अहफाज खान, सैयद तौसीब सैयद नासीर, सुफियान बेग उर्फ सुफियान पटेल उर्फ अन्नू पटेल, वसीम खान शफी खान, शेख परवेज शेख सादिक, मोहम्मद सलमान मोहम्मद उस्मान, सैयद अल्तमश सैयद गफ्फार, मोहम्मद सोहेल मोहम्मद इसराईल, रहेमतुल्ला फैमुल्ला, साहिल खान मुस्ताक खान, शेख रेहान शेख मतीन, सैय्यद शोएब उर्फ फैजू सैय्यद गफ्फार, गोलू, अकिल, शेख अलीम शेख सलीम आणि समीर जिलानी या आरोपींविरुद्ध मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांच्या नोंदीनुसार या टोळीने सन २०१९ ते २०२६ या कालावधीत शरीराविरुद्ध व मालमत्तेविरुद्धचे एकूण १५ गंभीर गुन्हे केले असून, टोळीप्रमुख शेख मुन्नु याच्यावर यापूर्वी एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली होती. प्रतिबंधात्मक कारवाईनंतरही टोळीच्या गुन्हेगारी कारवाया सुरूच असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. त्याचप्रमाणे राजापेठ पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ४९५/२०२६ मध्ये टोळीप्रमुख यश सुनील कडू याच्यासह जय दिगंबर चौधरी, रोहित दीपकराव धवस, राम अनिल जाधव, धनराज सुधीर घोंगळे, प्रेम किशोर बगाडे, जय सुनील कडू, लवकेश उर्फ लवक्या विरेंद्र चौधरी, साहिल गणेश गव्हाळे आणि फरार आरोपी आदित्य देशमुख यांच्याविरुद्धही मोक्का लागू करण्यात आला आहे. या टोळीविरुद्ध सन २०१८ ते २०२६ या कालावधीत शरीराविरुद्ध व मालमत्तेविरुद्धचे १५ गंभीर गुन्हे दाखल आहेत. टोळीप्रमुख यश कडू याच्यावरही यापूर्वी एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्धतेची कारवाई झाली होती. मात्र, त्यानंतरही ही टोळी राजापेठ व इतर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गुन्हेगारी कारवाया करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. दोन्ही टोळ्यांनी शहरात गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण केले असून सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका निर्माण केल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. त्यामुळे दोन्ही टोळ्यांच्या गुन्हेगारी इतिहासाचा, प्रतिबंधात्मक कारवायांचा तसेच न्यायालयीन निर्णयांचा अभ्यास करून महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ मधील कलम ३(१)(ii), ३(२) आणि ३(४) लागू करण्यास पोलीस आयुक्तांनी मंजुरी दिली.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके व श्याम घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली, राजापेठचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, नागपुरी गेटचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, एमपीडीए/मोक्का सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक इम्रान नायकवडे, पोलीस उपनिरीक्षक अजय मिश्रा, पोलीस अंमलदार चेतन कराडे तसेच दोन्ही पोलीस ठाण्यांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी न्यायालयीन कागदपत्रांची पूर्तता करून केली. शहरातील इतर सक्रिय गुन्हेगारी टोळ्यांवरही भविष्यात मोक्का कायद्यान्वये कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी स्पष्ट केले आहे.

# अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांनी नागपूर शहरात घेतला आढावा

नागपूर : अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांनी नागपूर शहरात शासन स्तरावर प्रलंबित प्रस्तावांचा आढावा घेऊन त्यांचा विहित वेळेत प्रभावी पाठपुरावा करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस आयुक्त तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी शहरातील पोलिसिंगमधील नाविन्यपूर्ण उपक्रम आणि गुन्हे प्रतिबंधासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे सादरीकरण केले.



महिला, बालके आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत पंतप्रधानांनी अपेक्षित केलेले स्मार्ट पोलिसिंग नागपुरात प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वंकष पावले उचलण्याचे आवाहन म्हैसकर यांनी केले.

याप्रसंगी उत्कृष्ट तपास करून दोषसिद्धी मिळविणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचा तसेच विशेष कामगिरी बजावणाऱ्या पोलीस अंमलदारांचा प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरव करण्यात आला.

## १ व १० वरिल उर्वरित

### प्रकाश आंबेडकरांनी घेतली

नागरिकाचे मत हे सत्तेत असलेल्यांना गैरसोयीचे वाटत असतील, तर त्यामुळे आपल्या लोकशाहीसमोर गंभीर प्रश्न निर्माण होतात, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

**राहुल गांधी यांनी पाठिंबा द्यायला इथे यायला हवे होते-**राहुल गांधी हे विरोधी पक्षनेते आहेत. सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ त्यांनी इथे यायला हवे होते. ?क्क्ट पेपरफुटीच्या प्रकरणात काँग्रेसही सरकारकडे जाब विचारत आहे. मी स्वत?ही महाराष्ट्रात हाच लढा लढत आहे, याची मला जाणीव आहे. अशा वेळी, मी आणि इतर अनेक जण जसे सोनम वांगचुक यांच्या पाठीशी उभे राहिलो, तसेच त्यांनीही तिला पाठिंबा देण्यासाठी इथे असायला हवे होते, अशी अपेक्षा आंबेडकर यांनी व्यक्त केली. दरम्यान, ज्याप्रमाणे केंद्रीय शिक्षणमंत्री म्हणून धर्मेंद्र प्रधान यांना नीट पेपरफुटीच्या प्रकरणासाठी जबाबदार धरले जाणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांचीही सत्ताधा?यांविरु द्ध लढा देणा?यांच्या पाठीशी उभे राहण्याची जबाबदारी आहे, याची आठवण प्रकाश आंबेडकर यांनी करून दिली.

### दोन्ही ठाकरेंचा वांगचुक

आंदोलनाचा पुढचा टप्पा म्हणून २० जुलैला दिल्लीमध्ये जंतर मंतरपासून संसद भवनावर निघणा-या भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी १९ जुलैला शिवाजी पार्क येथे (शिवतीर्थ) माँसाहेब मीनाताई ठाकरे ह्यांच्या पुतळ्याजवळ एकत्र येण्याचे आवाहन आदित्य ठाकरे यांनी केले आहे. संध्याकाळी ४ वाजता भेटूया. हा लढा सर्वांचा आहे, कुणा एका राजकीय पक्षाचा नाही. त्यामुळे सगळ्यांनी जमुया आणि देशाच्या तरुणांचा आवाज बनूया, असे आवाहन शिवसेना उबाठाचे नेते आदित्य ठाकरे यांनी गुरुवारी एक्स या समाज माध्यमातून केले.

**राज ठाकरेंचाही सोनम वांगचूक यांना पाठिंबा-** नीट पेपरफुटीसंदर्भात कारवाई व्हावी या मागणीसाठी उपोषण सुरू केलेल्या सोनम वांगचूक यांना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पाठिंबा दर्शविला आहे. सोनम वांगचुक यांच्या मागण्यांबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेना पूर्णपणे सहमती दर्शवत आहे. फक्त नीट नाही तर एकूणच सर्व परीक्षांमध्ये पारदर्शकता यायला हवी आणि दोषी मंर्त्यांचा राजीनामा यायलाच हवा. आम्ही राजकीय पक्ष म्हणून पूर्ण शक्तीने या आंदोलनाच्या आणि लोकभावनेचा पाठीशी आहोत आणि कायम असू देखील असे राज ठाकरे यांनी सोशल मिडिया पोस्टमध्ये म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विषयी जरा लक्ष घालावे अशी विनंतीही त्यांनी केली आहे.

भाजपच्या सत्तेच्या काळात सर्वत्र परीक्षांमध्ये घोळ होत आलेत. मध्यप्रदेशातील व्यापम घोटाळ्यापासून ते नीटच्या परीक्षांचे पेपर्स फुटणे ते अगदी आत्ता शिक्षकांच्या परीक्षांचे पेपर्स फुटण्यापर्यंत. हे सगळं यांच्या काळात का होतं आणि ते झाल्यावर हे इतके निर्ढावल्यासारखे का वागतात याचं उत्तर सोपं आहे. ते म्हणजे हाताशी सगळ्या यंत्रणांना धरून आलेली अमर्याद सत्ता. हे सरकार राजकीय किंवा निवडणुकांचा स्वार्थ नसेल तर कदापि कुठल्याही आंदोलनाकडे बघणार पण नाही. ते कायम आंदोलनकर्त्यांना देशद्रोही ठरवणार, यांत काहीतरी घातपात आहे असल्या शक्यता पेरत राहणार. कारण या असल्या कुजबुज मोहिमांवर आणि यंत्रणांच्या जोरावर तर यांच्या सत्तेचा डोलारा टिकला आहे, अशी टीका राज ठाकरे यांनी केली आहे.

माझी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनंती आहे की जरा या प्रश्नात लक्ष घाला. नीट परीक्षांचा विषय आणि त्यातला गोंधळ हा काही सोपा विषय नाही. या परीक्षेतील घोळाने लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याची वाट लागली आहे. आणि हे आताच घडले आहे असे नाही याच्या आधी पण असे प्रकार घडले आहेत आणि हा विषय राजकीय नाही आहे. हा विषय सामाजिक आहे.

### एमपीएससीच्या ऑनलाईन परीक्षांचा

झाल्या पाहिजेत आणि त्याचे निकाल सुद्धा वेळेत लागले पाहिजेत. पण, सुधारणांचा हा क्रम हाती घेताना एका व्यवस्थेकडून दुस-या व्यवस्थेकडे मार्गोत्क्रमण हे तितकेच सुरळीत सुद्धा असले पाहिजे. त्यातून प्रत्येक यंत्रणेला सज्जतेसाठी पुरेसा अवधी सुद्धा मिळावा.

त्यामुळे टप्प्या-टप्प्याने या सुधारणा राबवत संगणकआधारित परीक्षांची प्रक्रिया ही लगेच लागू न करता ऑगस्ट २०२७ पासून अमलात आणावी, जेणेकरून विद्यार्थ्यांनाही वेळ मिळेल आणि सर्वच यंत्रणांना सज्जता वाढवता येईल आणि तोपर्यंत विद्यमान प्रचलित पद्धतीने परीक्षा घ्याव्यात. त्यानुषंगाने आता पुढील निर्णय एमपीएससीने घ्यावा, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सूचित केले. यावेळी त्यांनी एमपीएससीच्या विविध उपक्रमांची प्रशंसाही केली.

### इस्रोच्या १०० वैज्ञानिकांनीही

ज्येष्ठ शास्त्रज्ञ व्हिक्टर जोसेफ टी यांचाही समावेश आहे. ते व्हीएसएससीमध्ये जिओसिंक्रोनस सॅटेलाइट ल?न्च व्हेईकल एम ककक प्रकल्पाचे प्रकल्प संचालक होते असे सांगण्यात आले आहे की त्यांनी फेब्रुवारीमध्ये राजीनामा दिला. यापूर्वी ते सुमारे १३ महिने एलव्हीएम३ प्रकल्पाची जबाबदारी सांभाळत होते. हेच ल?न्च व्हेईकल गगनयान मिशनमध्ये वापरले जाईल.

**अंतिम निर्णय अंतराळ विभाग घेईल**

आदेशात म्हटले आहे की, राजीनामे आणि व्हीआरएसच्या प्रकरणांमध्ये वाढ झाल्यामुळे गगनयान आणि इतर राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रकल्पांवर परिणाम होत आहे. त्यामुळे नोकरी सोडण्याच्या अर्जांवर आता अंतिम निर्णय अंतराळ विभाग घेईल. हे निर्देश यूआरएससी, व्हीएसएससी, सतीश धवन स्पेस सेंटर, लिक्विड प्रोपल्शन सिस्टम्स सेंटर, स्पेस अ?प्लिकेशन्स सेंटर, नॅशनल रिमोट सेन्सिंग सेंटर, इस्ट्रॅक आणि मास्टर कंट्रोल फॅसिलिटी यासह अनेक केंद्रांना पाठवण्यात आले आहेत.

आता या केंद्रांना निर्देश देण्यात आले आहेत की, वैज्ञानिक आणि तांत्रिक कर्मचारी, मग ते सायंटिस्ट/इंजिनियर-एसजी रँकचे असोत किंवा त्याखालील, त्यांचे राजीनामे किंवा व्हीआरएसचे अर्ज केंद्र संचालकांच्या स्पष्ट शिफारशीसह अंतराळ विभागाकडे पाठवले जावेत. अंतिम निर्णय विभाग स्तरावर घेतला जाईल. यापूर्वी २०२० मध्ये केलेल्या प्रशासकीय बदलांमध्ये इस्रो केंद्रांच्या संचालकांना आणि प्रमुखांना राजीनामे आणि व्हीआरएस स्वीकारण्याचा अधिकार देण्यात आला होता.

**स्टार्टअप्समध्ये जात आहेत वैज्ञानिक**

अहवालानुसार, इस्रो सोडणारे काही वैज्ञानिक खासगी अंतराळ स्टार्टअप्समध्ये सामील झाले आहेत. २०२० मध्ये केंद्र सरकारने अंतराळ क्षेत्र खासगी कंपन्यांसाठी खुले केल्यानंतर आणि २०२३ मध्ये भारतीय अंतराळ धोरण लागू झाल्यानंतर या क्षेत्रात स्टार्टअप्सची संख्या वेगाने वाढली आहे. सध्या देशात ४०० हून अधिक नोंदणीकृत स्पेस स्टार्टअप्स आहेत. यांमध्ये सुमारे ५०० दशलक्ष ड?लर्सची गुंतवणूक झाली आहे. फक्त २०२५ मध्येच सुमारे १५० दशलक्ष ड?लर्सची गुंतवणूक झाली आहे. पिक्सेल, ध्रुवा स्पेस, स्काय रूट एरोस्पेस, अग्निकुल क?सम?स आणि बेलाट्रिक्स एरोस्पेस यांसारख्या कंपन्या या क्षेत्रात आघाडीवर आहेत.

### अकोल्यात दोन गुटखा निर्मिती

याचा तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेकडून पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश देशमुख, गोपाल जाधव, पोलीस उपनिरीक्षक माजीद पठाण, अनिल चव्हाण, तसेच पोलीस अंमलदार शेख हसन, अब्दुल माजिद, महेंद्र मलीये, रवि खंडारे, किशोर सोनोने, भास्कर धोत्रे, उमेश पराये, खुशाल नेमाडे, फिरोज खान, मंगेश इंगळे, स्वप्नील खेडकर, राजसिंह चंदेल, पवन डंबलकर, सतीश पवार, आकाश मानकर, धीरज वानखेडे, अमित दुबे, उदय शुक्ला, स्वप्नील चौधरी, श्रीकांत पातोंड, अमोल दिपके, देवानंद खरात, रामकिसन डोईफोडे आणि मनीष ठाकरे यांनी सहभाग घेतला. एमआयडीसी पोलीस ठाण्याकडून सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय जाधव तसेच विजय अंभारे, सतीश प्रधान आणि सुनील टाकसाळे यांनी कारवाईत सहभाग घेतला. अन्न व औषध प्रशासनाकडून सहाय्यक आयुक्त देवानंद वीर, अन्न सुरक्षा अधिकारी रविंद्र सोळंके, गजानन गोरे आणि किशोर बोरचाटे यांनी कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली.

सलग दोन कारवायांमध्ये १ कोटी रुपयांहून अधिकचा मुद्देमाल जप्त झाल्याने अकोला जिल्ह्यातील प्रतिबंधित गुटखा निर्मिती आणि वितरण करणाऱ्या टोळ्यांना मोठा आर्थिक फटका बसल्याचे मानले जात आहे.

### मनपा प्रशासनाला अजून किती

बचावही करता आला नाही आणि ती पूर्णपणे हतबल झाली. या हल्ल्यात तिचा चेहरा रक्ताळला असून तिला अत्यंत गंभीर अवस्थेत तातडीने जवळच्या एका रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या तिच्यावर आयसीयू मध्ये उपचार सुरू असून तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

सनिदीवर झालेल्या या अमानुष श्वानहल्ल्यानंतर तिच्या जखमी अवस्थेतील आणि चेहऱ्याचे लचके तोडलेले फोटो सोशल मीडिया व प्रसारमाध्यमांवर व्हायरल झाले. हे मन हेलावून टाकणारे फोटो समोर आल्यानंतर अमरावतीकरांमधून मनपा प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरुद्ध तीव्र संतापाची लाट उसळली आहे. नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

पशुवैद्यकीय विभागातील मोठा भ्रष्टाचार उघडकीस आल्यानंतरही मनपा प्रशासन ढिम्म राहिले आहे. संपूर्ण अमरावतीकर भटक्या श्वानांच्या दहशतीखाली आणि त्यांच्या चाव्यांमुळे भयभीत झाले आहेत. असे असतानाही, श्वान निर्बीजीकरणाचे रखडलेले कंत्राट देण्याची प्रक्रिया मनपाने अद्यापही सुरू केली नसल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

**सनिदीचा वैद्यकीय खर्च मनपाने उचलावा :** हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या सनिदी कावरे हिच्या पालकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. मनपाच्या पशुवैद्यकीय विभागाने जर भटक्या श्वानांविरुद्ध वेळीच योग्य पावले उचलली असती, तर आज सनिदीचा चेहरा विद्रूप झाला नसता, असा थेट आरोप अनिल अग्रवाल यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाला मनपाचे असंवेदनशील प्रशासनच पूर्णपणे जबाबदार असल्याने, सनिदीचा औषधोपचाराचा सर्व खर्च 'विशेष बाब' म्हणून महापौर आणि आयुक्तांनी आपल्या विशेष अधिकारात तिच्या पालकांना द्यावा, अशी आग्रही मागणी नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी केली आहे.

### मालकाची हत्या करून

येथे पोहोचले असता त्यांना पुढील सर्व प्रकार पोलिसांनी सांगितला. ट्रकमालक उमेश गौरीशंकर मिश्रा १ जुलैला नागपूर येथून काही माल घेऊन गुजरातला गेले होते. सदर माल गुजरात येथे खाली केल्यानंतर तेथून नागपूरसाठी भाडे लागले असल्याची माहिती नातेवाईकांनी पोलिसांना दिली. मंगळवार, १४ जुलैपासून ट्रकमधील जीपीएस यंत्रणा बंद असल्याची माहिती सुद्धा ट्रकमालकाच्या नातेवाईकांनी पोलिसांना दिली. उमेश मिश्रा यांना अज्ञात मारेकऱ्यांनी मारून ट्रकमध्ये जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले आहे. घटनास्थळी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह मोर्शी येथील उपविभागीय पोलिस अधिकारी उमेश पाटील, पोलिस निरीक्षक राहुल आठवले, अमरावती जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अशोक लांडे यांनी भेट दिली असून फॉरेन्सिक टीम सुद्धा कसून तपास करीत आहे.

### सानुग्रह अनुदानासाठी प्रकल्पग्रस्तांचा

भवनावर धडक देत कार्यकारी संचालकांना निवेदन सादर केले.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, सानुग्रह अनुदान मंजूर होऊन जवळपास दोन वर्षांचा कालावधी लोटला असतानाही अनेक प्रकल्पांतील पात्र शेतकऱ्यांना निधी मिळालेला नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून तातडीने निधी वितरित करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोज चव्हाण, संघटक राजु लोणकर, दिलीप कदम, अकोला जिल्हाध्यक्ष अतुल मुळे, यवतमाळ जिल्हाध्यक्ष प्रा. विवेक डेहनकर, अरविंद फुले, रामेश्वर मेटे, दिलीप निखाडे, अजय काळपांडे यांच्यासह शेकडो महिला व पुरुष प्रकल्पग्रस्त उपस्थित होते.

शिष्टमंडळाने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के यांची भेट घेऊन प्रलंबित सानुग्रह अनुदानाचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तसेच उमा प्रकल्पातील पुनर्वसनाची प्रक्रिया गतीने राबविणे, दाभी व चानसुरा प्रकल्पांमुळे पाझरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देणे आणि पैनगंगा प्रकल्पातील यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी तालुक्यातील पूर्णतः बाधित मौजे खडका गावाचे पुनर्वसन प्रकल्पग्रस्तांच्या पसंतीनुसार करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

विविध प्रकल्पांतील प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रशासनासोबत सकारात्मक चर्चा झाली असून मागण्यांवर गांभीर्याने विचार करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिल्याचे संघटनेने सांगितले.

### पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मंजूर निधी अंतर्गत पोर्टेबल टॉयलेट व रेनकोट तसेच जिल्हा क्रीडा निधी अंतर्गत नूतनीकरण करण्यात आलेल्या पोलीस आधुनिक व्यायाम शाळेचा उद्घाटन समारंभ कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी ५ वाजता टाईप ४, ऑफीसर क्वार्टर, मालटेकडी येथे पोलीस अधिकाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या नूतन क्वार्टरचे उद्घाटनास उपस्थिती. सायंकाळी ५.३० वाजता अभियंता भवन, शेगाव नाका चौक, गाडगेनगर येथे महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा अमरावती जिल्हा तैलिक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने १० वी, १२ वी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व गुणवंत विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांचा सत्कार समारंभ कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी ७ वाजता अमरावती येथून मोझरीकडे प्रयाण करतील. तेथे खाजगी कार्यक्रमाला उपस्थित राहून सोयीनुसार रात्री ८ वाजता मोटारीने अमरावती येथून नागपूरकडे प्रयाण करतील.

### अमरावती शहरात २४ जुलैपासून

करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

पोलिस आयुक्तालय हद्दीत येणारे सर्व राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, ग्रामीण, शहरी व इतर रस्त्यांवर दुचाकी चालवताना चालक व मागे बसणाऱ्या व्यक्तीस प्रमाणित हेल्मेट घालणे २४ जुलैपासून अनिवार्य करण्यात येणार आहे. त्याकरिता विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. दुचाकीचालक आणि त्याच्या मागे बसलेले व्यक्ती वाहन चालविताना विनाहेल्मेट आढळल्यास मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या दुचाकीचालकांचा वाहतूक परवाना ३ महिन्यांकरिता निलंबित केला जाऊ शकतो. हेल्मेट हे केवळ पोलिसांच्या दंडापासून वाचण्याचा उपाय नसून, तुमच्या आणि तुमच्या कुटुंबाच्या सुरक्षेचे कवच आहे. वाहतूक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन जबाबदार नागरिक म्हणून दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर करून आपले कर्तव्य पार पाडावे.

### विद्यार्थ्यांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी

टीईटी परीक्षा नियमित करणे, पेपरफुटी रोखण्यासाठी कडक कायदा करणे, ११ वी प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे, ग्रामीण शाळांमध्ये मूलभूत सुविधा देणे, तसेच सरकारी व मराठी माध्यमाच्या शाळा सक्षम करणे. वैद्यकीय परीक्षा शुल्क वाढीवर नियंत्रण, खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांतील इंटर्नचे मानधन स्टायपेंड, रेसिडेंट डॉक्टरांच्या कर्तव्यांमध्ये सुधारणा, पॅरामेडिकल विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची कालमर्यादा निश्चित करणे, रॅगिंगमुक्त परिसर करण्याची गरज आहे. सार्वजनिक आरोग्य विभागती रिक्त पदे भरणे, ग्रामीण व आदिवासी भागातील आरोग्य सेवा सक्षम करणे, डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी प्रयत्न, आवश्यक औषधे व उपकरणे उपलब्ध करणे, प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण करने, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना वेळेवर लागू करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहांची जागा वाढवणे, स्वाधार योजनेची रक्कम नियमित देणे, वसतिगृहांमध्ये आरोग्य सुविधा, बार्टी फेलोशिप वाढवी,वेळेवर शिष्यवृत्ती व शुल्क प्रतिपूर्ती, नवीन वसतिगृहे बांधणे, वसतिगृहांतील प्रवेश प्रक्रिया सुलभ करणे.आयटीआयमध्ये आधुनिक तंत्रज्ञान आधारित अभ्यासक्रम सुरू करणे सह इतर विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली आहे. संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन मंत्र्यांनी दिलेले आहे.

पत्रकार परिषदेमध्ये विदर्भ क्षेत्र मंत्री देवाशीष गोटेकर म्हणाले की, केवळ आश्वासनांवर थांबणार नाही. शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रिया, परीक्षा, वसतिगृह, शिक्षक भरती, चिकित्सा शिक्षण आणि कौशल्य विकास या मुद्द्यांवर ३ महिन्यात तोडगा न निघाल्यास एबीव्हीपी राज्यभर आंदोलन करेल असा इशारा दिला आहे.

पत्रकार परिषदेला डॉ. वरुणराज नन्नावरे, आशू गुप्ता, प्रशांत माळी , तृष्णा चव्हाण, योगेश शेळके, शिव पांढरे, भूमिका गेडाम, मैत्रेयी खेडकर आदि उपस्थित होते.

### अमरावती ग्रामीणमध्ये

वारीवरून स्पष्ट होत असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. रस्ते अपघातांमधील मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी २२ जून २०२६ रोजी पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी अमरावती ग्रामीण जिल्ह्यातील ३१ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत हेल्मेट सक्ती लागू केली आहे. ही मोहीम दंड वसुलीसाठी नसून नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी राबविण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी जिल्हा वाहतूक शाखेने नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. दुचाकी चालविताना आणि प्रवास करताना हेल्मेट वापरणे, वैध वाहन परवाना, आरसी बुक व विमा कागदपत्रे जवळ बाळगणे, भरधाव किंवा निष्काळजीपणे वाहन न चालविणे, मद्यपान करून वाहन न चालविणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे, राँग साईडने वाहन न चालविणे, नो-पार्किंगमध्ये किंवा वाहतुकीला अडथळा होईल अशा ठिकाणी वाहन उभे न करणे, मालवाहू वाहनातून प्रवासी वाहतूक न करणे, प्रवासी वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी न घेणे, वाहनांमध्ये नियमबाह्य बदल न करणे तसेच चारचाकी वाहनातील चालक आणि सर्व प्रवाशांनी सीटबेल्टचा वापर करणे आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले.

पोलीस प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित प्रवासासाठी वाहतूक नियमांचे पालन करून स्वतःचा आणि इतरांचाही जीव वाचविण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

### ऐतिहासिक निर्णय : महानगरपालिकेचा

सन्मान, माजी महापौर व माजी नगरसेवकांचा गौरव, तसेच शहराच्या इतिहासावर आधारित प्रदर्शने व जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याची सूचना केली.

या ठरावाला सभागृहातील सर्व सदस्यांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला. सकारात्मक चर्चेनंतर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ठराव मंजूर झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना सभागृह नेता तथा माजी महापौर चेतन गावंडे म्हणाले, 'अमरावती महानगरपालिकेचा वर्धापन दिन हा केवळ उत्सव नसून शहराच्या विकासाचा इतिहास, लोकशाही मूल्ये आणि नागरिकांच्या सहभागाचा गौरव करणारा दिवस आहे. हा निर्णय शहराच्या अस्मितेला बळ देणारा असून, भविष्यात वर्धापन दिन लोकसहभागातून मोठ्या उत्साहात साजरा केला जाईल.'

या ऐतिहासिक निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, अमरावती महानगरपालिकेच्या इतिहासात हा निर्णय मैलाचा दगड ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### विशेष लोकअदालत १८ जुलै

लोकअदालतीचा मुख्य उद्देश आहे.

या विशेष उपक्रमात जिल्ह्यातील सर्व वकील, पक्षकार तसेच संबंधित हितधारकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून सक्रिय सहभाग नोंदवावा आणि आपापसांतील प्रलंबित प्रकरणांचे सलोख्याने निराकरण करून घ्यावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा उज्वला एम. नंदेश्वर यांनी केले आहे.

### श्री हव्याप्र मंडळाची आशियाई

वॉटर पोलो क्षेत्रातील अग्रगण्य प्रशिक्षण केंद्र म्हणून ओळखले जाते. मंडळाच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जलतरण तलावावर गेल्या अनेक वर्षांपासून नियमित सराव करणाऱ्या या तिन्ही खेळाडूंनी कठोर मेहनत, सातत्य आणि उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर भारतीय संघात स्थान मिळविले आहे.

मंडळाकडून या खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा, दर्जेदार प्रशिक्षण आणि आवश्यक क्रीडा मार्गदर्शन विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये त्यांनी अनेक पदके पटकावत आपल्या गुणवत्तेची छाप उमटविली असून, आता ते आशियाई स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यामुळे अमरावतीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या उल्लेखनीय यशाचे श्रेय खेळाडूंनी मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, अमरावती जलतरण संघटनेचे अध्यक्ष वसंतराव हरणे, प्रा. डॉ. टॉमी जोश, प्रा. डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे, जलतरण विभागप्रमुख व प्रशिक्षक प्रा. डॉ. योगेश निर्मळ, तसेच प्रशिक्षक मयूर कुमार आणि वैभवी थेटे यांना दिले आहे.

या यशाबद्दल मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, डॉ. विकास कोळेश्वर तसेच मंडळातील सर्व पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि खेळाडूंनी निवड झालेल्या तिन्ही जलतरणपटूंचे अभिनंदन करत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतासाठी सुवर्णयश मिळविण्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

### नोकरी लावण्याच्या नावावर

झाकर्डे याच्याशी तिची ओळख झाली. त्याने अविवाहित असल्याचे सांगून लग्न करण्याचे आश्वासन दिले आणि तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर विविध कामानिमित्त भेटायला बोलावून त्याने जवळीक साधली. नोव्हेंबर २०२२ ते जुलै २०२५ या कालावधीत विविध हॉटेल आणि लॉज मध्ये घेऊन जाऊन लग्नाचे आमिष दाखवून त्याने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. पीडिता जेव्हा लग्नाबाबत बोलायची तेव्हा तो विविध कारणे सांगून वेळ मारून न्यायचा. मात्र काही दिवसांनी तो खोटी आश्वासने देऊन फसवणूक करत असल्याचे पीडितेच्या लक्षात आले. त्यानंतर तिने पोलिसांत तक्रार दाखल केली. प्रकरण दर्यापूर पोलीस ठाणे हद्दीतील असल्याने नागपूरच्या हिंगणा पोलीस ठाण्यातून फाइल दर्यापूरला पाठवण्यात आली. बुधवार १५ जुलैच्या रात्री दर्यापूर पोलिसांनी अकोला येथील रहिवासी प्रतापसिंह झाकर्डे याच्या विरुद्ध बीएनएस कलम ६९ अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, १७ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## कावड मार्गावर भाविकांसाठी आवश्यक सुविधा उभारा- जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे निर्देश

### कावड उत्सव नियोजनाबाबत नियोजनभवनात बैठक

■ प्रतिनिधी | अकोला ■

देशभरात नावलौकिक मिळवलेला कावड उत्सव श्रावण महिन्यात साजरा होत असून या लोकोत्सवादरम्यान कावड यात्रेच्या मार्गावर पथदिवे, पिण्याचे पाणी ,स्वच्छतागृहे, रुग्णवाहिका आणि वैद्यकीय पथके व आवश्यक सुविधा उभाराव्यात. सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करीत कावड उत्सव मंगलमय व उत्साहपूर्ण वातावरण पार पाडावा, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

कावड यात्रा नियोजनाबाबत विविध कावड मंडळांच्या प्रतिनिधींची बैठक जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांच्या अध्यक्षतेत नियोजनभवनात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर,महापालिका आयुक्त सुनील लहाने, सा. पालखी व कावड उत्सव समिती चे अध्यक्ष राजेश भारती,शिवभक्त मंडळ चे अध्यक्ष सुनील गरड, शा स अध्यक्ष पप्पू मोरवाल कार्याध्यक्ष तरुण बघेरे, विठ्ठल गाडे, राजू बुंदेले, विजय जामनिक, दिलीप नायसे, संतोष पांडे, गोपाल नागपुरे, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व कावड मंडळांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



श्रीमती मीना म्हणाल्या की, अकोल्यातील कावड उत्सवाला ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे हा उत्सव संपूर्ण राज्याचा गौरव वाढवणारा असून उत्सवा दरम्यान कावड मार्गावर सीसीटीव्ही, ड्रोन कॅमेरे व जिल्हाधिकारी कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्ष कार्यरत राहणार आहे.कावड मार्गावर शिवभक्तांसाठी आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात येणार असून वैद्यकीय कक्ष कार्यरत राहणार आहेत.यासह अकोट मार्गावरून जलाभिषेक साठी येणाऱ्या शिवभक्तांसाठी पुरेशा व्यवस्था करण्यात येणार असून श्रावण महिन्यातील कावड पालखी उत्सव, व धारगड येथील यात्रा दरम्यान सर्व विभागांनी आवश्यक त्या सुविधा पुरवाव्यात, गांधीग्राम येथील घाटावरील कामे त्वरित पूर्ण करावी.

मनपा आयुक्त श्री.लहाने म्हणाले की संपूर्ण कावड आरोग्य, अग्निशमन, वीज, पाणीपुरवठा तसेच अन्य आपत्कालीन सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. जि प मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.नावंदर म्हणाले की कावड उत्सव काळामध्ये मनपा क्षेत्रात १० रुग्णवाहिका व १० आरोग्य पथके, अकोट मार्गावर पाच रुग्णवाहिका व आरोग्य पथके तसेच धारगड यात्रेसाठी आरोग्य पथके पूर्ण वेळ कार्यरत राहणार आहेत. पोलीस अधीक्षक श्री चांडक म्हणाले की, कावड उत्सव दरम्यान प्रत्येक कावड मंडळासाठी २४ तास पोलीस पथकाची नेमणूक करण्यात येणार आहे.उत्सवा दरम्यान गांधीग्राम येथे येणाऱ्या शिवभक्तांसाठी उपहारगृह व पिण्याच्या पाण्याची दुकाने खुली राहतील, पार्किंग व्यवस्था करण्यासंदर्भात प्रशासनाकडून आवश्यक ती कारवाई केली जाईल, उत्सवा दरम्यान सर्व शिवभक्तांनी सामंजस्याने कार्य करावे लेझर लाईटचा कुठेही वापर होऊ नये याची काळजी घ्यावी.. महिला कावड उत्सवासाठी महिला पोलीस पथक कार्यरत राहणार आहेत.

यावेळी कावड उत्सव मंडळातील पदाधिकारी शिवभक्त यांनी विविध सूचना मांडल्या. श्रावण महिन्यात १७ ऑगस्ट रोजी पहिला श्रावण सोमवार, २४ ऑगस्ट रोजी दुसरा श्रावण सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी तिसरा श्रावण सोमवार (श्री क्षेत्र धारगड यात्रा) तसेच ७ सप्टेंबर रोजी चौथा श्रावण सोमवार असून या दिवशी अकोला शहर व ग्रामीण भागात कावड व पालखी मिरवणुका निघणार आहेत. या कालावधीत मोठ्या संख्येने शिवभक्त गांधीग्राम येथील पूर्णा नदी पात्राजवळ एकत्र येतात. मध्यरात्रीनंतर कावडधारी पूर्णा नदीचे पवित्र जल कावडीत भरून अकोला शहरातील श्री राजराजेश्वर मंदिरात नेऊन भगवान महादेवांच्या पिंडीवर जलाभिषेक करतात. कावड मिरवणुकीचा मार्ग आपातापा नाका, रेल्वे पूल, शिवाजी महाविद्यालय, अकोट स्टॅण्ड, मामा बेकरी, बीयानी चौक, कपडा बाजार, सराफा लाईन, गांधी चौक, कोतवाली चौक, लोखंडी पूल, काळा मारोती टर्न, जय हिंद चौक ते श्री राजराजेश्वर मंदिर असा राहणार आहे.

## अयोध्या राम मंदिरातील कथित अपहाराच्या निषेधार्थ काँग्रेसचा 'रघुपती राघव राजाराम सत्याग्रह'



■ प्रतिनिधी | वाशिम ■

अयोध्या येथील श्रीराम मंदिरातील कथित आर्थिक अपहार व गैरव्यवहाराच्या निषेधार्थ वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मंगळवारी (दि. १४) वाशिम शहरात 'रघुपती राघव राजाराम सत्याग्रह' आयोजित करण्यात आला. श्रीराम मंदिर, बालाजी मंदिर आणि शनी मंदिर येथे भजन, पूजन, आरती, दिंडी व प्रसाद वाटप करून आंदोलन करण्यात आले.

सत्याग्रहाची सुरुवात टाळ-मृदंगाच्या गजरात काढण्यात आलेल्या दिंडीने झाली. बालाजी मंदिरात दर्शन, भजन, आरती व प्रसाद वाटप करण्यात आले. त्यानंतर शनी मंदिरात दर्शन घेऊन भजनाचा कार्यक्रम पार पडला. मुख्य कार्यक्रम श्रीराम मंदिर येथे झाला. यावेळी भजन, पूजन, आरती, पसायदान आणि प्रसाद वाटप करण्यात आले.

यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांनी श्रीरामाच्या चरणी प्रार्थना करत अयोध्या येथील राम मंदिरातील कथित दानपेटीतील रक्कम, सोन्या-चांदीचे दागिने व इतर मौल्यवान वस्तूंच्या अपहाराच्या प्रकरणातील दोषींना सद्बुद्धी मिळावी तसेच त्यांच्या कृत्याची योग्य शिक्षा व्हावी, अशी प्रार्थना केली.

कीर्तनकार ह.भ.प. पंढरीनाथ इंगोले महाराज यांनी भगवान श्रीरामांच्या जीवनावर विवेचन केले. तसेच उपस्थित वारकरी मंडळींनी अयोध्या येथील कथित अपहार प्रकरणाबाबत नाराजी व्यक्त केली. यानंतर सत्याग्रहात सहभागी काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते, रामभक्त व वारकरी यांनी रॅली काढून छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर सत्याग्रहाची सांगता करण्यात आली.

हा कार्यक्रम जिल्हाध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस ॲड. दिलीपराव सरनाईक, किसनराव मस्के, दिलीपराव देशमुख, महादेवराव सोळंके, विजयराव देशमुख, परसराम भोयर, गजानन गोटे, राजू वानखेडे, सागर गोरे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते. कार्यक्रमाला ह.भ.प. पंढरी पाटील इंगोले, ह.भ.प. नथू महाराज बोरकर, केशव महाराज काळे, विश्वनाथ महाराज चौधरी, भिकाजी महाराज इंगळे, विवेक महाराज इंगोले यांच्यासह वाशिम तालुक्यातील विविध भागांतील वारकरी मंडळींचीही लक्षणीय उपस्थिती होती.

## मौजे सावरगांव बर्डे येथील स्व. हरिदास नारायण कड यांचे मरणोत्तर नेत्रदान

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हयातील सावरगांव बर्डे येथील रहिवासी नारायण जिजेबा कड यांचा मूलगा स्व. हरिदास नारायण कड यांच्या वयाच्या ३१ व्या वर्षी दि. १२ जुन रोजी रात्री ०१०.३० वाजता निधन झाले. कड कुंटुबातील सर्वात लहान व सर्वाना सोबत घेऊन चालणारा तसेच समाजकार्याची आवड असलेला स्व. हरिदास नारायण कड यांचे निधन झाल्याने संपुर्ण कड कुटुंबावर दुःखाचा डोंगर उभा असताना कड कुंटुबीयांनी एवढ्या दुखामध्येही मुत्यनंतर दोन अंधाच्या जीवनात



प्रकाश निर्माण करण्यासाठी नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त करत सावरगांव बर्डे येथे एक आदर्श निर्माण केला.

त्यानूसार जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अति. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी, नेत्र शल्यचिकित्सक, डॉ. आशिष बेदरकर, यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्र चिकित्सा अधिकारी गणेश व्यवहारे व नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे यांनी स्व. हरिदास नारायण कड यांची नेत्र बुबुळे काढली व नेत्र बुबुळे त्याच दिवशी वैद्यकिय महाविद्यालय, अकोला येथे पाठविण्यात आली. तरी या नेत्रांच्या सहायाने दोण दृष्टि हिनांना पुन्हा प्रकाश पाहण्याची संधी उपलब्ध होणार असून कड कुटुबियाच्या निर्णयाचे सर्वत्र कौतूक होत आहे. कुटूबियानी जनतेला संदेश देताना सांगितले की, नेत्रदान हि अत्यंत पवित्र व मानवतावादी कृती असुन, मृत्युनंतरही एखादयाच्या आयुष्यात प्रकाश देण्याची संधी यातुन मिळते. भारतात दरवर्षी हजारो लोक नेत्र मिळण्याच्या प्रतिक्षेत असतात.

## अज्ञात हिंस्त्र प्राण्याचा हैदोस : युवा शेतकऱ्याच्या १७ कोंबड्या ठार

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील सेवादास नगर येथील युवा शेतकरी गोपाल सुभाष जाधव यांच्या कुक्कुटपालन व्यवसायावर अज्ञात हिंस्त्र प्राण्याने हल्ला करून एका रात्रीत १७ कोंबड्या ठार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शेतीला जोडधंदा म्हणून सुरू केलेल्या व्यवसायात मोठे आर्थिक नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

गोपाल जाधव यांनी गावालगतच्या शेतात गावठी कोंबड्यांचे कुक्कुटपालन सुरू केले आहे. पत्र्याचे शेड व जाळीचे कुंपण करून सुमारे ४०-४५ कोंबड्या पाळल्या होत्या.काल रोजी रात्रीच्या सुमारास अज्ञात हिंस्त्र प्राण्याने शेडमध्ये



घुसून कोंबड्यांवर हल्ला केला. सकाळी गोपाल जाधव शेडवर गेले असता १७ कोंबड्या मृतावस्थेत आढळून आल्या. काही कोंबड्यांच्या माना मोडलेल्या तर काहींचे पंख उपटलेल्या अवस्थेत होत्या. शेती परवडत नसल्याने जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन सुरू केले. बँकेचे कर्ज काढून पक्षी घेतले होते. एका रात्रीत १७ मोठ्या कोंबड्या मारल्या गेल्याने माझे सुमारे १५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. आता कर्ज कसे फेडणार?' असा सवाल करताना गोपाल जाधव यांच्या डोळ्यात अश्रू तरळले. या भागात यापूर्वीही कोल्हा, रानमांजर अशा प्राण्यांचा वावर दिसून आला आहे. त्यामुळे वन्यप्राण्यानेच हा हल्ला केल्याचा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. शेतकरी गोपाल जाधव यांनी तातडीने पंचनामा करून शासनाकडून नुकसान भरपाई मिळावी.

## कृषी विज्ञान केंद्रात नाविन्यपूर्ण शेतकऱ्यांचा गौरव; शास्त्राधारित शेतीचा संदेश



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय कृषी अनुसंधान परिषदच्या ९८ व्या स्थापना दिनानिमित्त कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथे नाविन्यपूर्ण कृतीशील शेतकरी संवाद, कृषी चर्चासत्र व प्रगतिशील शेतकरी गौरव समारंभ उत्साहात झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. आर. एल. काळे होते. उद्घाटन भारतीय स्टेट बँक, रिसोड शाखेचे व्यवस्थापक मुकेश कुमार यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून नगर परिषद रिसोडचे मुख्याधिकारी सतीष शेवदा उपस्थित होते. डॉ. आर. एल. काळे यांनी बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शास्त्राधारित, हवामान-स्मार्ट व बाजाराभिमुख शेतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले. सतीष शेवदा यांनी ग्रामीण युवकांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कृषी उद्योजकतेकडे वाटचाल करावी, असे सांगितले. यावेळी डॉ. हेमंत देशमुख, सौ. ललिता गोदमले, केशवराव भगत, बबन कुटे व जगन्नाथ सरकटे यांच्यासह विविध प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. तांत्रिक सत्रात हवामानाधारित पीक नियोजन, एकात्मिक कीड व्यवस्थापन, 'किसान सारथी' ॲपचा वापर आणि पोषण बाग या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास जिल्ह्यातील प्रगतिशील शेतकरी, महिला शेतकरी, युवक व कृषी उद्योजक उपस्थित होते.

## प्रभाग क्र. ७ मधील विशेष मतदार यादी पडताळणी शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | कारंजा ■

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एजर्मेत्ध्हूाहेग्नेंान्ेग्दह – एेंं) मोहिमेअंतर्गत कारंजा (लाड) शहरातील प्रभाग क्रमांक ७ (बायपास परिसर) येथे विशेष मतदार यादी पडताळणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून सुमारे ८०० ते ९०० मतदारांनी आपली मतदार यादी पडताळणी करून आवश्यक अर्ज भरून दिले.

या शिबिरामध्ये भाग क्रमांक १०१, १०२, १०३ आणि १९३ या चार मतदार याद्यांतील मतदारांची पडताळणी करण्यात आली. नागरिकांना मतदानाचा हक्क अबाधित राहावा तसेच मतदार यादी अचूक व अद्ययावत करण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.



शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. शालिनी प्रशांत ठाकरे (गटनेत्या, भाजपा, नगरपरिषद कारंजा (लाड)), सागर रामदास अंभोरे (नगरसेवक) आणि सौ. ज्योती प्रवेश राठोड (नगरसेविका) यांच्या नेतृत्वाखाली विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात आली. सलग दोन दिवस परिसरात फ्लेक्स लावून तसेच लाऊडस्पीकरद्वारे व्यापक प्रसिद्धी करण्यात आल्यामुळे मोठ्या संख्येने नागरिक शिबिरात सहभागी झाले.

मतदार पडताळणीची प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांनीही उल्लेखनीय कार्य केले. भाग क्रमांक १०१ साठी विशाल तायडे, भाग क्रमांक १०२ साठी निशांत कचरे, भाग क्रमांक १०३ साठी वैभव पवार आणि भाग क्रमांक १९३ साठी गजानन चौधरी यांनी नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करून पडताळणी प्रक्रिया प्रभावीपणे पूर्ण केली. संपूर्ण शिबिराच्या नियोजन, समन्वय व देखरेखीमध्ये पर्यवेक्षक सुधीर धनी यांनी महत्त्वाची भूमिका बजावत शिबिर यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. याशिवाय शिबिराच्या यशस्वीतेसाठी राजेश मोरे (उपाध्यक्ष, भाजपा कारंजा शहर), श्रेयश कदम (भाजप युवा मोर्चा, कारंजा), प्रवेश राठोड सर, अमोल राऊत आणि प्रशांत ठाकरे यांनी जनजागृती, नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणीत सक्रिय सहभाग नोंदवून विशेष सहकार्य केले. या शिबिरामुळे प्रभाग क्रमांक ७ मधील नागरिकांमध्ये मतदार यादी पडताळणीबाबत जनजागृती वाढली आगामी निवडणुकांच्या दृष्टीने अचूक आणि अद्ययावत मतदार यादी तयार करण्यास मोठी मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## क्षयरोग तपासणी शिबिर; १९७ संशयितांची डिजिटल एक्स-रेद्वारे तपासणी

■ प्रतिनिधी | मानोरा ■

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र कुपटा आणि प्राथमिक आरोग्य केंद्र कसोळा यांच्या कार्यक्षेत्रात संशयित क्षयरुग्णांसाठी विशेष तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण १९७ संशयितांची डिजिटल व हँडहेल्ड एक्स-रे मशीनद्वारे तपासणी करण्यात आली, तर १८ संशयितांचे स्पुटम नमुने संकलित करण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्र कुपटा अंतर्गत मानोरा येथे आयोजित शिबिरात डिजिटल एक्स-रे मशीनच्या साहाय्याने ८८ संशयितांची तपासणी करण्यात आली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. 



कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. परभणकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. चापे, वैद्यकीय अधिकारी डॉ. रविंद्र ठाकूर व डॉ. प्रशांत वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी एक्स-रे तपासणी केली. तसेच सर्वांच्या सहकार्याने १८ संशयितांचे स्पुटम नमुने संकलित करण्यात आले.

यावेळी श्रीरंग कानडे, उमेश सुर्वे, संजय राठोड, सुनील राठोड, रोशन इंगोले, प्रदीप घाटे, फईम शेख, जय इरतकर, मंगला बेलखेडे, वनिता शेजूळकर, नजराना खान, संदीप कटकतलवारे, प्रशांत तूरक, आशिष चावके, गणेश राऊत तसेच आशा कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

दरम्यान, प्राथमिक आरोग्य केंद्र कसोळा अंतर्गत मौजे इचोरी येथे हँडहेल्ड एक्स-रे मशीनद्वारे १०९ संशयितांची तपासणी करण्यात आली. एक्स-रे टेक्निशियन कार्तिक शिरसाट यांनी तपासणी केली. यावेळी संतोष बल्लाळ, वानखडे, चौधरी, मनीष जाधव तसेच आशा कार्यकर्त्या उपस्थित होत्या. या शिबिराचे नियोजन जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी केले. शिबिरादरम्यान उपस्थित नागरिकांना क्षयरोग व डेंग्यू प्रतिबंध, लक्षणे आणि उपचारांविषयी आरोग्य शिक्षण देण्यात आले. आरोग्य विभागाच्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## शिक्षकांच्या १९ दिवसांच्या लढ्याला यश

### अंशतः अनुदानित शाळांना ३१ मार्च २०२७ ला वाढीव टप्पा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

आमदार रोहित पवार यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे वाढीव टप्पा अनुदानाचा प्रश्न अधिक ठळकपणे शासना पुढे गेला आणि निर्णया प्रक्रियेला गती मिळालीङ

राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना ३१ मार्च २०२७ ला वाढीव टप्पा अनुदान देण्याची घोषणा शासनाने आझाद मैदानावर केली. २२ जूनपासून सुरू असलेल्या शिक्षकांच्या आंदोलनाला अखेर १० जुलै रोजी यश मिळाले. शिक्षणमंत्री दादा भुसे आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी आझाद मैदानावर उपस्थित राहून शिक्षकांसमोर ही घोषणा केली. तसेच संबंधित वाढीव टप्प्याची रक्कम पात्र



शिक्षकांच्या खात्यात जमा करण्यात येईल, असेही जाहीर करण्यात आले.

वाढीव टप्पा अनुदानाच्या मागणीसाठी राज्यभरातील हजारो शिक्षक २२ जूनपासून मुंबईतील आझाद मैदानावर ठिय्या आंदोलन करत होते. सलग १९ दिवस शिक्षकांनी पावसाची, गैरसोयींची आणि विविध अडचणींची पर्वा न करता आंदोलन सुरू ठेवले. अखेर शासनाने सकारात्मक निर्णय जाहीर केल्यानंतर आंदोलनकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.या आंदोलनादरम्यान विविध राजकीय पक्षांतील अनेक आमदारांनी आझाद मैदानावर भेट देऊन शिक्षकांना पाठिंबा दर्शविला. त्यामध्ये आमदार रोहित पवार यांची उपस्थिती विशेष चर्चेत राहिली.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २३० ■ शुक्रवार, १७ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# शेतमजूरच निघाला मारेकरी

## १२ वर्षीय निष्पाप मुलीच्या हत्येचा अवघ्या काही तासांत उलगडा

### रोठा शिवार हादरले, आरोपी जेरबंद, आणखी दोघे चौकशीत

**वर्धा जनमाध्यम :** रोठा शिवारात १२ वर्षीय निष्पाप मुलीवर अत्याचार केल्यानंतर तिची दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याच्या थरारक प्रकरणाचा वर्धा पोलिसांनी अवघ्या काही तासांत उलगडा केला. या प्रकरणी शेतमजूर राहुल राजू मडावी वय ३० रा. रोठा याला अटक करण्यात आली असून आणखी दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. या अमानुष घटनेने संपूर्ण जिल्हा संतापाने पेटून उठला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, यवतमाळ जिल्ह्यातील महागाव येथील पीडित मुलीचे कुटुंब गेल्या पाच वर्षांपासून रोठा परिसरातील शेतात राहुटीत वास्तव्यास आहे. बुधवारी सायंकाळी आईवडील शहरात गेले असताना घरात एकटी असलेल्या मुलीच्या घरी आरोपी शिरल्याचा आरोप आहे. त्यानंतर मुलीवर अत्याचार करून पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने तिचा दगडाने ठेचून खून करण्यात आल्याचा संशय तपासातून व्यक्त करण्यात आला आहे. आईवडील परतल्यानंतर मुलीचा





निर्वस्त्र मृतदेह पाहून एकच आक्रोश उसळला.

घटनेची माहिती मिळताच सावंगी पोलिसांनी हत्या आणि पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल १४ विशेष पथके तयार करण्यात आली. तीन संशयितांना ताब्यात घेऊन रात्रभर कसून चौकशी करण्यात आली. त्यानंतर राहुल मडावी याला अटक करण्यात आली. प्राथमिक तपासात आरोपीचे पीडित कुटुंबाकडे येणे जाणे असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, लैंगिक अत्याचार झाल्याबाबतचा अंतिम निष्कर्ष वैद्यकीय अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाकडे देण्यात आला असून दोषींना कठोर शिक्षा व्हावी आणि खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्यात येईल, अशी ग्वाही पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी दिली आहे.

### मारेकऱ्यांना अटक झाल्याशिवाय हलणार नाही

बारा वर्षीय निष्पाप चिमुरडीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या झाल्याच्या घटनेने संपूर्ण वर्धा जिल्हा हादरून गेला. राज्याचे गृहराज्यमंत्री असलेल्या जिल्ह्यातच घडलेल्या या अमानुष घटनेनंतर संतप्त नागरिकांचा उद्रेक झाला. शवविच्छेदनासाठी मृतदेह शासकीय रुग्णालयात आणताच हजारो नागरिकांनी रुग्णालय परिसरात गर्दी केली. काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. खासदार अमर काळे, आमदार राजेश बकाने आणि आमदार सुमित वानखडे यांनीही रुग्णालयात जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली. सायंकाळपर्यंत आरोपींना अटक झाली नाही तर आम्ही येथून हलणार नाही अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली. एका चिमुरडीच्या किंकाळ्यांनी संपूर्ण जिल्ह्याचे अंतःकरण हेलावून टाकले असून आता प्रत्येकाच्या ओठांवर एकच प्रश्न आहे. आरोपींना तातडीने अटक करून कठोर शिक्षा कधी होणार.

### चिमुरडीला न्याय मिळाल्याशिवाय शांत बसणार नाही

शवविच्छेदन अहवालात १२ वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संताप अधिक तीव्र झाला. आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी करत नातेवाईक आणि नागरिकांनी न्यायासाठी आक्रोश व्यक्त केला. आरोपीचा शोध घेतला असून पोलीसांच्या ताब्यात घेतले आहे, अशी माहीती पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी दिली. निष्पाप चिमुरडीला न्याय मिळावा, हीच आता संपूर्ण जिल्ह्याची एकच अपेक्षा आहे.

### चिमुरडीला न्याय द्या; दोषींना कठोर शिक्षा करा

वर्धा जिल्ह्यात आदिवासी समाजातील अवघ्या १२ वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याची घटना अत्यंत संतापजनक व मानवतेला काळिमा फासणारी असल्याची तीव्र प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा चारुताई टोकस यांनी व्यक्त केली. या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष आणि जलद चौकशी करून आरोपींना तातडीने कायद्यानुसार कठोरात कठोर शिक्षा द्यावी, अशी त्यांनी मागणी केली. निष्पाप चिमुरडीला न्याय मिळालाच पाहिजे आणि अशा अमानुष घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, असेही त्या म्हणाल्या.

# ३० लाखांची राख; सुरगावात भीषण आगीत पठाण कुटुंब उद्ध्वस्त

### घरासह दुकान, चक्की व वेल्डिंग वर्कशॉप जळाले तहसीलदारांची पाहणी, मदतीचे आश्वासन

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील सुरगाव येथे बुधवारी (दि. १५) सायंकाळी शब्बीर समशेरखा पठाण यांच्या घराला भीषण आग लागून घरासह इलेक्ट्रिक व हार्डवेअर दुकान, पिठाची चक्की आणि वेल्डिंग वर्कशॉप जळून खाक झाले. या दुर्घटनेत संसारोपयोगी साहित्य, मौल्यवान वस्तू, धान्य तसेच व्यावसायिक मालासह सुमारे ३० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.



घटनेच्या वेळी गावात आठवडी बाजार असल्याने पठाण कुटुंब लक्ष्मीनगर येथे खरेदीसाठी गेले होते. दरम्यान, घराला आग लागल्याची माहिती ग्रामस्थांनी दिल्यानंतर त्यांनी तातडीने धाव घेतली. मात्र, तोपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते. ग्रामस्थांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यात यश आले नाही. अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचेपर्यंत संपूर्ण घर आणि दुकान जळून खाक झाले होते.

आग शॉर्टसर्किटमुळे लागली की अन्य काही कारण आहे, याचा तपास सेलू पोलीस करीत आहेत.

घटनेची माहिती मिळताच तहसीलदार डॉ. शकुंतला पाराजे यांनी गुरुवारी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पीडित कुटुंबाची भेट घेऊन त्यांनी शासकीय नियमानुसार पंचनामा करून लवकरात लवकर मदत देण्याचे आश्वासन दिले.

यावेळी तालुका भाजपचे माजी अध्यक्ष अशोक कलोडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य श्याम वानखेडे, गोलू शेख, उमेश्वर बेलवाल, पोलीस पाटील, कोतवाल व ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान, ग्रामपंचायत सचिव व तलाठी घटनास्थळी वेळेत न पोहोचल्याबद्दल ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, सुरगाव समस्या समितीच्या पुढाकारातून आगीत सर्वस्व गमावलेल्या पठाण कुटुंबाला मदतीसाठी गावकऱ्यांनी पुढाकार घेतला असून अनेक नागरिकांनी प्रत्येकी दोन हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याची तयारी दर्शविली आहे. तसेच प्रशासनानेही तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ वर्ध्यात जनआक्रोश

### राष्ट्रपतींना निवेदन; विद्यार्थ्यांना न्याय, लडाखला घटनात्मक संरक्षणाची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ भारतीय लोकशाही अभियानच्या पुढाकाराने गुरुवारी महात्मा गांधी पुतळा परिसरात विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, शेतकरी व कामगार संघटनांच्या सहभागातून भव्य जनआंदोलन करण्यात आले. महिला, युवक, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

आंदोलनानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना उद्देशून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सविस्तर निवेदन पाठविण्यात आले. या निवेदनाची प्रत सोनम वांगचुक यांनाही पाठविण्यात आली.



निवेदनात नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या शांततापूर्ण आंदोलनातील मागण्यांवर केंद्र सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

निवेदनात NEET-UG व इतर स्पर्धा परीक्षांमधील कथित प्रश्नपत्रिका लीक प्रकरणांची निष्पक्ष चौकशी, दोषींवर कठोर कारवाई, विद्यार्थ्यांना न्याय, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली. तसेच लडाखला संविधानाच्या सहाव्या अनुसूचीअंतर्गत संरक्षण, पर्यावरण संवर्धन, स्थानिक लोकप्रतिनिधित्वाबाबत संवादातून निर्णय घेणे आणि शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करण्याची मागणीही करण्यात आली. आंदोलनात खासदार अमर काळे, किसान अधिकार अभियानचे ॲड. अविनाश काकडे, वर्ध्याचे नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, देवळीचे नगराध्यक्ष किरण ठाकरे, आशा बोथरा, अशोक बंग, हरीश इथापे, सुनील कोल्हे, अभ्युदय मेघे, यशवंत झाडे, तुषार उमाळे, महेंद्र मुनेश्वर यांच्यासह विविध सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यावेळी उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी, पारदर्शक परीक्षा व्यवस्था, लोकशाही मूल्यांचे संरक्षण आणि लडाखच्या जनतेच्या घटनात्मक हक्कांसाठी लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# आर्वी बसस्थानकातील धोकादायक रस्ता तातडीने दुरुस्त करा

### काम सुरू न झाल्यास शिवसेनेचा तीव्र आंदोलनाचा इशारा

**आर्वी जनमाध्यम :** शहरातील बसस्थानक परिसरातील बस थांबण्याचा तसेच बसच्या ये-जा करण्याचा मार्ग अत्यंत खराब झाल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. बसस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात खड्डे, खडी व गिट्टी साचल्यामुळे बसच्या चाकाखालून उडणारी गिट्टी प्रवासी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांच्या अंगावर जाऊन अपघाताचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी, आर्वी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले.

शिवसेनेचे आर्वी विधानसभा समन्वयक सनी गौतम यांनी सांगितले की, बसस्थानक परिसराच्या काँक्रीटीकरणासाठी अनेक महिन्यांपूर्वी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असतानाही प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बस थांबण्याचा व बसच्या ये-जा करण्याचा संपूर्ण परिसर





तातडीने काँक्रीटीकरण करून वाहतुकीस सुरक्षित करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. अन्यथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने बसस्थानक परिसरात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल. तसेच भविष्यात या परिसरात अपघात अथवा जीवितहानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील, असा इशाराही सनी गौतम यांनी दिला.

निवेदन देताना युवा सेना जिल्हाप्रमुख महेश चौधरी, आर्वी तालुका प्रमुख तथा नगरसेवक गुड्डू गावंडे, तालुका प्रमुख मनीष अरसड, शहर प्रमुख मिलिंद लंगडे, शहर संघटक विजय घोडवे, उपशहर प्रमुख सर्वेश देशपांडे, अभय ढोले, शैलेश मडामे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# तहसीलदारांच्या निवासस्थानासमोरच बिबट्याचा धुमाकूळ

### एक ठार, दुसरी ओढून नेल्याचा संशय, शहरात भीतीचे सावट

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी शहरातील तहसीलदारांच्या शासकीय निवासस्थानासमोरील बीएसएनएल टॉवर परिसरात बिबट्याने दोन बकऱ्यांवर हल्ला करून एकाला ठार तर दुसरीला ओढून नेल्याची धक्कादायक घटना घडली. शहराच्या मध्यवर्ती भागातच बिबट्याचा वावर दिसून आल्याने नागरिकांमध्ये प्रचंड दहशत निर्माण झाली असून वनविभागाच्या सतर्कतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, १५ जुलैच्या मध्यरात्री पटले यांच्या मालकीच्या दोन बकऱ्यांवर बिबट्याने झडप घातली. एका बकरीचा मृतदेह घटनास्थळी आढळून आला, तर दुसरी बकरी ओढून नेल्याचा संशय असून तिचा अद्याप शोध लागलेला नाही. सकाळी ही घटना उघडकीस येताच परिसरात



नागरिकांची मोठी गर्दी झाली.

विशेष म्हणजे, ही घटना तहसीलदारांच्या शासकीय निवासस्थानासमोर आणि इतर शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या परिसरात घडल्याने सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या भागात बिबट्याचा वारंवार वावर होत असेल तर शासकीय कर्मचारी आणि नागरिक सुरक्षित कसे राहणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

घटनेनंतर तलाठी हसीब शेख यांना वेळेवर माहिती देण्यात आली नसल्याचीही चर्चा असून त्याबाबत नाराजी व्यक्त होत आहे. वनविभागाने तातडीने पाहणी करून पिंजरा लावावा, रात्री गस्त वाढवावी, सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत आणि बिबट्याचा बंदोबस्त करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# प्रथम नागरिक डावलून आमदारांचीच छायाचित्रे; हिंगणघाटात राजकीय वर्चस्वाचा आरोप

### महिला नगराध्यक्षांचा शासकीय बॅनरवरून गायब होण्याने संताप; लोकशाहीचा अपमान की सत्तेचा माज

**हिंगणघाट जनमाध्यम :** पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या हिंगणघाट नगर परिषदेच्या आढावा बैठकीनिमित्त लावण्यात आलेल्या शासकीय स्वागत बॅनरवर शहराच्या लोकनियुक्त महिला नगराध्यक्षा डॉ. नयना तुळसकर यांचा फोटो नसल्याने शहरात तीव्र राजकीय वाद निर्माण झाला आहे. नगर परिषदेच्या अधिकृत कार्यक्रमात शहराच्या प्रथम नागरिकालाच डावलून केवळ आमदारांचेच राजकीय महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

नगर परिषद कायद्यानुसार नगराध्यक्ष हे शहराचे प्रथम नागरिक मानले जातात. त्यामुळे नगर परिषदेच्या अधिकृत कार्यक्रमांमध्ये त्यांचे स्थान अग्रक्रमाचे असते. मात्र, या कार्यक्रमाच्या बॅनरवर पालकमंत्री आणि स्थानिक आमदार समीर कुणावार यांचे फोटो झळकले, तर लोकनियुक्त नगराध्यक्षा पूर्णपणे गायब असल्याने प्रशासनाच्या राजशिष्टाचारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.





विशेष म्हणजे, जनतेने थेट निवडून दिलेल्या आणि उच्चशिक्षित महिला नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या डॉ. नयनाताई तुळसकर यांना शासकीय बॅनरवर स्थान न देणे हा केवळ प्रोटोकॉलचा प्रश्न नसून लोकशाही मूल्यांवर घाव असल्याची भावना शहरात व्यक्त होत आहे.

या घटनेनंतर नगर परिषद आमदारांच्या छायेखाली चालते का स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रमुखापेक्षा आमदारच सर्वेसर्वा आहेत का असे प्रश्न नागरिकांकडून विचारले जात आहेत. नगर परिषदेच्या अधिकृत कार्यक्रमात नगराध्यक्षांना दुय्यम ठरवून राजकीय वर्चस्वाचे प्रदर्शन करण्यात आल्याचा आरोपही होत आहे. महिला सक्षमीकरणाच्या घोषणा करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी प्रत्यक्षात महिला नगराध्यक्षांनाच दुय्यम स्थान दिल्याची टीका होत आहे. एका बाजूला महिलांना नेतृत्वाच्या संधी दिल्याचा गाजावाजा करायचा आणि दुसऱ्या बाजूला अधिकृत शासकीय कार्यक्रमात त्यांच्या अस्तित्वालाच नाकारायचे, ही दुटप्पी भूमिका असल्याचे मत अनेक सामाजिक घटकांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान, हा प्रकार केवळ प्रशासकीय दुर्लक्ष आहे की राजकीय दबावाखाली केलेली कृती, याची चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे. भविष्यात अशा प्रकारे लोकनियुक्त प्रतिनिधींचा अपमान होणार नाही, याची जबाबदारी नगर परिषद प्रशासनाने घ्यावी, अशी मागणीही जोर धरू लागली आहे.

मात्र, या प्रकरणाबाबत नगर परिषद प्रशासन किंवा आमदार समीर कुणावार यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

# महिलांसाठी सुरक्षित, आरोग्यदायी आणि सर्वसमावेशक विश्वविद्यालय : आव्हाने व समाधान या विषयावर विशेष व्याख्यान आज

**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण मंत्रालय, भारत सरकार द्वारे विद्यार्थ्यांच्या कल्याण, सुरक्षित व आदरपूर्ण शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी जारी दिशा निर्देशांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने विश्वविद्यालयाच्या आंतरिक तक्रार समितीच्या वतीने महिलांसाठी सुरक्षित, आरोग्यदायी आणि सर्वसमावेशक विश्वविद्यालय : आव्हाने व समाधान या विषयावर विशेष व्याख्यान शुक्रवार, १७ जुलै रोजी सकाळी ११:०० वाजता गालिब सभागृहात करण्यात आले आहे. यावेळी वक्ता म्हणून यूजीसी स्टीयरिंग समितीच्या अध्यक्षा व बीपीएस महिला विद्यापीठ खानपूर, हरियाणा येथील माजी कुलगुरू प्रो. सुषमा यादव संबोधित करतील. कार्यक्रमात अधिकारी, कर्मचारी, शोधार्थी व विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वविद्यालयाने केले आहे.

### तालाच्या जोरावर जिल्ह्यात दणका

# तबला परीक्षेत राघव फाटे अव्वल

### अवघ्या १२ व्या वर्षी प्रथम श्रेणीसह जिल्ह्यात प्रथम; संगीत क्षेत्रात उमलला नवा तारा

**वर्धा जनमाध्यम :** मेहनत, सातत्यपूर्ण रियाज आणि संगीतावरील निस्सीम प्रेमाच्या जोरावर सुदामपुरी येथील कु. राघव नरेशराव फाटे याने तबल्याच्या तृतीय परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत वर्धा जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. मानस प्रगती संगीत विद्यालय, वर्धा येथे एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या परीक्षेचा निकाल २५ जून रोजी जाहीर झाला. अवघ्या १२ वर्षांच्या राघवच्या या यशामुळे संगीत क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्याचे कौतुक होत आहे.

लहानपणापासूनच संगीताची आवड असलेल्या राघवने गायन आणि तबलावादन या दोन्ही क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. वडिलांकडून मिळालेल्या संगीत संस्कारांचा वारसा जपत त्याने नियमित सराव, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर हे यश मिळविले.

तालावरील अचूक पकड आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे त्याने अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये तसेच नामवंत कलाकारांच्या मैफिलींमध्ये तबल्याची समर्थ साथ करून रसिकांची दाद मिळविली आहे. शैक्षणिक



क्षेत्रासोबतच बास्केटबॉलमध्येही त्याने आपली अष्टपैलू गुणवत्ता सिद्ध केली आहे.

या यशाचे श्रेय राघवने गुरुवर्य शंकरराव तिखे, आजी, आई-वडील आणि कुटुंबीयांना दिले आहे. त्याचे वडील नरेश फाटे हे सामाजिक, साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात सक्रिय असून त्यांच्या कार्याचाही यापूर्वी गौरव झाला आहे. राघवच्या या उल्लेखनीय यशामुळे फाटे कुटुंबाचा मान उंचावला असून वर्धा जिल्ह्याला आणखी एक गुणी तबलावादक लाभल्याची भावना व्यक्त होत आहे. भविष्यात तो राज्य व राष्ट्रीय स्तरावर संगीत क्षेत्रात मोठे यश संपादन करेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला आहे.


## कार्यालय नगर परिषद, आर्वी, जि.वर्धा

### विद्युत विभाग वार्षिक निविदा सुचना

### सन २०२६-२७

मुख्याधिकारी, नगर परिषद आर्वी यांचे वतीने खालील कामाकरीता कंत्राटदारांकडून द्वी-लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. तरी योग्य त्या कंत्राटदाराने दि.१७.०७.२०२६ ते दि.२४.०७.२०२६ पर्यत कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म फी व बयाणा रकमेचा रोखपाल यांच्याकडे रोखीने भरणा करुन कोरे निविदा पत्रक विद्युत विभागातून घ्यावे. परिपूर्ण भरलेले सिलबंद पाकीट न.प.कडे दि.२७.०७.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत सादर करावे. निविदा शक्य झाल्यास उपस्थित कंत्राटदारांचे समोर उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा दर | कोरे निविदा फॉर्म फी | निविदा बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | नगर परिषद ईमारती-मधील उद्वाहनाची लिफ्ट) वार्षिक देखभाल-दुरुस्ती करणेबाबत | प्रती नग प्रमाणे सर्व करासहीत नमुद करावे | १०००/- | ७०००/- | वार्षिक |

अटी व शर्ती -
१) सदर कामासंबंधीत अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत विद्युत विभागात पहावयास मिळतील.
२) सदर कामाची निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद, आर्वी यांनी राखून ठेवलेले आहेत.

स्वा/-
मुख्याधिकारी,
नगर परिषद, आर्वी

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## NEET UG 2026 चा रिझल्ट आला

# 11.21 लाख विद्यार्थी क्वालिफाय झाले; आर्यन-पांशुल ठरले टॉपर!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संपूर्ण देशभरात चर्चा सुरू असलेल्या ?क्क्क्ष छक्र परीक्षेचा निकाल लागला आहे. NTA गुरु वारी रात्री NEET छक्र २०२६ चा निकाल जाहीर केला. उमेदवार त्यांचे गुणपत्रक neet.nta.nic.in या अधिकृत वेबसाइटवर तपासू शकतात. या परीक्षेत पंजाबचा आर्यन गुप्ता आणि हरियाणा येथील पांशुल बंसल या विद्यार्थ्यांनी सर्वाधिक गुण प्राप्त केले आहे. प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे या वर्षीची NEET UG 2026 परीक्षा पुन्हा घेण्यात आली होती. या पुनर्रचित NEET परीक्षेत भारत आणि परदेशातील जवळपास २० लाख विद्यार्थी बसले होते. ही परीक्षा भारतातील ५५१ शहरांमध्ये आणि परदेशातील १४ शहरांमध्ये असलेल्या ५,४४० परीक्षा केंद्रांवर घेण्यात आली. यापैकी ११.२१ लाख विद्यार्थी एमबीबीएस, बीडीएस, आयुष आणि इतर संलग्न वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत.

**आर्यन-पांशुल ठरले टापर!**-NEET UG 2026 परीक्षेत १३८ उमेदवारांनी ७२० पैकी ६९० पेक्षा जास्त गुण मिळवले. यांपैकी ९३ टक्क्यांहून अधिक उमेदवार पहिल्यांदाच नीट परीक्षा देणारे होते. तर ९९ टक्के गुणवंत विद्यार्थी १७ ते १९ वर्षे वयोगटातील होते. देशभरात १९ उमेदवारांनी ७०० पेक्षा जास्त गुण मिळवले. पंजाबच्या आर्यन गुप्ता आणि हरियाणाच्या पंशुल बन्सल यांनी संयुक्तपणे ७१५ गुणांसह सर्वोच्च स्थान पटकावले. तर, १,४९२ विद्यार्थ्यांना ६५० किंवा त्याहून अधिक गुण मिळाले आहेत. १०,१६० विद्यार्थ्यांना ६०० किंवा त्याहून अधिक गुण प्राप्त झाले आहेत. ९०,७८० विद्यार्थ्यांना ५०० किंवा त्याहून अधिक गुण मिळाले आहेत. दरम्यान, NTA नुसार, सर्व ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील उमेदवार पात्र ठरले आहेत. उत्तर प्रदेशात सर्वाधिक १.७ लाखांहून अधिक उमेदवार यशस्वी झाले, तर लक्षद्वीपमधून ४३ उमेदवार परीक्षेत उत्तीर्ण झाले. राज्यनिहाय गुणवंतांमध्ये लडाखचे जिग्मेट यांगचेन ल्हामो (५३० गुण), अंदमान आणि निकोबार बेटांचे ध्रु व त्रिपाठी (६०६ गुण) आणि लक्षद्वीपच्या फाहमिदा अनीस (५७३ गुण) यांचा समावेश आहे. एकूण १७ राज्यांतील टाप केलेल्या विद्यार्थ्यांनी ७०० किंवा त्याहून अधिक गुण मिळवले, तर २६ राज्यांतील टापर विद्यार्थ्यांनी ६९० पेक्षा जास्त गुण मिळवले. निकाल वेळेवर जाहीर झाल्यामुळे वैद्यकीय महाविद्यालयांमधील प्रवेश आणि समुपदेशन नियोजित वेळेनुसार सुरू होउ शकेल, असे म्हटले जात आहे.

# शेतमजूरच निघाला मारेकरी

## १२ वर्षीय निष्पाप मुलीच्या हत्येचा अवघ्या काही तासांत उलगडा

**रोठा शिवार हादरले, आरोपी जेरबंद, आणखी दोघे चौकशीत**





**वर्धा जनमाध्यम :** रोठा शिवारात १२ वर्षीय निष्पाप मुलीवर अत्याचार केल्यानंतर तिची दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याच्या थरारक प्रकरणाचा वर्धा पोलिसांनी अवघ्या काही तासांत उलगडा केला. या प्रकरणी शेतमजूर राहुल राजू मडावी वय ३० रा. रोठा याला अटक करण्यात आली असून आणखी दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. या अमानुष घटनेने संपूर्ण जिल्हा संतापाने पेटून उठला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, यवतमाळ जिल्ह्यातील महागाव येथील पीडित मुलीचे कुटुंब गेल्या पाच वर्षांपासून रोठा परिसरातील शेतात राहुटीत वास्तव्यास आहे. बुधवारी सायंकाळी आईवडील शहरात गेले असताना घरात एकटी असलेल्या मुलीच्या घरी आरोपी शिरल्याचा आरोप आहे. त्यानंतर मुलीवर अत्याचार करून पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने तिचा दगडाने ठेचून खून करण्यात आल्याचा संशय तपासातून व्यक्त करण्यात आला आहे. आईवडील परतल्यानंतर मुलीचा निर्वस्त्र मृतदेह पाहून एकच आक्रोश उसळला.

घटनेची माहिती मिळताच सावंगी पोलिसांनी हत्या आणि पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल १४ विशेष पथके तयार करण्यात आली. तीन संशयितांना ताब्यात घेऊन रात्रभर कसून चौकशी करण्यात आली. त्यानंतर राहुल मडावी याला अटक करण्यात आली. प्राथमिक तपासात आरोपीचे पीडित कुटुंबाकडे येणे जाणे असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, लैंगिक अत्याचार झाल्याबाबतचा अंतिम निष्कर्ष वैद्यकीय अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाकडे देण्यात आला असून दोषींना कठोर शिक्षा व्हावी आणि खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्यात येईल, अशी ग्वाही पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी दिली आहे.

### मारेकऱ्यांना अटक झाल्याशिवाय हलणार नाही

*बारा वर्षीय निष्पाप चिमुरडीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या झाल्याच्या घटनेने संपूर्ण वर्धा जिल्हा हादरून गेला. राज्याचे गृहराज्यमंत्री असलेल्या जिल्ह्यातच घडलेल्या या अमानुष घटनेनंतर संतप्त नागरिकांचा उद्रेक झाला. शवविच्छेदनासाठी मृतदेह शासकीय रुग्णालयात आणताच हजारो नागरिकांनी रुग्णालय परिसरात गर्दी केली. काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. खासदार अमर काळे, आमदार राजेश बकाने आणि आमदार सुमित वानखडे यांनीही रुग्णालयात जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली. सायंकाळपर्यंत आरोपींना अटक झाली नाही तर आम्ही येथून हलणार नाही अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली. एका चिमुरडीच्या किंकाळ्यांनी संपूर्ण जिल्ह्याचे अंतःकरण हेलावून टाकले असून आता प्रत्येकाच्या ओठांवर एकच प्रश्न आहे. आरोपींना तातडीने अटक करून कठोर शिक्षा कधी होणार.*

### चिमुरडीला न्याय मिळाल्याशिवाय शांत बसणार नाही

शवविच्छेदन अहवालात १२ वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संताप अधिक तीव्र झाला. आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी करत नातेवाईक आणि नागरिकांनी न्यायासाठी आक्रोश व्यक्त केला. आरोपीचा शोध घेतला असून पोलीसांच्या ताब्यात घेतले आहे, अशी माहीती पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी दिली. निष्पाप चिमुरडीला न्याय मिळावा, हीच आता संपूर्ण जिल्ह्याची एकच अपेक्षा आहे.

### चिमुरडीला न्याय द्या; दोषींना कठोर शिक्षा करा

वर्धा जिल्ह्यात आदिवासी समाजातील अवघ्या १२ वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याची घटना अत्यंत संतापजनक व मानवतेला काळिमा फासणारी असल्याची तीव्र प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा चारुताई टोकस यांनी व्यक्त केली. या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष आणि जलद चौकशी करून आरोपींना तातडीने कायद्यानुसार कठोरात कठोर शिक्षा द्यावी, अशी त्यांनी मागणी केली. निष्पाप चिमुरडीला न्याय मिळालाच पाहिजे आणि अशा अमानुष घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, असेही त्या म्हणाल्या.

# सशक्त महाराष्ट्रासाठी व्यसनमुक्तीच्या चळवळीत सर्वांचे योगदान आवश्यक-मुख्यमंत्री

**मुंबई, दि. १६ :** नैसर्गिकरित्या उपलब्ध होणा-या अमली पदार्थांचे उत्पादन, पुरवठा, खरेदी - विक्री व्यवहार आणि कृत्रिमरित्या तयार करण्यात येणा-या अमली पदार्थांची निर्मिती, पुरवठा व्यवसायाच्या अर्थव्यवस्थेला मुळापासून उखडून टाकण्याचे निर्देश देत सशक्त महाराष्ट्रासाठी व्यसनमुक्तीच्या चळवळीत सर्वांचे योगदान आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथिगृह येथे अमली पदार्थ संदर्भातील आयोजित बैठकीत सांगितले.

शालेय जीवनापासूनच अमली पदार्थांच्या दुष्परिणामांवषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती आणण्यासाठी इयत्ता सातवी ते दहावीच्या अभ्यासक्रमामध्ये अमली पदार्थ दुष्परिणाम विषयक घटकांचा समावेश करण्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सूचित केले.

बैठकीला वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम उपस्थित होते.नशेच्या दुर्दैवी चक्रव्यूहातून बाहेर पडण्याची इच्छा असलेल्या नागरिकांसाठी नशामुक्ती केंद्रांची साखळी उभारण्याच्या सूचना देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने राज्यामध्ये वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि अमली पदार्थ विरोधी कक्षाच्या समन्वयातून नशा मुक्ती केंद्र उभारण्यात यावीत. मुंबई शहरामध्ये मुंबई महापालिकेने अमली पदार्थ विरोधी कक्षाच्या सहकार्याने स्वतंत्र बहुशाखीय नशा मुक्ती केंद्रांची सुविधा सुरू करावी. त्यासोबतच राज्यामध्ये मोठी रु ग्णालय, सर्व शासकीय रु ग्णालय यामध्ये काही खाटांच्या मर्यादेत नशा मुक्ती केंद्र सुरू करावे. नशा मुक्त झालेला व्यक्ती पुन्हा नशेच्या गर्तेत जाउ नये यासाठी मुक्ती केंद्रांची साखळीच राज्यामध्ये तयार करावी.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुख्याध्यापक व प्राचार्य यांच्या माध्यमातून संबंधित शाळा, महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामाविषयी जागृती करावी. संबंधित प्राचार्य आणि मुख्याध्यापकांनी आपल्या शैक्षणिक आस्थापनेचा कॅम्पस अमली पदार्थ मुक्त घोषित करण्यासाठी नियमावली बनविण्यात यावी. अमली पदार्थ विषयक गुन्ह्यांमध्ये एनडीपीएस (नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रापिक सबस्टन्सेस ॲक्ट) सारख्या कायद्यांचा प्रभावी उपयोग करीत गतीने निकालाचे कार्यवाही पूर्ण होण्यासाठी जलदगती न्यायालय स्थापन करावी. शासनाच्यावतीने अशा प्रकरणांमध्ये आरोपींना शिक्षा होण्यासाठी न्यायालयात बाजू मांडणा-या सरकारी वकिलांचे प्रशिक्षण घेण्यात यावे.

शासनाच्या सर्वच विभाग समन्वयाने अमली पदार्थांशी निगडित संपूर्ण अर्थव्यवस्थेवर कारवाई करता येईल. अमली पदार्थांचा पुरवठा करणारे पेडलर यांना शोधून त्यांच्याकडून पुरवठा साखळीची मागील आणि पुढील लिंकजेस शोधून काढत त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी.



पोलिसांनी आपल्या कार्यक्षेत्रातील अमली पदार्थांची विक्री होत असलेली ठिकाणे शोधून त्या ठिकाणी पेट्रोलिंग वाढवावे. कुणीही या व्यवसायाशी निगडित असल्यास त्याची गय केली जाणार नाही, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

अमली पदार्थ विरोधी तसेच नशा मुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी उल्लेखनीय काम केलेल्या आणि गोपनीय माहितीच्या आधारे मोठ्या कारवाया करण्यात आल्या, अशा सामान्य नागरिकांसाठी बक्षीस योजना लागू करावी. अमली पदार्थ विषयक गुन्ह्यांमध्ये चांगली कामगिरी करणा-या अधिकारी व कर्मचा-यांना मूळ वेतनाच्या तीन टक्के आगाउ वेतन देण्याची कार्यवाही करावी. तसेच अमली पदार्थांच्या गुन्ह्यांमध्ये तपास कार्य करणा-या अधिका-यांना परिस्थितीनुरूप विमान प्रवासाची सवलत देण्यात यावी. तसेच याबाबतीत उल्लेखनीय कामगिरी करणा-या अधिकारी व कर्मचा-यांसाठी पुरस्कार योजना सुरू करावी, असेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, पोलिस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, अतिरिक्त पोलीस महासंचालक निखिल गुप्ता, पोलीस उपमहानिरीक्षक प्रवीण पाटील आदी उपस्थित होते. बैठकीत अमली पदार्थ विरोधी कृती दलाचे विशेष पोलीस महानिरीक्षक ज्योती प्रिया सिंग यांनी सादरीकरण केले.

**अमली पदार्थ विरोधी कारवाई :-**

२०२१ ते २०२५ या दरम्यान पोलिसांनी केलेल्या विविध कारवायांमध्ये ६ हजार ५५० कोटी रुपयांचे ५.७ टन मेफेड्रोन जप्त करण्यात आले आहे. तसेच १३४ किलो वजनाची ४८४. ७५ कोटीची हेराईन, १०९.७ टन वजनाचा १८६.४४ कोटीचा गांजा, १४.६७ कोटी किमतीचे ७५९ किलो चरस, १४.६० कोटी किमतीचे १३४ किलो कोकेन जप्त करण्यात आले आहे. तसेच २०२५ मध्ये १७ हजार ६११ प्रकरणांमध्ये ५६ हजार २०६ किलो विविध अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे. त्याची किंमत १३४० कोटी आहे. याप्रकरणात १५ हजार ९९४ आरोपींना अटक करण्यात आली असून यापैकी ७२ विदेशी नागरिक होते.

## यवतमाळ - अवैध सावकारी प्रकरणात चार ठिकाणी छापे, ५४ आक्षेपार्ह कागदपत्रांसह मोबाईल जप्त

**यवतमाळ/प्रतिनिधी :**

अवैध सावकारी व्यवहारांविरोधात बुधवारी (ता. १५) जिल्हा उपनिबंधकांच्या पथकाने रात्री उशिरा पर्यंत मोठी धडक कारवाई केली. शहरातील चार वेगवेगळ्या ठिकाणी एकावेळी झाडाझडती घेतली. या कारवाईत एकूण ५४ आक्षेपार्ह कागदपत्रे, धनादेश, स्टॅम्पपेपर, दस्तऐवज, डाय!या, चिठ्ठ्या तसेच एक मोबाईल जप्त केला. या प्रकरणात संतोष अजबराव कदम (रा. गौळ बाजार, कळमनुरी, हिंगोली), समाधान वामनराव पाटील (रा. बंजारा क?लनी, पुसद), प्रकाश शंकरराव चोरमले (रा. ईसापूर, ता. पुसद) व दिलीप सखाराम उत्तरवार (रा. ग्रीन पार्क-१, पुसद) यांचे घर आणि संबंधित ठिकाणी झडती घेण्यात आली. जिल्हा निबंधक कार्यालयाकडे माधव गव्हाणे (रा. ओमनगर, श्रीरामपूर ) व सुभाष दुलबा डवले (रा. ग्रीन पार्क-२, श्रीरामपूर ) यांनी केलेल्या अवैध सावकारी व्यवहारांच्या तक्रारीच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली. झडती दरम्यान संतोष अजबराव कदम यांच्या ठिकाणाहून १९ आक्षेपार्ह कागदपत्रे, समाधान वामनराव पाटील यांच्या निवासस्थानातून नउ कागदपत्रे, तर दिलीप सखाराम उत्तरवार यांच्या घरातून २६ आक्षेपार्ह कागदपत्रे व एक मोबाईल जप्त करण्यात आला आहे. प्रकाश शंकरराव चोरमले यांच्या घरात मात्र कोणतेही आक्षेपार्ह साहित्य आढळून आले नसल्याने त्याठिकाणी जप्तीची कारवाई करण्यात आली नाही. जप्त करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतुदीनुसार संबंधितांविरु द्ध पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

## भक्तांच्याच श्रद्धेवर शंका, चोराच्या उलट्या बोंबा : रोहिणी खडसे संतापल्या

**मुंबई / प्रतिनिधी-** अयोध्येतील प्रभू श्री राम मंदिरातील दानचोरी प्रकरणावरून राजकारण चांगलेच तापले असून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जुंपली आहे. अशातच भाजप आमदाराने एक वादग्रस्त वक्तव्य केल्याने नवा नाद निर्माण झाला आहे. या वक्तव्यावरून शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी एक्सवरून पोस्ट शेअर करत संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.उत्तर प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष आणि भाजप आमदार सतीश महाना म्हणतात की, ज्यांनी ख-या श्रद्धेने दान नाही दिले, त्यांचेच दान चोरीला गेले आहे. घरात अन्नाचा कण नसताना आपल्या पदराच्या गाठीशी बांधलेला रुपया राम मंदिराच्या दानासाठी लोकांनी दिला आहे आणि हा कोण कुठला महाना त्यांची श्रद्धा खोटी ठरवतोय? असा संतप्त सवाल विचारला आहे.प्रभू श्रीरामांच्या मंदिरातील दानपेटीतून दान चोरी तुम्ही करायचे आणि मग भक्तांच्याच श्रद्धेवर शंका घ्यायची, याला चोराच्या उलट्या बोंबा म्हणतात. अशांसाठी फार समर्पक गाणं आहे.. पिते दूध डोळे मिटूनी जात मांजराची, मनी चोरट्याच्या का रे भीती चांदण्याची..! अशा शब्दांत रोहिणी खडसेंनी टीका केली आहे.



भक्तांनी दिलेल्या देणग्या मंदिराच्या बांधकाम आणि विकास कामांसाठी वापरल्या गेल्या आहेत. राम मंदिराचे भव्य स्वरूप हेच सिद्ध करते की देणग्यांचा सुज्ञपणे वापर केला गेला आहे. देशभरातील कोट्यवधी लोकांनी आपल्या भक्तीने मंदिराच्या उभारणीसाठी योगदान दिले आहे आणि त्याचे परिणाम आज सर्वांना दिसत आहेत. मंदिरातील विकासकामांमुळे देणग्यांच्या वापराबाबत कोणतीही शंका राहू नये, असे उत्तर प्रदेश राज्यातील भाजप आमदार सतीश महाना यांनी म्हटले आहे.

**निष्पक्षपणे चौकशी झाली पाहिजे : विरोधकांची मागणी-** अयोध्या राम मंदिरातील देणगी घोटाळा प्रकरणी एसआयटी चौकशी करत आहे. सतीश महाना यांच्या वादग्रस्त वक्तव्यानंतर भक्तांना आरोपीच्या पिंज-यात उभे करण्याऐवजी या प्रकरणाची निष्पक्षपणे चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी विरोधकांनी केली आहे.

## वर्ध्यात वाघाला जेरबंद करण्यासाठी वनविभागाच्या हालचाली

**वर्धा /प्रतिनिधी :** गिरड व्याघ्र प्रकल्पातील राणी वाघिणीच्या दोन वर्षांपूर्वी जन्मलेल्या नर वाघाने पिंपळगाव, उंदिरगाव, साखरा आणि जोगीनगुंफा परिसरात दहशत निर्माण केल्याने वनविभागाने त्याला जेरबंद करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. वाघाला पकडण्याचा प्रस्ताव तयार करून वरिष्ठांकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. गेल्या काही महिन्यांपासून हा वाघ जंगलाबाहेर येउन शेतशिवारात वावरत असून, त्याने अनेक पाळीव जनावरांवर हल्ले केले आहेत. या हल्ल्यांत काही जनावरे ठार झाली तर काही जखमी झाली आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर पिंपळगाव येथील नागरिकांनी उपवनसंरक्षक हरवीर सिंग व सहाय्यक वनसंरक्षक हरीश सरोदे यांची भेट घेउन वाघाचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी करणारे निवेदन दिले होते. या मागणीची गंभीर दखल घेत उपवनसंरक्षक हरवीर सिंग यांनी वाघाला पकडण्यासाठी प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्याचे निर्देश दिले.



दोन वर्षांपूर्वी गिरड व्याघ्र सफारी प्रकल्पातील राणी वाघिणीने चार पिल्लांना जन्म दिला होता. त्यापैकी एका पिल्लाचा धोंडगावजवळ अपघाती मृत्यू झाला, तर दोन पिल्लांना वनविभागाने जेरबंद केले होते. त्यावेळी संबंधित वाघाकडून कोणताही उपद्रव नसल्याने त्याला जंगलातच सोडण्यात आले होते. मात्र मोठा झाल्यानंतर या वाघाने खुर्सापार जंगल सोडून पिंपळगाव, उंदिरगाव, साखरा व जोगीनगुंफा परिसरातील शेतशिवारात वास्तव्य सुरू केले. अद्याप त्याने कोणत्याही व्यक्तीवर हल्ला केलेला नसला तरी भक्ष्याच्या शोधात पाळीव जनावरांवर वारंवार हल्ले केल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## महाराष्ट्राला सर्वाधिक सुलभ शासकीय सेवा देणारे राज्य बनवा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या गव्हर्नन्स प्रोसेस रि-इंजिनियरिंग (जीपीआर) उपक्रमांतर्गत शासकीय सेवा अधिक सुलभ, पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित करण्याच्या प्रक्रियेला गती देण्यात येत असून, सर्व विभागांनी १५ ऑगस्टपर्यंत भरीव प्रगती करावी. तसेच प्रत्येक सेवेचे नव्याने पुनरावलोकन करून कागदपत्रांची संख्या कमी करावी. महाराष्ट्राची 'सर्वाधिक सुलभ शासकीय सेवा देणारे राज्य' अशी ओळख निर्माण करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जीपीआरच्या तिस-या टप्प्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच मंत्रालयातील सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, जीपीआर अंतर्गत प्रत्येक सेवेसाठी सहा टप्प्यांची प्रक्रिया निश्चित करण्यात आली असून त्यामध्ये जीपीआर अहवाल, मुख्यमंत्री कार्यालयाशी चर्चा, विभागीय मंजुरी, महाआयटीमार्फत तांत्रिक विकास, शासन निर्णय निर्गमित करणे आणि अंतिम चाचणी यांचा समावेश आहे. सर्व विभागांनी १५ ऑगस्टपर्यंत किमान पाचव्या टप्प्यापर्यंत, म्हणजे आवश्यक शासन निर्णय निर्गमित करून सेवा अंतिम चाचणीसाठी तयार ठेवाव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.सेवांचे एकत्रीकरण व सुलभीकरण-मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील नागरिकांना जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने शासकीय सेवांचे व्यापक पुनरावलोकन केले आहे. त्यानुसार विविध विभागांतील सेवांचे एकत्रीकरण व सुलभीकरण करून सेवांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये दुहेरी सेवांचे एकत्रीकरण तसेच कालबाह्य व अन्य सेवांची समाप्ती करण्यात आली आहे.महाडीबीटी २.०, मैत्री आणि आपले सरकार २.० या डिजिटल प्लॅटफ?र्मवर सर्व शासकीय सेवा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे. सेवा वितरणात कोणताही तांत्रिक अडथळा येणार नाही, यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने सक्षम तांत्रिक व्यवस्था उभारावी, तसेच सर्व कामे निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.डेटा ?नालिटिक्स अज अ सर्व्हिस आणि मिनी सेतू केंद्र प्रकल्पाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते इलेक्ट्रानिक्स, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या डेटा अनालिटिक्स अज अ सर्व्हिस आणि मिनी सेतू केंद्र या दोन प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. या लोकार्पणसंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, डेटा अनालिटिक्सच्या वापरामुळे प्रशासनातील उत्तरदायित्व अधिक प्रभावी होत असून गैरव्यवहार रोखणे, शासनाचा निधी वाचविणे आणि सेवा वितरणात पारदर्शकता वाढविणे शक्य होते.

## मुरव्यमंत्री यांचा वाढदिवस व दिवंगत अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यात 'महा आरोग्य शिबिर'

### वैद्यकीय शिक्षणमंत्री मुश्रीफ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आणि दिवंगत अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यभर २२ ते २८ जुलै २०२६ या कालावधीत 'महा आरोग्य शिबिर' ओयोजित करण्यात आले आहे. या अभियानाची सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, संलग्न रुग्णालये तसेच शासकीय दंत, आयुर्वेद आणि होमिओपॅथी महाविद्यालयांनी अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. या अभियानाचा लाभ राज्यातील जास्तीत जास्त नागरिकांना मिळावा, यासाठी व्यापक जनजागृती करून शिबिरे यशस्वी करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. मंत्रालयात राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयांच्या अधिष्ठात्यांच्या आयोजित बैठकीत त्यांनी या अभियानाच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेत विविध सूचना दिल्या. यावेळी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव धीरज कुमार, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी तसेच राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय, दंत व होमिओपॅथी महाविद्यालयांचे अधिष्टाता यावेळी व्हीसीव्दारे उपस्थित होते.वैद्यकीय शिक्षणमंत्री मुश्रीफ म्हणाले की,



प्रत्येक महाविद्यालयाने विभागनिहाय समित्या स्थापन करून नोडल अधिका-यांची नियुक्ती करावी. समित्यांची यादी तातडीने संचालनालयाकडे पाठवावी. वैद्यकीय महाविद्यालये, संलग्न रुग्णालये, यूएचटीसी आणि आरएचटीसी येथे शिबिरासाठी योग्य ठिकाण निश्चित करून आवश्यक सर्व पूर्वतयारी वेळेत पूर्ण करावी. शिबिरांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी यासाठी प्रत्येक संस्थेमध्ये स्वतंत्र प्रसार व जनजागृती समिती स्थापन करून फ्लेक्स, पोस्टर्स, सार्वजनिक ध्वनीप्रणाली, समाजमाध्यमे तसेच इतर माध्यमांचा प्रभावी वापर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. प्रत्येक शिबिरासाठी स्वतंत्र माहिती व नोंदणी कक्ष सुरू करावा, असेही त्यांनी सांगितले. शिबिरांच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, वरिष्ठ व कनिष्ठ निवासी डाक्टर, इंटर्न, परिचारिका, तंत्रज्ञ, लिपिक तसेच अन्य आवश्यक मनुष्यबळाची नियुक्ती करावी. नागरिकांची गैरसोय होणार नाही यासाठी रांग व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बसण्याची सुविधा, अल्पोपहार, पार्किंग तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर अधिष्ठात्यांनी वैयक्तिक्र लक्ष द्यावे, असे निर्देशही त्यांनी दिले.स्वयंसेवक, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग घेउन अभियान अधिक लोकाभिमुख करावे. प्रत्येक शिबिरस्थळी आपत्कालीन वैद्यकीय सेवा आवश्यकतेनुसार रुग्णवाहिका, औषधे आणि वैद्यकीय उपकरणे उपलब्ध ठेवावीत. रक्तदान शिबिरांसाठी शासकीय व धर्मादाय रक्तपेढ्या तसेच रक्तदान क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांशी समन्वय साधावा. जनसहभाग वाढविण्यासाठी मंदिरे, मशिदी, चर्च, गुरुद्वारे तसेच अन्य धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनाशी समन्वय साधण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. वैद्यकीय तपासणीत संशयित अथवा बाधित आढळलेल्या लाभार्थ्यांची स्वतंत्र नोंदणी करून त्यांना पुढील तपासणी व उपचारासाठी संबंधित रुग्णालयात तातडीने संदर्भित करण्यात यावे. प्रत्येक अधिष्ठात्यांनी दररोज शिबिराचा आढावा घ्यावा, दैनंदिन अहवाल संचालनालयाकडे पाठवावा.

# संपादकीय

## प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# नवा कायदा नवा आदर्श

भारतीय राज्यघटनेच्या शिल्पकारांनी देशातील सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायदा असावा, अशी अपेक्षा मार्गदर्शक तत्त्वांच्या ४४ व्या कलमामध्ये स्पष्टपणे व्यक्त केली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तब्बल पाऊण शतकाने या घटनात्मक संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्याच्या हालचाली वेग घेताना दिसत आहेत. उत्तराखंड, आसाम आणि गुजरातच्या पावलावर पाऊल ठेवत महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारनेही आता या कायद्याच्या दिशेने अधिकृत पाऊल टाकले आहे. समान नागरी कायद्याचा सर्वसमावेशक मसुदा तयार करण्यासाठी राज्य शासनाने निवृत्त न्या. रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखालील सात सदस्यीय तज्ज्ञ समितीची घोषणा केली. सहा महिन्यांत समितीने अहवाल द्यावा आणि हिवाळी अधिवेशनामध्ये हा कायदा मंजूर करावा, असा सरकारचा मानस आहे. उत्तराखंडमध्ये पुष्करसिंह धामी यांच्या सरकारने गेल्या वर्षी ७ फेब्रुवारी रोजी समान नागरी कायदा मंजूर करत इतिहास घडवला. असे करणारे स्वातंत्र्योत्तर भारतातील ते पहिले राज्य ठरले. मोदी सरकार, भाजपसाठी हा सोनेरी क्षण होता. कारण दोन दशकांहून अधिक काळ भाजपच्या जाहीरनाम्यांमध्ये या कायद्याचा उल्लेख असायचा. २०१४ पूर्वीचा काळ काँग्रेस आणि मित्रपक्षांच्या सरकारांचा असल्याने समान नागरी कायद्याबाबत ठोस पावले पडली नाहीत. भारतात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, पारसी, बौद्ध आणि शीख अशा विविध धर्मीय व विविध जाती-पोटजातींचे लोक शतकानुशतके एकत्र राहतात. सध्या भारतात फौजदारी कायदे सर्व नागरिकांसाठी समान आहेत. मात्र विवाह, घटस्फोट, वारसा हक्क, संपत्ती वाटप आणि दत्तक विधान या वैयक्तिक बाबींसाठी प्रत्येक धर्माचे स्वतःचे वैयक्तिक कायदे आहेत. या वैयक्तिक कायद्यांना रद्द करून देशातील अथवा राज्यातील सर्व नागरिकांसाठी एकच समान कायदा लागू करणे, हा समान नागरी कायद्याचा उद्देश आहे. यामुळे नागरिकाची ओळख कोणत्याही विशिष्ट जाती किंवा धर्मापुरती मर्यादित न राहता कायद्याच्या नजरेत तो केवळ आणि केवळ भारतीय नागरिक म्हणून ओळखला जाईल. विवाह, घटस्फोट, वारसा हक्क, दत्तक विधान आणि मालमत्तेची विभागणी यांसारख्या बाबींमध्ये सर्वधर्मीय नागरिक या कायद्यामुळे एकाच कायद्याच्या छत्राखाली येतील. विशेषतः महिलांच्या अधिकारांबाबत वेगवेगळ्या धर्मांतील तरतुदींमध्ये विसंगती दिसतात. या दृष्टीने पाहिल्यास सर्व नागरिकांना कौटुंबिक पातळीवर समान हक्क देणारा कायदा असणे ही काळाची गरज आहे. या कायद्याचे सर्वात मोठे स्वागत हे महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने व्हायला हवे. वेगवेगळ्या धार्मिक कायद्यांमुळे अनेकदा महिलांवर अन्याय होतो. बहुपत्नीत्व, बालविवाह, घटस्फोटाचे जाचक नियम आणि मालमत्तेतील दुजाभाव यांमुळे विविध समाजांतील महिलांना वर्षानुवर्षे कायदेशीर संघर्षाला तोंड द्यावे लागले आहे. समान नागरी कायद्यामुळे लग्नाचे किमान वय, विवाह नोंदणीची सक्ती, घटस्फोटाचे समान नियम आणि पोटगीचे अधिकार यांमध्ये समानता येईल. कौटुंबिक हिंसाचार किंवा पतीच्या निधनानंतर महिलांना मालमत्तेत मिळणारा समान वाटा हा त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल. त्यामुळे या कायद्याकडे सामाजिक सुधारणा आणि मानवी हक्कांच्या चौकटीतून पाहण्याची आवश्यकता आहे. मुस्लिम किंवा ख्रिश्चन समाजच नव्हे, तर हिंदू धर्मांतर्गत विविध जाती, जमाती आणि प्रांतांमध्ये विवाहाच्या आणि वारसा हक्काच्या वेगवेगळ्या परंपरा आहेत. त्यांच्यावर गदा आली, तर सामाजिक असंतोष निर्माण होऊ शकतो. म्हणूनच सात सदस्यीय समितीला मसुदा तयार करताना सावधगिरी बाळगावी लागेल. कायद्यात एकसमानता आणत असताना ती कोणाही जातीधर्माचे सांस्कृतिक अवकाश संकुचित करणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. विशिष्ट समुदायाला लक्ष्य करण्यासाठी हा कायदा आणला जात आहे, अशी भीती अल्पसंख्याक समुदायाच्या मनात निर्माण झाली अथवा तशी निर्माण करण्याचे प्रयत्न झाले, तर कायद्याचा मूळ उद्देशच भरकटून जाईल. गोवा हे देशातील एकमेव राज्य आहे, जिथे पोर्तुगीज राजवटीपासून (१८६७ चा पोर्तुगीज सिव्हिल कोड) सर्वधर्मीयांसाठी एकच नागरी कायदा लागू आहे आणि त्याअंतर्गत तिथे सर्वधर्मीय नागरिक गुण्यागोविंदाने राहात आहेत. मग महाराष्ट्रातही हा कायदा का लागू केला जाऊ नये, हा प्रश्न स्वाभाविक आहे. परंतु, गोवा हे भौगोलिकदृष्ट्या आणि लोकसंख्येच्या दृष्टीने छोटे राज्य आहे, गोव्याची सांस्कृतिक परंपरा वेगळी आहे. गोव्याचा पॅटर्न जसाच्या तसा लागू करणे व्यवहार्य नसल्याने महाराष्ट्राला स्वतःच्या गरजा आणि सामाजिक जडणघडण लक्षात घेऊनच आपला स्वतंत्र मार्ग निश्चित करावा लागेल. मध्य प्रदेशनंतर देशात सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या (१.५ कोटी) महाराष्ट्रात राहते. नंदूरबार, धुळे, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती (मेळघाट) आणि ठाणे-पालघर या पट्ट्यात भिल्ल, गोंड, वारली, कोरकू, माडिया यांसारख्या आदिवासी जमातीमध्ये समान नागरी कायद्याबाबत चिंतेचे वातावरण होते; पण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या कायद्याच्या कक्षेतून आदिवासींना वगळले जाईल, असे यापूर्वीच स्पष्ट केले आहे. आतापर्यंत कायदा केलेल्या राज्यांमध्ये आदिवासींना कायद्याच्या कक्षेतून वगळले आहे. महाराष्ट्रही तीच परंपरा कायम ठेवेल. अल्पसंख्याक संघटनांच्या मते, समान नागरी कायदा हा राज्यघटनेने कलम २५ आणि २६ अंतर्गत दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करतो. तसेच मुस्लिम पर्सनल लॉ (शरिया) अंतर्गत येणाऱ्या विवाह (निकाह), मेहेर, बहुपत्नीत्व आणि वारसा हक्काच्या नियमांमध्ये या कायद्यामुळे थेट बदल होणार आहेत. त्यांच्या मनातील संभ्रम आणि भीती दूर करून त्यांना विश्वासात घेणे आणि कायद्याचा मसुदा सर्वसमावेशक ठेवणे आवश्यक आहे. कोणत्याही कायद्याचे यश अंमलबजावणीवर अवलंबून असले तरी त्या कायद्याचा प्रभाव हा सामूहिक स्वीकारार्हतेवर अवलंबून असतो. हे लक्षात घेता समान नागरी कायदा हा सक्तीने लादण्याऐवजी व्यापक जनचर्चा, संवाद आणि सुधारणावादी दृष्टिकोनातून पुढे नेला पाहिजे. कलमे, नियम तयार करताना समिती राज्याची सामाजिक वीण तळाशी जाऊन समजून घेईल अशी अपेक्षा आहे. गावगाड्यातला महाराष्ट्र आणि शहरातल्या झगमगाटातला महाराष्ट्र वेगळा आहे. पांढरपेशा वर्गापेक्षा अधिक इथली माती कष्टकऱ्यांच्या घामाने भिजलेली आहे. त्या सर्वांत वर्षानुवर्षांचा अनुबंध आहे. समाजकंटकांकडून अनेक प्रयत्न होऊनही इथला जातीय-धार्मिक सलोखा मर्यादेपलीकडे बिघडला नाही. तो तसाच कायम ठेवत समान नागरी कायद्याची नौका पैलतीराला लावणे ही या समितीची सर्वांत मोठी जबाबदारी असणार आहे. महाराष्ट्राने नेहमीच देशाला सामाजिक सुधारणांची दिशा दाखवली आहे, नव्या कायद्याच्या निमित्ताने राज्य पुन्हा नवा आदर्श घालून देईल अशी अपेक्षा करूया.

# कचऱ्याच्या ढिगाखाली गाडलेली व्यवस्था

**कच-याचे डोंगर ही केवळ शहरांच्या स्वच्छतेवरील काळी छाया नाही तर ते बेजबाबदार प्रशासन, अपयशी नागरी नियोजन आणि पर्यावरणीय अन्यायाचे उघडक स्मारक आहे. मोशी दुर्घटनेने हा कटू सत्य नागरिकांसमोर निर्विवादपणे उभा केला आहे.**



पुणे जिल्ह्यातील मोशी येथील कचरा डेपोमध्ये घडलेली दुर्घटना ही केवळी एक डोंगराच्या कोसळण्याची घटना नसून भारतीय शहर प्रशासनाच्या निष्क्रियतेचे, स्थानिक स्वराज्य संस्थानच्या अपयशाचा आणि विकासाच्या नावाखाली पर्यावरणाशी धोकादायक खेळाचा परिणाम आहे.

मोशीतील दुर्घटनेत कच-याचा प्रचंड ढिगारा प्रशासकीय इमारतीवर कोसळला. या घटनेने एक मुलभूत प्रश्न विचारला आहे. ज्या कचरा डेपोमध्ये दररोज हजारो टन कचरा साचतो, तेथे सुरक्षिततेचे कोणते निकष काढले गेले होते? अशा अस्थिर कचऱ्याच्या टेकडीच्या पायथ्याशी इमारत उभारण्यास परवानगी कोणी दिली? भू-अभियांत्रिकी चाचण्या झाल्या होत्या का? आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा अस्तित्वात होता का? या प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत ही घटना 'अपघात' म्हणजे सत्याचा अपमान ठरेल. संयुक्त राष्ट्रांच्या अंदाजानुसार २०५० पर्यंत भारतातील ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शहरांमध्ये राहणार आहे. शहरे वाढली; परंतु कचरा व्यवस्थापनाची क्षमता त्या प्रमाणात वाढली नाही. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार भारतात दररोज अंदाजे १.६ ते १.७ लाख टन घनकचरा निर्माण होतो. त्यातील मोठ्या प्रमाणात कचऱ्यावर वैज्ञानिक प्रक्रिया होत नाही. परिणामी, हजारो एकरांवर उभे राहिलेले 'लॅंडफिल' म्हणजे प्रत्यक्षात प्रदूषणाचे आणि भविष्यातील दुर्घटनांचे कारखाने बनले आहेत.

मोशी डेपोमध्ये शहरातून दररोज सुमारे १,४०० ते १,५०० टन कचरा येतो. प्रक्रिया प्रकल्प असले, तरी दशकानुदशके साचलेला जुना कचरा आणि नवीन कचऱ्याचा वाढता भार यामुळे कचऱ्याचे डोंगर शंभर फुटांपेक्षा अधिक उंच झाले आहेत. ही केवळ दृश्य समस्या नव्हती; ती विज्ञानाने आधीच दिलेली धोक्याची घंटा होती. याहून गंभीर बाब म्हणजे या कचऱ्याच्या टेकड्या केवळ दुर्गंधी निर्माण करत नाहीत, तर त्या हवामान बदलालाही वेग देतात. जैविक कचऱ्याच्या विघटनातून मोठ्या प्रमाणात मिथेन वायू तयार होतो. आंतरसरकारी हवामान बदल पॅनेल (आयपीसीसी) आणि संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (यूएनईपी) यांच्या अहवालांनुसार मिथेन हा कार्बन डायऑक्साइडपेक्षा अनेक पटींनी अधिक प्रभावी हरितगृह वायू आहे. त्यामुळे प्रत्येक कचरा डेपो हा हवामान बदलाला चालना देणारा स्त्रोत ठरतो.

जागतिक बँकेच्या 'व्हॉट अ वेस्ट २.०' अहवालात स्पष्ट नमूद केले आहे, की घनकचऱ्याचे वैज्ञानिक व्यवस्थापन न केल्यास आरोग्य, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेवर प्रचंड आर्थिक भार पडतो. भारतात श्वसनाचे आजार, त्वचारोग, डेंगी, मलेरिया, जलजन्य आजार आणि कर्करोगाचा धोका वाढविणाऱ्या कारणांमध्ये अव्यवस्थित कचरा व्यवस्थापन महत्त्वाचा घटक मानला जात आहे. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद २१ प्रत्येक नागरिकाला सन्मानाने आणि सुरक्षित वातावरणात जगण्याचा अधिकार देतो. सर्वोच्च न्यायालयाने सुभाष कुमार विरुद्ध बिहार राज्य (१९९१) या प्रकरणात स्वच्छ पर्यावरण हा अनुच्छेद २१ चाच भाग असल्याचे स्पष्ट केले. राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) अनेक वेळा राज्य सरकारे आणि महापालिकांना वैज्ञानिक कचरा व्यवस्थापनाबाबत कठोर निर्देश दिले आहेत. तरीही मोशीसारख्या दुर्घटना घडत असतील, तर ती कायद्याची नव्हे, तर अंमलबजावणीच्या इच्छाशक्तीची शोकांतिका आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ हे स्त्रोतावर कचऱ्याचे वर्गीकरण, वैज्ञानिक प्रक्रिया, कंपोस्टिंग, पुनर्वापर, लैंडफिलचा मर्यादित वापर आणि जैववायू व्यवस्थापन अनिवार्य करतात. परंतु प्रत्यक्षात बहुसंख्य शहरांमध्ये ओला-सुका कचरा वेगळा करण्याची व्यवस्था अपुरी आहे. नागरिक वर्गीकरण करत नाहीत, स्थानिक संस्था ते काटेकोरपणे राबवत नाहीत आणि शेवटी सर्व कचरा एकाच डेपोमध्ये जमा होतो. नियमांची पुस्तके भरलेली आहेत; पण डेपो मात्र कचऱ्याने भरलेले आहेत. या व्यवस्थेतील मोठा दोष म्हणजे उत्तरदायित्वाचा अभाव. पूल कोसळतो, रुग्णालयाला आग लागते, इमारत ढासळते किंवा कचऱ्याचा डोंगर कोसळतो प्रत्येक वेळी चौकशी समिती नेमली जाते. काही अधिकारी बदलीवर जातात, काही कंत्राटदारांवर नोटिसा निघतात आणि काही महिन्यांनी सर्व काही विस्मरणात जाते. शिक्षा होत नाही, चुका पुन्हा होतात. भारतात अपघातांची पुनरावृत्ती ही नियती नसून दंडमुक्तीच्या संस्कृतीचा परिणाम आहे.

प्रगत देश, प्रभावी उपाय

'स्वच्छ भारत अभियान'ने जनजागृती केली, शौचालये उभारली, स्वच्छता स्पर्धा सुरू झाल्या, शहरांना पुरस्कार मिळाले. परंतु पुरस्कारांनी कचऱ्याचे डोंगर नाहीसे झाले नाहीत. शहरांच्या प्रवेशद्वारावर अजूनही दुर्गंधी, धूर आणि विषारी पाणी नागरिकांचे स्वागत करत आहे. जगातील अनेक देशांनी या प्रश्नावर प्रभावी उपाय शोधले आहेत. स्वीडन आपल्या कचऱ्याच्या मोठ्या भागापासून ऊर्जा निर्माण करते. जपानमध्ये स्त्रोतावर अत्यंत काटेकोर वर्गीकरण केले जाते. दक्षिण कोरियाने अन्नकचऱ्याचे स्वतंत्र व्यवस्थापन करून त्याचे पुनर्चक्रण जवळपास सार्वत्रिक केले आहे. सिंगापूरने अत्याधुनिक इन्सिनरेशन आणि पुनर्वापर तंत्रज्ञानाद्वारे लॅंडफिलवरील अवलंबित्व कमी केले आहे. भारतातही अशी तंत्रज्ञाने उपलब्ध आहेत; अभाव आहे तो सातत्यपूर्ण राजकीय इच्छाशक्तीचा आणि शिस्तबद्ध अंमलबजावणीचा !

मोशी दुर्घटनेने आणखी एक प्रश्न उपस्थित केला आहे तो म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षमतेचा. भारतीय राज्यघटनेतील ७४ वी घटनादुरुस्ती शहरांच्या नियोजनाची जबाबदारी महापालिकांना देते. परंतु आर्थिक स्वायत्तता, प्रशिक्षित मनुष्यबळ, आधुनिक तंत्रज्ञान आणि दीर्घकालीन नियोजन यांच्या अभावामुळे अनेक महापालिका दैनंदिन कचरा उचलण्यापलीकडे विचार करू शकत नाहीत. परिणामी, तात्पुरते उपाय कायमस्वरूपी धोरण बनतात. उपायही तितकेच स्पष्ट आहेत. प्रत्येक शहरासाठी वैज्ञानिक 'झीरो वेस्ट' धोरण, स्त्रोतावर शंभर टक्के वर्गीकरण, विकेंद्रित कंपोस्टिंग, बायोगॅस प्रकल्प, प्लॅस्टिक पुनर्प्रक्रिया, जुने लॅंडफिल बायोमायनिंगद्वारे हटविणे, डेपोची भू-स्थैर्य तपासणी, मिथेन संकलन व्यवस्था, डिजिटल निरीक्षण प्रणाली आणि महत्त्वाचे म्हणजे निष्काळजी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर वैयक्तिक फौजदारी जबाबदारी निश्चित करावी लागेल. केवळ कंत्राटदारांवर दोष ढकलून ही समस्या सुटणार नाही. नागरिकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. कचरा घराबाहेर टाकला म्हणजे जबाबदारी संपली, ही मानसिकता बदलावी लागेल. कमी कचरा निर्माण करणे, पुनर्वापर वाढविणे, ओला-सुका कचरा वेगळा करणे ही लोकसहभागाची मूलभूत पावले आहेत.

पर्यावरणाचे रक्षण ही - केवळ सरकारची नव्हे, तर समाजाचीही सामूहिक जबाबदारी आहे. मोशी दुर्घटनेने महाराष्ट्राला एक कठोर इशारा दिला आहे. हा इशारा दुर्लक्षित केला, तर उद्या आणखी एखादा कचऱ्याचा डोंगर कोसळेल आणि त्याखाली पुन्हा निष्पाप जीव गाडले जातील.

**सत्यसाई पी. एम.**
मो.७२४८९९२३२३

# आर्थिक विषमतेचे नैतिक परिमाण

२०२५ अखेरीस भारतात ९,४४,००० नागरिक डॉलर्स मिलिनॉयर आहेत. डॉलर मिलिओनॉयर म्हणजे ९ ते १० कोटी रुपयांची किंवा जास्त संपत्ती असणाऱ्या व्यक्ती. भारतातील त्यांची संख्या वेगाने वाढत आहे. उदा. २०२५ या फक्त एका वर्षात या क्लबमध्ये पहिल्यांदा सामील झालेल्यांची संख्या ३१,००० आहे. जी इतर पिअर ग्रुप देशांपेक्षा सर्वात जास्त आहे. याचे प्रतिबिंब अर्थातच आर्थिक विषमतेमध्ये पडत आहे. आर्थिक विषमता गिनी निर्देशांक (Gini coefficient) मार्फत मोजली जाते.

गिनी निर्देशांक शून्य ते एक या स्केलवर मोजला जातो. शून्य म्हणजे आदर्श आर्थिक समानता; 'एक' म्हणजे टोकाची आर्थिक विषमता. दुसऱ्या शब्दात निर्देशांक जेवढा जास्त तेवढी विषमता जास्त. काही वर्षांनी निर्देशांक वाढला म्हणजे त्या काळात आर्थिक विषमता वाढली असा निष्कर्ष काढता येतो. ब्रिक्स देशांच्या समूहात २०२५ अखेरीस खलील गिनी निर्देशांक आहेत. ब्राझील ०.८१; रशिया ०.८२ ; चीन ०.६ ; दक्षिण आफ्रिका ०.८१ भारतासाठी ०.७४; २००८ मध्ये भारताचा गिनी निर्देशांक ०.६२ होता. म्हणजे गेल्या १७ वर्षांत आपल्या देशातील आर्थिक विषमता वाढत आहे.

श्रीमंत लोक आपली संपत्ती प्रामुख्याने वित्तीय मत्ता/ financial assets आणि जमिनी/ रियल इस्टेट यामध्ये ठेवतात. पण इतर देशांच्या तुलनेत भारतातील फक्त २६ टक्के संपत्ती वित्तीय मत्तांमध्ये आहे. याचा अर्थ असा की भारतातील श्रीमंत आपली संपत्ती मोठ्या प्रमाणावर जमीनी / रियल इस्टेट मध्ये ठेवत आहेत. त्या तुलनेत अमेरिकेतील आणि चीनमधील श्रीमंतांनी अनुक्रमे ८० टक्के आणि ५२ टक्के संपत्ती वित्तीय मत्तांमध्ये ठेवलेली आहे.

आर्थिक विषमतेला गंभीर नैतिक परिमाण आहेच आहे. पण ती टीका थोडावेळ बाजूला ठेवूया. शुद्ध आर्थिक दृष्टिकोनातून बघितले तरी टोकाच्या आर्थिक विषमतेचे गंभीर विपरीत परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दीर्घकालीन आरोग्यावर होत असतात. कसे ते बघूया

१. कोणत्याही कुटुंबाची मासिक, वार्षिक आमदनी काही पटींनी वाढली तरी त्या कुटुंबाचे मासिक वार्षिक खर्च काही त्या पटीमध्ये कधीच वाढत नाहीत. मग त्यातील मोठा हिस्सा गुंतवणुकीमध्ये वळतो. उपभोगाकडे कमी. उलटपक्षी गरीब निम्न मध्यमवर्गीय कुटुंबाचे मासिक वार्षिक उत्पन्न वाढले तर त्यातील मोठा हिस्सा उपभोगवर खर्च होत असतो.

२. याचा संबंध अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याशी आहे. दुसऱ्या शब्दात देशात आर्थिक विषमता जेवढी जास्त तेवढी अर्थव्यवस्थेत मंदी येण्याची शक्यता देखील जास्त असते. कारण श्रीमंत लोकांनी अगदी ओकारी येईपर्यंत खरेदी केली तरी मुठभर श्रीमंत कुटुंबे करून करून किती खरेदी करणार? वस्तुमाल/सेवांचा पुरेसा उठाव झाला नाही तर नवीन उत्पादन क्षमता निर्मिती, नवीन भांडवली गुंतवणूक मंदावते, रोजगार निर्मिती कमी होते , पुन्हा लोकांची क्रयशक्ती कमी राहते. अर्थव्यवस्था दुष्टचक्रात सापडते.

३. आपल्या देशातील वित्तीय मार्केट्स तेजीत असण्याचा संबंध श्रीमंतांकडे मोठ्याप्रमाणावर पैसा जाण्याशी आहे. सर्वांनाच ट्रिपल ए शेयर्स हवे असतात. मार्केट्स लिक्विडीटी ड्रिव्हन होतात. त्यातून स्पेक्युलेटिव्ह बबल्स तयार होऊ शकतात.

४. भारतातील श्रीमंतांची संख्या वेगाने वाढत असल्यामुळे ब्रोकिंग, वेल्थ मॅनेजमेंट, पोर्टफोलिओ मॅनेजमेंट हे व्यवसाय तेजीत आहेत.

५. श्रीमंताच्या या गुंतवणुकी प्रायव्हेट इक्विटी, प्रायव्हेट क्रेडिट, alternate investment funds अशा ठिकाणी गुंतवल्या जात आहेत. याला शॅडो बँकिंग क्षेत्र म्हणतात. त्यामुळे बँकिंग/ भांडवल बाजारांच्या नियामक मंडळाचे नियंत्रण कमकुवत राहते. अचानक काहीतरी घडते आणि फक्त बँकिंग/वित्त क्षेत्र नाही तर अर्थव्यवस्था खाईत ढकलली जाऊ शकते. या सगळ्याची आकडेवारी नेटवर उपलब्ध आहे.

६. गरीब/निम्न मध्यमवर्गीयांकडे क्रयशक्ती नसणे, शासनाने सामाजिक क्षेत्रातून अंग काढून घेणे याचा परिणाम कोट्यवधी नागरिकांच्या आरोग्यावर, फिटनेस वर, कोवळ्या /तरुण वयातील पिढीच्या शिक्षणावर कौशल्यावर होतो. त्याचे परिणाम या नागरिकांच्या/तरुणांच्या वर होतातच. पण देशाच्या/अर्थव्यवस्थेच्या उत्पादकतेवर होतात. जगात स्पर्धात्मकता कमी होते.

श्रीमंत लोक श्रीमंत का होतात? तर ते उच्च शिक्षण घेतात, अभ्यास करतात, हुशार असतात, मेहनत घेतात, बारा बारा तास काम करतात असे नॅरेटिव्ह अगदी सामान्य नागरिकांच्या डोक्यात फिट्ट बसवले गेले आहे. त्यामुळे प्रतिक्रिया येत नाहीत.

मुठभर श्रीमंत लोक अप्पलपोटे आहेतच. पण श्रीमंत गरीब या बायनरीच्या पलीकडे बरेच काही असते. त्याची जबाबदारी राज्यकर्ते/धोरणकर्ते यांच्यावर असते. राजकीय नेत्यांचे बाजूला ठेवूया. कारणे सर्वांना माहीत आहेत. पण ज्यांचा काही स्वतःचा छुपा अजेंडा किमान वरकरणी तरी दिसत नाही असे मुख्य प्रवाहातील अर्थतज्ज्ञ घ्या. शासनाच्या अर्थव्यवस्थेतील सहभागाचा अर्थव्यवस्थेवर (त्यांच्या म्हणण्याप्रमाणे) विपरीत परिणाम होणार असा बुद्धिभेद करत जेवढा जीव तोडून विरोध करतात त्याच्या एक दशांश ऊर्जा वाढत्या टोकाच्या आर्थिक विषमतेचा अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या विपरीत परिणामबद्दल लावत नाहीत. वाईट वाटते. समानतेचा आग्रह करणाऱ्यांनी देखील विषमता का नको यासाठी वरील वस्तुनिष्ठ मांडणी केली तर त्या मागणीचे अपील पाया अधिक व्यापक होईल. राजकीय मागण्यांमध्ये नंबर निर्णायक ठरतात.

**संजीव चांदोरकर**

# दुबार पेरणीचे संकट : निकृष्ट सोयाबीन बियाण्यांचा हिशोब सरकारने जाहीर करावाच!



विदर्भातील शेतकरी आज पुन्हा एकदा नैसर्गिक आपत्तीमुळे नव्हे, तर व्यवस्थेच्या निष्काळजीपणामुळे संकटात सापडला आहे. यंदा अनेक ठिकाणी पेरणीनंतर सोयाबीनचे बियाणे उगवलेच नाही. लाखो रुपयांचा खर्च करून, वेळेवर पेरणी करूनही शेतकऱ्यांच्या शेतात अपेक्षित उगवण झाली नाही. परिणामी हजारो शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट कोसळले आहे. या परिस्थितीला केवळ पाऊस किंवा हवामान जबाबदार धरून चालणार नाही. निकृष्ट दर्जाचे बियाणे बाजारात कसे आले, त्याची जबाबदारी कोणाची आणि त्याची किंमत कोण मोजणार, या प्रश्नांची उत्तरे सरकारने आणि बियाणे उत्पादक कंपन्यांनी द्यायलाच हवीत.

राज्य सरकारने तातडीने सर्व बियाणे उत्पादक कंपन्यांकडून विदर्भात किती सोयाबीन बियाण्यांची विक्री करण्यात आली, कोणत्या जिल्ह्यात किती पोती पाठविण्यात आली, कोणत्या वाणाचे किती बियाणे विकले गेले आणि कोणत्या वितरकांमार्फत ते बाजारात पोहोचले याचा संपूर्ण लेखाजोखा मागवावा. ही माहिती सार्वजनिक करावी. कारण आज शेतकरी अंधारात आहे, पण कंपन्यांकडे प्रत्येक पोत्याचा हिशोब आहे.

यासोबतच सरकारने प्रत्येक बियाणे उत्पादक कंपनीला बीजोत्पादनाचा संपूर्ण तपशील सार्वजनिक करण्याचे आदेश द्यावेत. कोणत्या शेतकऱ्याला सीड प्लॉट (बीजोत्पादन प्लॉट) देण्यात आला होता, त्या शेतकऱ्याचे नाव, संपूर्ण पत्ता, गाव, तालुका, जिल्हा, किती क्षेत्रावर बीजोत्पादन झाले, कोणत्या जातीचे सोयाबीन पिकविण्यात आले, त्या शेतकऱ्याकडून किती क्विंटल उत्पादन खरेदी करण्यात आले, त्या उत्पादनाचा कोणत्या बियाण्याच्या लॉटमध्ये वापर करण्यात आला आणि त्याची अंकुरण व गुणवत्ता चाचणीचे अहवाल काय आहेत, हा संपूर्ण तपशील सरकारकडे सादर करून सार्वजनिक करावा. जर कंपन्या हा तपशील देऊ शकत नसतील, तर बाजारातून सोयाबीन खरेदी करून त्यालाच बियाण्याचा दर्जा देण्यात आला का, अशी शंका अधिक बळकट होते. त्यामुळे या संपूर्ण व्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी आढळणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे.

यंदा अनेक शेतकऱ्यांमध्ये अशी चर्चा आहे की काही बियाणे उत्पादक कंपन्यांनी प्रमाणित बीजोत्पादन न करता बाजारातूनच पांढऱ्या फुलाच्या सोयाबीनची खरेदी केली आणि त्यावर प्रक्रिया करून तेच बियाणे म्हणून विकले. हा आरोप गंभीर आहे आणि त्याची निष्पक्ष चौकशी होणे अत्यावश्यक आहे. जर यामध्ये तथ्य आढळले, तर हा प्रकार शेतकऱ्यांच्या विश्वासघाताचा असून संबंधित कंपन्यांवर फौजदारी कारवाई झाली पाहिजे.

सरकारने प्रत्येक कंपनीकडून पुढील माहिती मागवावी. विदर्भात किती पोती बियाणे विकले, कोणत्या वाणाचे किती प्रमाण होते, प्रत्येक लॉट क्रमांक कोणता होता, अंकुरण चाचणी कोणी केली, प्रयोगशाळेचे अहवाल काय आहेत आणि कोणत्या जिल्ह्यात कोणत्या वितरकाला किती माल पुरविण्यात आला. ही माहिती सार्वजनिक झाल्यास दोषी कोण आहे हे स्पष्ट होईल.

दुबार पेरणी म्हणजे फक्त पुन्हा बियाणे टाकणे नव्हे. त्यासाठी पुन्हा ट्रॅक्टर, इंधन, मजुरी, बियाणे, खते, औषधे आणि वेळ यांचा अतिरिक्त खर्च करावा लागतो. अनेक शेतकरी कर्ज काढून शेती करतात. पहिल्याच पेरणीत नुकसान झाल्यावर त्यांच्याकडे पुन्हा गुंतवणूक करण्यासाठी पैसे नसतात. त्यामुळे काही जण कर्जबाजारी होतात, तर काही शेतीच सोडण्याच्या मानसिक अवस्थेत जातात.

शेतकरी प्रमाणित बियाणे विकत घेतो, कारण त्याला सरकारच्या मान्यतेवर आणि कंपनीच्या विश्वासार्हतेवर विश्वास असतो. जर तेच बियाणे उगवले नाही, तर त्याची संपूर्ण जबाबदारी बियाणे उत्पादक कंपनी आणि नियंत्रण यंत्रणेवर निश्चित झाली पाहिजे.

आज प्रश्न फक्त यंदाच्या सोयाबीनचा नाही. हा प्रश्न संपूर्ण बियाणे व्यवस्थेवरील विश्वासाचा आहे. त्यामुळे सरकारने बियाणे उत्पादक कंपन्यांचा संपूर्ण लेखाजोखा सार्वजनिक करावा, सीड प्लॉटपासून ते विक्रीपर्यंत प्रत्येक टप्प्याची चौकशी करावी, पांढऱ्या फुलाच्या सोयाबीनबाबतचे आरोप निष्पक्षपणे तपासावेत आणि दुबार पेरणीच्या संकटात सापडलेल्या प्रत्येक शेतकऱ्याला नुकसानभरपाईसह न्याय द्यावा. अन्यथा शेतकऱ्यांच्या विश्वासाची ही फसवणूक कधीच थांबणार नाही.

**विलास तुळशीराम ताथोड**
राज्य कार्यकारणी
सदस्य, शरद जोशी द्वारा स्थापित

# रामदास आठवले सूतगिरणीचा धागा सातासमुद्रापार..!

## चीनच्या बाजारपेठेत थेट निर्यात, संस्थापक अध्यक्ष मिलिंद मानकर यांच्या हस्ते कंटेनरचे पूजन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**दिग्रस, दि. १६ :** यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस येथील रामदास आठवले मागासवर्गीय कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणीने अल्पावधीतच उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या उच्च प्रतीच्या धाग्याची थेट चीनच्या बाजारपेठेत निर्यात सुरू केली आहे. संस्थापक अध्यक्ष मिलिंद मानकर यांच्या हस्ते धाग्याच्या कंटेनरचे पूजन करून हा पहिला निर्यात माल जहाजमार्गे रवाना करण्यात आला. त्यामुळे दिग्रससह संपूर्ण विदर्भासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

६ डिसेंबर २०१९ रोजी भूमिपूजन झालेल्या या सूतगिरणीच्या उभारणीला कोरोनासारख्या संकटाचा मोठा फटका बसला होता. मात्र, सर्व अडचणींवर मात करत २०२५ मध्ये गिरणी उत्पादनाखाली आली. विशेष म्हणजे, मागील दशकात नोंदणीकृत झालेल्या सूतगिरण्यांपैकी प्रत्यक्ष उत्पादन सुरू करून आंतरराष्ट्रीय बाजारपेठ गाठणारी ही राज्यातील मोजकीच सहकारी सूतगिरणी ठरली आहे.गिरणीत उत्पादित धाग्याची गुणवत्ता तपासण्यासाठी चीनमधील तज्ज्ञ पथकाने विविध तांत्रिक चाचण्या घेतल्या. सर्व निकषांवर धागा यशस्वी ठरल्यानंतरच चीनच्या बाजारपेठेने त्याला मान्यता दिली. सध्या गिरणीत २५ हजार चात्यांची क्षमता असून १६,५०० चाते कार्यरत आहेत. दररोज १० ते १२ टन सूत उत्पादन होत असून मागील १८ महिन्यांत सुमारे ५,५०० टन धाग्याचे उत्पादन झाले आहे. दोन शिफ्टमध्ये २०० हून अधिक कर्मचारी कार्यरत असून उर्वरित चाते सुरू झाल्यानंतर आणखी शेकडो रोजगार निर्माण होणार आहेत. यशाचे श्रेय देताना अध्यक्ष महेंद्र मानकर यांनी संचालक मंडळ, व्यवस्थापकीय संचालक एल. आर. बेहरा, तांत्रिक पथक, कामगार तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री रामदास आठवले आणि पालकमंत्री संजय राठोड यांच्या सहकार्याचा उल्लेख केला. या प्रसंगी संचालक प्रा. मधुकर वाघमारे, अविनाश कुलदीपके, धर्मराज गायकवाड, जनरल मॅनेजर एल. आर. बेहरा, श्रेयश मानकर तसेच अधिकारी, कर्मचारी आणि कामगार उपस्थित होते.

> "दिग्रसची सूतगिरणी आता केवळ जिल्ह्याची नव्हे, तर देशाच्या निर्यात क्षमतेचे प्रतीक बनत आहे. शासनाकडून अधिक अनुदान मिळाल्यास उत्पादनात मोठी वाढ करून चीनसह इतर देशांनाही मोठ्या प्रमाणावर धागा पुरविण्याची आमची क्षमता आहे. यामुळे रोजगारनिर्मिती आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांनाही मोठा फायदा होईल."
>
> — नवनीत महाजन,
> उपाध्यक्ष, रामदास आठवले मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी

# दोन बैल चोरीच्या गुन्ह्यांचा पर्दाफाश ६ आरोपी अटकेत..! १०.०५ लाखांचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. १६ :** पांढरकवडा पोलिसांनी शेतकऱ्यांचे बैल चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत दोन वेगवेगळ्या बैल चोरीच्या गुन्ह्यांतील ६ आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून चोरीसाठी वापरलेली चारचाकी, दुचाकी, मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा एकूण १० लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जून २०२६ मध्ये मांगुर्डा व धनमोड शेतशिवारातून गोठ्यातील चार बैल चोरीला गेल्याप्रकरणी पांढरकवडा पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले होते. पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा शोध घेत त्यांना अटक केली.पहिल्या गुन्ह्यात धृप तूमके, सैय्यद अकीब खान व शाहरुख खान यांना अटक करून त्यांच्याकडून सुमारे ४.५० लाखांचे चारचाकी वाहन जप्त करण्यात आले. दुसऱ्या गुन्ह्यात अभिषेक मडावी, राकेश चौधरी व अभय उर्फ दुर्लभ मेश्राम यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून ४ लाखांचे वाहन, ४५ हजारांची दुचाकी, १.१० लाखांचे पाच मोबाईल तसेच बैल विक्रीची रोख रक्कम जप्त करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंथा, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक रोबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पांढरकवडा पोलिसांकडून सुरू आहे.

# सोनम वांगचुक यांच्या जीवाची जबाबदारी कोण घेणार?

## माजी मंत्री ॲड. शिवाजीराव मोघे यांचा सरकारला सवाल, जंतर-मंतरवरील उपोषणाकडे सरकारचे दुर्लक्ष

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १६ :** जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या उपोषणाकडे केंद्र सरकारने तातडीने लक्ष देऊन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक, वैज्ञानिक, पर्यावरणवादी व गांधीवादी सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीची दखल घ्यावी आणि त्यांचे प्राण वाचवण्यासाठी त्वरित पुढाकार घ्यावा, अशी मागणी माजी मंत्री ॲड. शिवाजीराव मोघे आणि दशरथ मडावी यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत केली.

यावेळी त्यांनी आरोप केला की, नीट (NEET) पेपरफुटीमुळे देशातील सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांचे नुकसान झाले असून त्याची नैतिक जबाबदारी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी स्वीकारून राजीनामा द्यायला हवा होता. मात्र, अद्याप त्यांनी कोणतीही जबाबदारी स्वीकारलेली नसल्याची टीका करण्यात आली. मोघे म्हणाले की, जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देत सोनम वांगचुक यांनीही उपोषण सुरू केले असून त्याला १८ दिवस उलटले आहेत. प्रकृती अत्यंत खालावत असतानाही केंद्र सरकारने कोणतीही संवेदनशील भूमिका घेतलेली दिसत नाही. पंतप्रधान किंवा केंद्रीय मंत्रिमंडळातील वरिष्ठ मंत्र्यांनी स्वतः जंतर-मंतर येथे जाऊन आंदोलनकर्त्यांशी संवाद साधून उपोषण सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी त्यांची मागणी आहे. इतिहासाचा दाखला देताना मोघे यांनी सांगितले की, १९८४ मध्ये लडाखमधील आंदोलनादरम्यान तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन उपोषण सोडविण्यासाठी पुढाकार घेतला होता. आजही त्याच संवेदनशीलतेची अपेक्षा देशवासीयांना असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी अण्णा हजारे यांच्या आंदोलनाचा संदर्भ देत, काही आंदोलनांची सरकारकडून तातडीने दखल घेतली जाते. मात्र संविधानिक मार्गाने सुरू असलेल्या या उपोषणाकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत असल्याचा आरोप केला. दशरथ मडावी यांनीही नीट पेपरफुटीच्या प्रकरणात विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याचे सांगत, शिक्षणमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. देशात लोकशाही टिकवायची असेल तर सत्ताधाऱ्यांनी संवेदनशीलता आणि उत्तरदायित्व दाखवणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. पत्रकार परिषदेत सरकारने राजकीय मतभेद बाजूला ठेवून सोनम वांगचुक यांच्या जीविताच्या संरक्षणाला प्राधान्य द्यावे, संवादातून तोडगा काढावा आणि उपोषण तातडीने समाप्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

# दिग्रस मध्ये अवैध धंद्यांचा सुळसुळाट..!

## पोलिसांच्या भूमिकेवर नागरिकांकडून गंभीर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दिग्रस, दि. १६ :** दिग्रस शहरासह तालुक्यातील मोख-आरंभी, सिंगद-मांडवा व इतर ग्रामीण सर्कलमध्ये अवैध दारूविक्री, मटका, जुगार आणि गुटखा विक्रीचे प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. शहरातील मेन चौक, आर्णी चौक, शंकर टॉकीज चौक, गजानन टॉकीज, चमनपुरा आदी भागांमध्ये हे प्रकार उघडपणे सुरू असल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या अवैध धंद्यांमुळे परिसरातील युवक व्यसनाधीन होत असून अनेक कुटुंबांचे आर्थिक व सामाजिक नुकसान होत आहे. रात्री उशिरापर्यंत मद्यपान, भांडणे, गोंधळ आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होत असल्याची तक्रार आहे. काही ठिकाणी अल्पवयीन मुलांचाही अशा गैरप्रकारांशी संबंध येत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. महिलांनी वेळोवेळी विरोध दर्शवून कारवाईची मागणी केली असली तरी परिस्थितीत अपेक्षित बदल झालेला नसल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत. पोलिसांकडून अधूनमधून कारवाई होत असली तरी काही दिवसांतच अवैध धंदे पुन्हा सुरू होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिसरातील गावांची शांतता, सुरक्षितता आणि सामाजिक वातावरण अबाधित ठेवण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने प्रभावी व सातत्यपूर्ण कारवाई करून अवैध धंद्यांना कायमस्वरूपी आळा घालावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## थोडक्यात



### MS-CIT परीक्षेत आरती गाढबैले ची शतकीय कामगिरी..!

**१०० पैकी १०० गुण मिळवत तालुक्यात अव्वल**

**महागाव :** महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (MSBTE) व एमकेसीएल (MKCL) यांच्या वतीने घेण्यात आलेल्या MS-CIT परीक्षेत महागाव येथील श्री कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थिनी कु. आरती गाढबैले हिने १०० पैकी १०० गुण मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. डिजिटल युगातील संगणक साक्षरतेचे महत्त्व ओळखून आरतीने सातत्यपूर्ण अभ्यास आणि मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले. संस्थेचे संचालक मंगेश पाटील वानखेडे व मार्गदर्शक शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा तिला लाभ झाला. या यशानिमित्त संस्थेत आयोजित गुणगौरव सोहळ्यात आरतीचा सन्मानचिन्ह व पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. यावेळी मंगेश पाटील वानखेडे यांनी,योग्य मार्गदर्शन, नियमित सराव आणि विद्यार्थ्यांची जिद्द यामुळे शंभर टक्के यश मिळविता येते, असे सांगितले. आरतीनेही आपल्या यशाचे श्रेय आई-वडील आणि संस्थेच्या दर्जेदार शिक्षण पद्धतीला दिले.



### केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक दिलीप जाधव यांना सेवानिवृत्ती निरोप.!

**पुसद :** दिलीप जाधव हे मुळचे मोहदी ता.महागांव येथील रहिवासी आहेत.जेमतेम १२ वी पर्यंतचे शिक्षण पि.एन.कॉलेज पुसद येथे झाले.व १९९० मध्ये ते गडचिरोली जिल्हा पोलीसात भरती झाले. त्यांनी ३६ वर्षे चांगल्याप्रकारे सेवा दिली.एक पोलीसातील माणुस म्हणुन त्यांनी प्रत्येक नागरीकांशी संबंध जोपासले.३० जुन २०२६ रोजी यवतमाळ जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक कुमार चिंता यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्यानंतर दि.४ जुलै २०२६ रोजी जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक सुनिल नाईक यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस कर्मचारी यांच्या वतीने सत्कार करुन निरोप संभारंभ देण्यात आला.दि.५ जुलै २०२६ रोजी दिपक आसेगांवकर ,सेवानिवृत्त DYSP डी.बी.चव्हाण , सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक वाघुजी खिल्लारे व पत्रकार संघाचे ता.अध्यक्ष ललीत सेता यांचे प्रमुख उपस्थितीत सेवापुर्ती सत्कार सोहळा कार्यक्रम सर्वांच्या उपस्थित संपन्न झाला.यावेळी बरेच नातेवाईक ईष्ट मित्र व त्यांना मानवाला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



### 'नमस्ते दिन २०२६' निमित्त सफाई कर्मचाऱ्यांना साहित्याचे वाटप

**उमरखेड :** स्वच्छ सर्वेक्षण २०२६ अंतर्गत 'नमस्ते दिन २०२६' निमित्त नगर परिषद उमरखेड यांच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांना आवश्यक स्वच्छता साहित्याचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचा उद्देश शहर स्वच्छतेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे, त्यांच्या कार्याचा गौरव करणे तसेच स्वच्छ, सुंदर आणि निरोगी उमरखेड घडविण्यासाठी त्यांना आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देणे हा होता.यावेळी सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामासाठी आवश्यक असलेले स्वच्छता साहित्य वितरित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी सफाई कर्मचाऱ्यांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे असून, शहराच्या स्वच्छतेत त्यांचे योगदान अमूल्य असल्याचे सांगून त्यांचा गौरव केला.नगर परिषद उमरखेड नागरिकांना स्वच्छता राखणे, ओला व सुका कचरा वेगळा करणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२६ मध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करत आहे.

# 'दोन जन्मात अंतर, कुटुंब सुदृढ निरंतर'चा संदेश..!

## यवतमाळात जागतिक लोकसंख्या दिन उत्साहात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. १६ :** वाढत्या लोकसंख्यीच्या पार्श्वभूमीवर कुटुंब नियोजनाबाबत जनजागृती करण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागातर्फे जिल्हास्तरीय जागतिक लोकसंख्या दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या वसंतराव नाईक सभागृहात आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले.

यंदाच्या अभियानाची संकल्पना "दोन जन्मात अंतर, कुटुंब सुदृढ निरंतर" अशी आहे. ११ ते १८ जुलैदरम्यान विविध माध्यमांतून कुटुंब नियोजन व माता-बाल आरोग्याबाबत जनजागृती केली जाणार आहे. यावेळी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. रमेश मांडण, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. प्रशांत घोडाम, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. क्रांतीकुमार नावंदिकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी डॉ. सुभाष ढोले म्हणाले, सुखी, निरोगी आणि सक्षम कुटुंबासाठी कुटुंब नियोजनाची साधने स्वीकारणे ही काळाची गरज असून, प्रत्येक नागरिकापर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा व जनजागृती पोहोचविण्यास आरोग्य विभाग कटिबद्ध आहे. कार्यक्रमात जिल्ह्यातील कुटुंब कल्याण व आरोग्य कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. माता-बाल आरोग्य सुधारण्यासाठी आणि लोकसंख्या स्थिर ठेवण्यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन डॉ. रमेश मांडण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# काळी (दौ.) येथे वरळी मटक्याचा खुलेआम बोलबाला..!

## कारवाईची मागणी, नागरिक आक्रमक, कारवाईकडे लक्ष

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १६ :** पुसद तालुक्यातील काळी (दौ.) येथे अवैध वरळी मटका आणि जुगाराचे प्रकार खुलेआम सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला असून, तातडीने कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. मुख्य बाजारपेठेसह मोहदी रोड आणि काळी–दिग्रस मार्गावरील काही ठिकाणी सर्रास मटका सुरू असल्याची चर्चा परिसरात आहे.

त्यामुळे पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या गावात अनेक महिन्यांपासून अवैध धंदे सुरू असूनही प्रभावी कारवाई झालेली दिसून येत नाही. यामुळे तरुण, मजूर आणि शेतकरी कमी वेळेत अधिक पैसे मिळविण्याच्या मोहापायी आर्थिक नुकसान सहन करत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे. पावसाअभावी आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचे खत, बियाणे व मजुरीसाठी राखून ठेवलेले पैसेही मटक्यात जात असल्याची चिंता व्यक्त होत आहे. अवैध जुगार व मटका व्यवसायामुळे सामाजिक वातावरण बिघडण्याची तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे संबंधित ठिकाणांची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, मटका व्यवसायाला कथित संरक्षण दिले जात असल्याच्या चर्चांचीही परिसरात जोरदार चर्चा असली, तरी या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. नव्याने रुजू झालेल्या उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# विकासकामांचा वेग वाढवा, अन्यथा आंदोलनाचा इशारा..!

## झरीजामणी गटविकास अधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरीजामणी, दि. १६ :** झरीजामणी पंचायत समिती अंतर्गत रखडलेली विकासकामे तातडीने पूर्ण करावीत, शासकीय योजनांची प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी करावी तसेच ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्नांना प्राधान्याने न्याय द्यावा, या मागण्यांसाठी भीम एकजूट सैनिक ऑल इंडिया महाराष्ट्र राज्य कामगार संघटनेने गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

१३ जुलै रोजी पंचायत समिती कार्यालयात हे निवेदन देण्यात आले. संघटनेने विकासकामांतील दिरंगाई,अपुरा पाणीपुरवठा, रस्ते, शाळा, सार्वजनिक सुविधा आणि ग्रामपंचायतींना वेळेवर निधी न मिळाल्यामुळे ग्रामीण नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप केला. तसेच रोजगार हमी योजनेत पारदर्शकता राखणे, युवकांसाठी कौशल्य विकास व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि महिलांच्या स्वयंरोजगाराला चालना देण्याची मागणीही करण्यात आली. गटविकास अधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारून संबंधित विभागांशी समन्वय साधत योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. यावेळी जिल्हाध्यक्ष भीमराज नगराळे, तालुकाध्यक्ष नितीन शंकर लांडे, जगदीश पाटील यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ध्येय, शिस्त आणि सातत्यानेच यश..- प्रा. पुनीत मातकर यांचा प्रेरणादायी मंत्र

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १६ :** दाते कॉलेज, यवतमाळ येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-२०२०) अंतर्गत नवागत विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ समारंभ उत्साहात पार पडला. प्रमुख पाहुणे तथा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) यवतमाळचे अधिव्याख्याता प्रा. पुनीत मातकर यांनी विद्यार्थ्यांना ध्येयपूर्ण जीवन जगण्याचा संदेश देत, "मोठी स्वप्ने पाहा, सातत्य, परिश्रम आणि शिस्त या त्रिसूत्रीच्या बळावर यश निश्चित मिळते," असे प्रतिपादन केले.

शिक्षणासोबत वाचन, मूल्यसंस्कार आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे आवाहनही त्यांनी केले. अध्यक्ष विनायकजी (दादा) दाते यांनी शिक्षण हे केवळ पदवीपुरते मर्यादित नसून उत्तम नागरिक घडविण्याचे माध्यम असल्याचे सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेश सिंगरू होते. त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उपलब्ध शैक्षणिक संधी व कौशल्याधारित उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमात विविध विभाग प्रमुखांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शैक्षणिक, सांस्कृतिक, एनएसएस व एनसीसी उपक्रमांची माहिती दिली. समारंभाला प्राध्यापक, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने नवागत विद्यार्थी उपस्थित होते.

# बोगस बियाणे संदर्भात अमरावती कृषी साहित्य विक्रेता संघ आक्रमक

## जिल्हातील सर्व आमदार खासदार यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

निकृष्ट सोयाबीन बियाणे शेतकऱ्यांच्या माथी मारणाऱ्या सोयाबीन कपाशी बियाणे उत्पादक कंपनीवर व संबंधित सॅम्पल तपासणी करून बोगस बियाण्यास विक्री परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी तसेच कंपनीकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्याला आर्थिक मदत मिळून देण्यात यावी अशी मागणी अमरावती जिल्हा कृषी सेवा साहित्य विक्रेता संघाने केली आहे. या संदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी, तहसीलदार, आमदार खासदार, यांना निवेदने सादर केली आहे.जिल्हा विक्रेता संघाचे अध्यक्ष मिलिंद इंगोले व सर्व पदाधिकारी जिल्हा प्रतिनिधी अमित गांधी यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात व संबंधित अधिकाऱ्यासोबत शेतकऱ्यांच्या विविध समस्या व प्रलंबित प्रश्नावर सविस्तर चर्चा केली केली.

यावर्षी अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीन बियाणांच्या उगवण्यासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहे.यामधील वास्तविकता सिद्ध झाली असल्याचे समोर आले आहे.शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे आहे. त्यातल्या त्यात वरून राजाने विश्रांती घेतली असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. बियाणे निकृष्ट असेल तर त्याला जबाबदार पूर्णपणे उत्पादक कंपनी व संबंधित बियाणे पास करणारे शासकीय अधिकारी असल्यामुळे ते याला जबाबदार ठरत आहे.शासन स्तरावर नुकसान बाधित शेतकऱ्यांच्या शेतीची पाहणी करण्याच्या सूचना संबंधित शासकीय यंत्रणेला देऊन ज्यांचे शेतातील बियाणे बोगस असेल त्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या



मागण्या कंपनीत व शासन स्तरावर तात्काळ मार्गी लावाव्यात. बोगस बियाणे कंपन्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी अमरावती जिल्हा कृषी साहित्य विक्रेता संघाने आमदार राजेश वानखडे,आ.बच्चू कडू, आ. रवी राणा,आ.संजय खोडके, खासदार बळवंत वानखडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडे केली आहे. बोगस बियाणे विरोधात अमरावती कृषी साहित्य संघ आक्रमक झाला आहे. अमरावती विक्रेता संघाचे जिल्हा अध्यक्ष मिलिंद इंगोले, जिल्हा प्रतिनिधी अमित गांधी यांच्या पुढाकारातून ही निवेदने सादर करण्यात आली आहे.

## आईच्या मारेकरी मुलाला जन्मठेप वरूड अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल

**अमरावती/का.प्र.**

वरूड तालुक्यातील सावंगा येथे आईची हत्या करणाऱ्या मुलाला वरूड जिल्हा सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

पोलिस सूत्रांनुसार, मंजूर शाह मस्तान शाह (४३, रा. सावंगा) असे जन्मठेप ठोठावलेल्या आरोपी मुलाचे नाव आहे. याप्रकरणी पोलिस पाटील शीला भोजराज आंडे (४०) यांनी फिर्याद दाखल केली होती. त्यानुसार, १ जुलै २०२३ रोजी गावातील सय्यद फारूक यांनी त्यांना रजिया बी मस्तान शाह या महिलेला तिचा मुलगा मंजूर शाहने राहत्या घरी रात्रीच्या सुमारास मारून टाकल्याची माहिती दिली. यावरून शीला आंडे यांनी घटनास्थळ गाठले. रजिया बी राहत्या घरी समोरील खोलीत रक्ताच्या थारोल्यात पडली होती.त्यावेळी मंजूर शाह घरी नव्हता. त्याने घरगुती कारणावरू धारदार शस्त्राने कपाळावर व डोक्यावर मारून ठार केल्याने बेनोडा पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून सहायक पोलिस अधिकारी स्वप्निल ठाकरे यांच्या पथकाने तपासाला प्रारंभ केला. गुन्हा सिद्ध झाल्याने मंजूर शाह याच्याविरुद्ध दोषारोपपत्र वरूड येथील न्यायालयात करण्यात आले.

वरूड येथील जिल्हा न्यायालय (१) व अतिरिक्त सत्र वरूड पंचभाई न्यायालयाचे न्यायाधीश ए.ए. यांच्या न्यायालयात सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून प्रशांत देशमुख, मंगेश भागवत यांनी युक्तिवाद केला. बेनोडाचे ठाणेदार विवेक देशमुख, पैरवी अंमलदार विवेक हेडाऊ यांनी साहाय्य केले. न्यायालयाने आरोपी मंजूर शाह याला जन्मठेप आणि १० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास चार महिने सक्तमजरीची शिक्षा देण्यात आली.

## सोनम वांगचुक यांच्या दिल्ली येथील आंदोलनास जाहीर पाठिंबा

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

कॉक्रोच जनता पार्टी व विद्यार्थी कृती समिती च्या वतीने शांतीप्रिय आंदोलनास पाठिंबा देत मा. तहसीलदार,चांदूर रेल्वे यांना भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

यावेळी कॉ. विनोद जोशी यांनी सांगितले की,सोनम वांगचुक हे एक वैज्ञानिक आणि शिक्षणतज्ज्ञ असून ज्यांनी देशाच्या युवा पिढीला सतत प्रेरक कार्य केले.अश्या सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा दिवस आहे. देशाच्या व्यवस्थेत सुधारणा हवी आहे.शिक्षण घेणाऱ्या युवकांना



भेडसावणाऱ्या अडचणीसाठी जबाबदार कोणऱ्या प्रश्नाचे उत्तर हवे आहे. देशातल्या प्रत्येक स्वाभिमानी आणि सन्मानजनक शैक्षणिक भविष्य आपल्या मुलांना मिळावे अशी अपेक्षा असणाऱ्या प्रत्येक नागरिकांनी आपला पक्ष, पंथ, जात, धर्म विसरून एक जागरूक नागरिक म्हणून पाठिंबा देणे आवश्यक झाले आहे.सरकार आपले आहे,त्यातील माणसे आपलीच आहे.विरोध प्रदर्शन करणारे लोकही आपल्याच देशाचे आहे.मार्ग सत्याचा आहे,मुद्दा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याचा आहे म्हणून देशाच्या प्रत्येक सुजाण नागरिकांनी सरकारची संवेदना जागृत करण्यासाठी आणि सरकारने आपले मौन सोडण्यासाठी सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला आपला पाठिंबा घोषित केला आहे.

निवेदनात धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा,सोनम वांगचुक यांच्या सोबत चर्चा करून तोडगा काढावा,E-20 पेट्रोल रद्द करावे आदी मागण्या केल्या आहेत. यावेळी कॉ प्रसेनजित तेलंग सर,कॉ निळकंठ दिघडे, विनोद जोशी,गणेश होले,शिवाजीराव देशमुख,भूषण नाचवणकर,जयप्रकाश चोरडिया, राम जोशी,सागर दुर्योधन सुमेध सरदार,,श्रीकांत चौधरी,पियूष वाघ,गजानन पेठे,महादेव नागोशे, भास्कर जोशी व इतर सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

## इंदिरा गांधी विद्यालयात प्रा. हेमंत मंगळे यांची प्राचार्यपदी बढती

### सीनिअर सिटीझन ग्रुपतर्फे सत्कार

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधी**

दहिगाव रेचा येथील इंदिरा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे जेष्ठ प्राध्यापक हेमंत मंगळे यांना प्राचार्य म्हणून बढती मिळाली आहे. त्यांच्या या बढतीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत असून शिक्षण क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.या आनंददायी प्रसंगाचे औचित्य साधून अंजनगाव सुर्जी तालुक्यातील निवृत्त अधिकारी, निवृत्त प्राध्यापक व सामाजिक कार्यक्षेत्रात सक्रिय असलेल्या 'सीनिअर सिटीझन ग्रुप' च्या वतीने नवनियुक्त प्राचार्य हेमंत मंगळे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी ग्रुपचे जेष्ठ सदस्य डॉ. रावसाहेब ठाकरे, वासुदेव काळबांडे, विजय बोके, मुरलीधर तुरखडे, विजयराव रायबोले, भानुदास लोणकर, कृष्णकांत गायगोले, अरुणराव लाडोळे, प्रा. श्रीकृष्ण रंधे, मधुकर इंगळे,



संजय ताडे, काळपांडे , पांडे , दिलीप अस्वार आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.सत्काराला उत्तर देताना प्राचार्य हेमंत मंगळे यांनी सांगितले की,'सन्मानाने माझी जबाबदारी अधिक वाढणार आहे.याप्रसंगी सीनिअर सिटीझन ग्रुपच्या सदस्यांनी प्राचार्य मंगळे यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## विम्यासाठी खोटेपणा आढळल्यास शेतकरी ५ वर्षासाठी योजनेतून बाद

### बनावट पीक विम्यास बसणार चाप;डिजिटल पीक पाहणी होणार अनिवार्य

**अमरावती/का.प्र.**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेत मोठे बदल करण्यात आले असून आता डिजिटल पीक पाहणी अनिवार्य झाली आहे. विमा अर्जातील माहिती आणि डिजिटल पाहणीच्या नोंदींमध्ये तफावत आढळल्यास डिजिटल रेकॉर्डच अंतिम मानला जाईल. फसवणूक उघडकीस आल्यास संबंधित शेतकर्याला पाच वर्षासाठी कृषी विभागाच्या सर्व योज-नांमधून बाद केले जाईल.

कृषी विभागानुसार, विमा अर्जासाठी किमान ०.१० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. माहिती चुकीची आढळल्यास अर्ज रद्द करून जमा प्रीमियम जप्त केला जाऊ शकतो. तसेच, भाडेपट्ट्याने शेती करणाऱ्यांना आता नोंदणीकृत करारनामा पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य आहे; त्याशिवाय अर्ज स्वीकारला जाणार नाही. तपासणीत अर्ज बनावट आढळल्यास, शेतकर्याला पुढील पाच वर्षासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि नमो शेतकरी महासन्मान योजनेसह सर्व डीबीटी योजनांसाठी अपात्र ठरवले जाईल. डिजिटल सर्व्हेसाठी शेताच्या २० मीटरच्या आत जाऊन अचूक मोजमाप, जिओ-लोकेशन आणि आधार प्रमाणीकरण करणे २% बंधनकारक असेल. या योजनेत रब्बीसाठी आणि नगदी पिकांसाठी ५% प्रीमियम शेतकऱ्यांना द्यावा लागेल, तर उर्वरित हिस्सा सरकार भरेल. नुकसान भरपाई मंजुरीस विमा कंपनीने विलंब केल्यास त्यांना १२% वार्षिक व्याज द्यावे लागेल. उप कृषी संचालक वरुण देशमुख यांनी शेतकऱ्यांना सर्व आवश्यक कागदपत्रांसह ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन केले आहे.

## ४९८ ग्रा.पं.मध्ये मतदार यादीचा कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात प्रभागरचनेसह आरक्षणाची प्रक्रिया झालेल्या ४९८ ग्रामपंचायतींमध्ये मतदार यादीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाद्वारा बुधवार १५ जुलै रोजी उशिरा जाहीर करण्यात आला. या कार्यक्रमानुसार २४ जुलै रोजी या सर्व ग्रामपंचायतींमध्ये प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

पाच महिन्यांपासून प्रशासकराज असलेल्या या ग्रामपंचायतीमध्ये सार्वत्रिक निवडणूक घेण्याचे अनुषंगाने आयोगाच्या हालचाली गतिमान झाल्या आहेत. सद्यस्थितीत या सर्व ग्रामपंचायतींचे अंतिम प्रभागनिहाय आरक्षण प्रसिद्ध व्हायचे आहे. आयोगाने २४ जुलैपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. अतिवृष्टीमुळे काही ग्रामपंचायतींचे कामकाज बाधित झाल्याने आयोगाने ही मुदतवाढ दिली होती. त्यातच आता मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आल्याने या सर्व ग्रामपंचायत क्षेत्रात लगबग वाढणार आहे.

मतदार यादीच्या कार्यक्रमासाठी १५ एप्रिल २०२६ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी संगणक पद्धतीने तयार करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करण्यात होईल व ग्रामपंचायत, तलाठी सजा, मंडळ अधिकारी, पंचायत समिती व तहसील कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात येणार आहे.

**मेळघाट क्षेत्रासाठी कार्यक्रम केव्हा?**

पेसा क्षेत्रात मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील २३ व धारणी तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतींसाठी स्वतंत्र कार्यक्रम जाहीर करण्यात येणार आहे. मात्र, याविषयीचे आदेश अद्याप आयोगाद्वारा प्राप्त नाहीत. याशिवाय निवडणुकीसाठी पात्र असलेल्या एकूण ५५६ ग्रामपंचायतींमध्ये थेट सरपंच पदाची आरक्षण सोडत अद्याप व्हायची असल्याचे वास्तव आहे.

# अमराठी भाषिक वाहनचालकांसाठी मराठी भाषा शिकवणी कार्यशाळा उत्साहात

## आरटीओ कार्यालयाचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र शासन परिवहन विभाग, राज्य मराठी विकास संस्था, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 'महाराष्ट्र माझा, मराठी माझी संवाद भाषा अभियान-२०२६' अंतर्गत अमराठी भाषिक वाहनचालकांसाठी आयोजित करण्यात आलेली मराठी भाषा शिकवणी कार्यशाळा प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या सभागृह येथे उत्साहपूर्ण वातावरणात




संपन्न झाली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार प्रमुख पाहुणे म्हणून कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सचिव प्रा. दीपा ठाणेकर, ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अनुपमा उजगरे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी नंदकिशोर काळे तसेच ऑटो युनियनचे अध्यक्ष नितीन मोहोड उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. मान्यवरांनी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करत प्रवाशांशी सुसंवाद साधण्यासाठी मराठी भाषेचा प्रभावी वापर आवश्यक असल्याचे सांगितले. सेवा देताना आत्मविश्वासपूर्ण संवाद आणि भाषेतील सौजन्य यामुळे नागरिकांचा विश्वास संपादन करण्यास मदत होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यशाळेत सहभागी झालेल्या ऑटो रिक्षा व टॅक्सी चालकांनी मराठी भाषेतील दैनंदिन व्यवहारातील शब्द, वाक्यरचना आणि संवाद कौशल्य यांची माहिती आत्मसात केली. राज्यातील विविध भागांतून येणाऱ्या प्रवाशांशी अधिक प्रभावी व सुलभ संवाद साधता यावा, मराठी भाषेविषयी आदर व आत्मीयता वाढावी तसेच सेवेचा दर्जा उंचवावा, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला वाहनचालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेचे उपस्थित अधिकारी, मान्यवर आणि वाहनचालकांनी स्वागत केले. भविष्यातही अशा उपयुक्त व लोकाभिमुख कार्यशाळांचे आयोजन नियमितपणे करण्यात यावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.संचालन व आभार प्रदर्शन अनिल मानकर यांनी केले.

## संक्षिप्त

### २१ व २२ जुलै रोजी निवड चाचणी

**अमरावती-** ऑलिम्पिक स्तरावर महाराष्ट्राचे नाव क्रीडा क्षेत्रात उज्ज्वल करण्यासाठी राज्य शासनामार्फत 'मिशन लक्षवेध' ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अमरावती जिल्ह्यात 'जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्र' सुरू करण्यात येत असून, आर्चरी (तिरंदाजी) आणि बॅडमिंटन या दोन खेळांसाठी प्रत्येकी २० गुणवंत खेळाडूंची निवड केली जाणार आहे. या विशेष अनिवासी प्रशिक्षणासाठी पात्र खेळाडूंची निवड चाचणी २१ आणि २२ जुलै २०२६ रोजी अमरावतीत आयोजित करण्यात आली आहे.या चाचणीत सहभागी होण्यासाठी खेळाडूचे वय २१ वर्षांखालील असावे आणि त्याने शालेय किंवा अधिकृत संघटनेच्या क्रीडा स्पर्धांमध्ये किमान राज्य स्तरावर सहभाग किंवा पदक मिळवलेले असावे. इच्छुक खेळाडूंनी आपले अर्ज जन्म दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, आधार कार्ड आणि क्रीडा कामगिरीच्या प्रमाणपत्रांसह २० जुलै २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती येथे प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे.निवड चाचणी २१ व २२ जुलै रोजी सकाळी ९ वाजता सुरू होईल. यामध्ये आर्चरीची चाचणी जिल्हा क्रीडा संकुल, मार्डी रोड (तपोवन गेटजवळ) येथे, तर बॅडमिंटनची चाचणी विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड येथे घेतली जाईल. ही निवड प्रक्रिया क्रीडा कार्यकारी अधिकारी श्रीमती ममता कोळमकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.

### भारतीय बौद्ध महासभेची सभा उद्या

**अमरावती-**भारतीय बौद्ध महासभा, जिल्हा शाखा अमरावती (पूर्व) यांच्या वतीने जिल्हास्तरीय महत्त्वपूर्ण सभेचे आयोजन शनिवार(ता.१८) रोजी दुपारी १ वाजता संघमित्रा मुलींचे वस्तीगृह, त्रिवेणी कॉलनी, काँग्रेस नगर रोड, अमरावती येथे करण्यात आले आहे.या सभेला भारतीय बौद्ध महासभेचे महाराष्ट्र राज्य संघटक तथा विभाग प्रभारी व निरीक्षक विजयकुमार चौरपगार हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर राहणार आहेत.सभेमध्ये जिल्ह्यातील संघटनात्मक कामाचा सखोल आढावा घेत पुढील वाटचालीचे नियोजन करण्यात येणार आहे. जिल्हा व तालुका शाखांमधील २१ पदाधिकारी सक्रिय करणे, निष्क्रिय शाखांचे पुनर्गठन करणे, प्रत्येक तालुक्यातील ५६ गावांमध्ये भारतीय बौद्ध महासभेचे कार्य रुजवून नवीन ग्राम शाखा स्थापन करणे, केंद्रीय शिक्षक, बौद्धाचार्य व माजी श्रामणेर यांना जबाबदाऱ्या निश्चित करणे तसेच जिल्हा पदाधिकाऱ्यांची तालुका निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्याबाबत चर्चा होणार आहे.

### ठिबक व तुषार सिंचनासाठी शंभर टक्के अनुदान

**अमरावती-**राष्ट्रीय कृषी विकास योजना (प्रति थेंब अधिक पीक) अंतर्गत जिल्ह्यातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी ठिबक व तुषार सिंचन संच खरेदी करण्यासाठी शासनामार्फत संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. विविध शासकीय योजनांच्या समन्वयातून या प्रवर्गातील शेतकऱ्यांना आता तब्बल शंभर टक्के अनुदान मिळणार आहे. या योजनेचा मुख्य उद्देश पाणीबचत करून पिकांची उत्पादकता वाढवणे आणि वंचित घटकांतील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा आहे.प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के, तर इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान दिले जाते. यामध्ये आणखी भर घालत मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतून अल्प व अत्यल्प भूधारकांना २५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पूरक अनुदान मिळते. याशिवाय, उर्वरित रक्कम जिल्हा परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन मिशन आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या माध्यमातून (अल्प व अत्यल्प भूधारकांसाठी १० टक्के आणि इतरांसाठी १५ टक्के) पूरक अनुदान असे एकूण ९० टक्के म्हणून दिली जाते. यामुळे शेतकऱ्यांवर कोणताही आर्थिक भार पडणार नसून त्यांना एकूण १०० टक्के अनुदान प्राप्त होईल.योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांकडे स्वतःच्या मालकी हक्काचा चालू ७/१२ उतारा, ८-अ उतारा असणे तसेच शेतात ओलीताची (पाण्याची) शाश्वत सोय असणे बंधनकारक आहे. पात्र व गरजू शेतकऱ्यांनी शासनाच्या अधिकृत महाडीबीटी पोर्टलवर (mahadbt.maharashtra.gov.in) जाऊन ऑनलाईन पद्धतीने त्वरित अर्ज सादर करावेत.

### पार्डी (देवी)-माजरी म्हसला पाणंद रस्ता थंडबस्त्यात

**अंजनगाव बारी/वार्ताहर**



पार्डी (देवी) ते माजरी म्हसला या सुमारे ४ किलोमीटरच्या पाणंद रस्त्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले असून, केवळ १ किलोमीटरपर्यंतच डांबरीकरण झाले आहे. उर्वरित ३ किलोमीटर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण अद्यापही प्रलंबित असल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.


सुमारे १२ वर्षांपासून या पाणंद रस्त्याची शेतकरी प्रतीक्षा करत आहेत. पावसाळ्यात संपूर्ण रस्ता चिखलमय होत असल्याने पायी चालणेही कठीण बनते. शेतमालाची वाहतूक, शेतीची कामे तसेच विद्यार्थी, महिला आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.हा रस्ता बडनेरा व धामणगाव रेल्वे या दोन मतदारसंघांना जोडणारा महत्त्वाचा दुवा असून, पार्डी (देवी), उतखेड, कऱ्हाड-कुऱ्हाड, वडगाव जिरे आदी गावांतील नागरिकांसाठी नांदगाव खंडेश्वर तालुक्यात जाण्यासाठी सुमारे १७ किलोमीटरचे अंतर कमी करणारा महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, रस्त्याचे काम रखडल्यामुळे नागरिकांना पर्यायी मार्गाचा वापर करावा लागत असून वेळ व इंधनाचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन उर्वरित रस्त्याचे खडीकरण व दर्जेदार डांबरीकरण त्वरित पूर्ण करावे, अशी जोरदार मागणी केली आहे.

# उच्च मध्यमवर्गाचे सशर्त हिरो ....!!!!

उच्च मध्यमवर्ग आणि त्यांचे अनुकरण करणारा मध्यमवर्ग वेगवेगळ्या हिरोच्या प्रेमात पडतो. त्यांना डोक्यावर घेतो पण त्याच्या अटीवर..त्यांच्या मध्यमवर्गीय वर्तुळाला सुखावेल त्या पैलूंना तो दाद देतो आणि त्या पलीकडे हिरो गेला की मध्यमवर्ग त्याच्यापासून दूर जातो किंवा कधी विरोधातसुद्धा...

१) सोनम वांगचूक जोपर्यंत 'थ्री इडियट' होते..चित्रपट गाजत होता तेव्हा हाच मध्यमवर्ग त्यांची शाळा, लडाखमधील त्यांचे जगणे, त्यांचे अफलातून जगणे त्यांचे शिक्षण चिंतन फॉरवर्ड करत होता. ते जिथे जातील तिथे गर्दी करत होता. काश्मीर सहलीला गेल्यावर आवर्जून लडाखला जात होता पण ज्याक्षणी त्यांनी मध्यमवर्गाच्या लाडक्या सरकारला प्रश्न विचारायला सुरुवात केली, आक्रमक भूमिका घेतली तेव्हा क्षणात ते देशद्रोही झाले आणि आता मृत्यूच्या दारात असतानाही 'थ्री इडियट' ला डोक्यावर घेणारा तो वर्ग पूर्णपणे गप्प आहे...नीट परीक्षा हा मध्यमवर्गातील प्रश्न असूनही सोनम त्यांना आपले वाटत नाही.

२)दुसरे उदाहरण डॉक्टर अभय बंग यांचे आहे.अभय बंग अनेक वर्ष वेगवेगळी कामे करतात. माझा साक्षात्कारी हृदयरोग हे त्यांचे पुस्तक आले आणि मध्यम वर्गाचे ते डार्लिंग बनले.अनेक डॉक्टर ते पुस्तक पेशंटला देऊ लागले आणि आरोग्याची काळजी कशी घ्यावी यासाठी डॉक्टर बंग यांना मध्यमवर्ग कान लावून ऐकू लागला. गंमत म्हणजे त्या अगोदर याच डॉक्टरांनी कोवळी पानगळ हा अभ्यास केला होता. त्यात कुपोषणाने मरणाऱ्या आदिवासी भागातल्या मुलांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते पण हृदय रोगासाठी बंग त्यांना हवे होते..मरणाऱ्या गोळ्या पानगळीसाठी हृदय धडधडत नव्हते.ते अभय बंग दारूच्या प्रश्नावर बोलतात, दारूने होणारा विनाश मांडतात तेव्हा त्या प्रश्नातही मध्यमवर्गाला काहीच रस नसतो. आता




आरोग्य स्वराज्य पुस्तक आले आणि मध्यमवर्ग पुन्हा त्यांची भाषणे फॉरवर्ड करायला लागला ....

३) तीच गोष्ट मेधा पाटकरांची. मेधा पाटकर दूर जंगलात एका धरणाविरुद्ध लढत होत्या. तेव्हा केंद्रात राज्यात काँग्रेसचे सरकार होते. भांडत होत्या.एक उच्च शिक्षित मुंबईतली तरुणी आदिवासी भागात जाते.त्यांच्यासारखे जगते.'डूबेंगे पर हटेंगे नही' म्हणून पाण्यात उभी राहते.यातील नाट्यपूर्णता मध्यमवर्गाला आवडायची.. मेधाताई बघायला गर्दी व्हायची आणि ती मेधा गुजरात सरकार विरुद्ध धरणाबद्दल बोलायला लागली.गुजरात दंगलीच्या वेळी आक्रमक भूमिका घेतली.मुंबईतल्या झोपडपट्ट्यांची बाजू घेऊन उभी राहिली. तेव्हा हळूहळू तिच्यातील दोष दिसायला लागले आणि मध्यम वर्गाला ती आंदोलनजीवी वाटू लागली

४) डॉक्टर श्रीराम लागू यांचे चित्रपट मध्यमवर्गाला आवडायचे. त्यांचे बोलणे तर खूप प्रभावी होते पण जेव्हा डॉक्टर श्रीराम लागू परमेश्वराला रिटायर करा इतक्या आक्रमक भाषेत बोलू लागले तेव्हा श्रीराम लागू यांचा टीआरपी एकदम खाली आला.

थोडक्यात आजच्या उच्च मध्यमवर्ग आणि मध्यमवर्ग यांच्या जगण्याला उपयुक्त ठरतील त्या मर्यादेत त्यांच्यासाठी हिरो असतात.. हृदयात खास जागा असते आणि ज्या क्षणी ते व्यवस्थेला धक्के मारू लागतात तेव्हा त्यांना हृदयातून धक्के मारून बाहेर काढले जाते....

**हेरंब कुलकर्णी**

# 'जलसंधारण' प्रत्येकाचे कर्तव्य!

**भा**रतीय हवामान खात्याने यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस होईल असा अंदाज वर्तवला आहे. यावर्षी पाऊस उशिरा येईल असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता तो खरा ठरला आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही मान्सून वेळेत दाखल झाला पण पुढे मान्सूनचा वेग मंदावला. मान्सूनचा वेग मंदावल्याने जून महिना कोरडाच गेला. जून महिना कोरडा गेल्याने शेतकऱ्यांसह सर्वांची चिंता वाढली. जून महिन्याप्रमाणे जुलै महिना कोरडा जाऊ नये अशी विनवणी शेतकऱ्यांसह सर्व नागरिकांनी वरुण राजाकडे केली. वरुण राजाने ही विनवणी मान्य केली असे म्हणावे लागेल. कारण जुलै महिन्याच्या पहिल्या दिवसापासून राज्यात पावसाने दमदार पुनरागमन केले. आता राज्यात सर्वत्र मान्सून पसरला असून पावसाने राज्यात सर्वदूर हजेरी लावली आहे.

विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातील काही भागात दमदार पाऊस कोसळला. राज्यात दमदार पाऊस झाल्याने धरणातील पाणी साठाही वाढत आहे. राज्यातील सर्व नद्या, नाले, तलाव, ओढे ओसंडून वाहत आहेत. वरुण राजाने चांगली कृपा केल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. धरणीमाईही चिंब भिजून हिरवा शालू पांघरत आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात चांगला पाऊस झाला असला तरी आता पावसाने विश्रांती घेतली आहे. राज्यावर अल निनोचे संकट असल्याने पुन्हा असा दमदार पाऊस कधी होईल याचा नेम नाही. जर अल निनोचा प्रभाव कायम राहिला तर पुढे पावसाचे प्रमाण कमीच राहील असा हवामान खात्याचा अंदाज आहे. गेल्या काही वर्षात राज्यात अपुरा पाऊस पडल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली होती. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती. पाण्यासाठी दाही दिशा.... अशी लोकांची अवस्था झाली होती. यावर्षीही पावसाचे प्रमाण कमी राहणार आहे असा अंदाज असल्याने पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. पावसाच्या जास्तीतजास्त पाण्याची बचत कशी होईल याचे नियोजन आतापासूनच करावे लागणार आहे. जमिनीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे बरेचसे पाणी वाया जाते. कमी पाऊस पडणाऱ्या भागात तर हा पाण्याचा अपव्यय होय. महाराष्ट्रात पडणाऱ्या पावसाचा विचार करता आपल्याकडे पाणी जिरवणे आणि पाणी साठवणे या दोन तंत्राची खूप जरुरी आहे. पाणी साठवण्यापेक्षा पाणी जिरवण्याचा फायदा असा की भूगर्भातील पाण्याचे बाष्पीभवन होत नाही व त्यात घट होत नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ धरणे बांधून, पाईपलाईन शहरापर्यंत नेऊन घरोघरी पाणी पोहचवणे असा नाही.यासंदर्भात नागरिकांचेही प्रबोधन व्हायला हवे. नदी, विहीर, तलाव, बंधारे यात पावसाचे जास्तीतजास्त पाणी कसे साठेल याचे नियोजन सरकारी पातळीवर व्हायला हवे. नागरिकांनी आपल्या घरात, सोसायटीत रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. शाळा, कॉलेज तसेच सरकारी कार्यालयातही रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. पावसाच्या पाण्याची साठवणूक म्हणजे पर्जन्य जलसंधारण प्रत्येक घरात, सोसायटीत, कार्यालयात झाले पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. पाण्याचा थेंब न थेंब महत्वाचा आहे. कारण पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे कारण ती काळाची गरज आहे. भविष्यात दुष्काळ पडू नये असे वाटत असेल तर पर्जन्य जलसंधारण करावेच लागेल.

**श्याम ठाणेदार**

# गाठी.. कसल्या कसल्या

**इ**लॅस्टिकचा जमाना आल्यापासून लहान्या पोरींचा वास्ता गाठींशी फारसा पडत नाही. आमच्या लहानपणी आमच्या अत्यंत घाईच्या वेळा गाठींशी झुंजण्यात, त्या सोडवण्यात किंवा तोडण्यात जायच्या. त्यामुळे गाठींशी कसे वागायचे याचे प्रशिक्षण आम्हाला नकळतपणे लहानपणीच मिळायचे. मला गाठींचा 'फोबिया' आहे. कुठेही जातांना, मला शिंक किंवा खोकला येईल आणि माझ्या कपड्यांत असलेली एखादी अत्यंत जबाबदार गाठ तटकन तुटेल आणि अनवस्था प्रसंग येईल अशी धास्ती मला सतत कुरतडत असते. त्यामुळे माझ्या पर्समधे कायम सर्व आकाराच्या सेफ्टीपिन्स आणि एक नाडी असते.

गाठी तरी कसकसल्या असतात. (आता आपण परकर, पायजमा, शलवार, वगैरेच्या जरा पलीकडे जाऊ.) ऋणानुबंधाच्या गाठी रेशमाच्या गाठी मनातल्या गाठी..!! प्रेमाच्या गाठी..!! आतली गाठ..!! नात्यांची गाठ.. मैत्रीची गाठ.. सुरगाठी-निरगाठी.. बाप रे..!! एका संकल्पनेची इतकी रूपे.. आणि तरी ही सगळी 'निर्गुण' रूपे आहेत. सगुण गाठी आहेतच अजून.टायची गाठ, स्कार्फची गाठ, रिबीनची गाठ, गिफ्टपॅकची गाठ, बुटाच्या लेसची गाठ, यातही वेगवेगळ्या गाठी असतात. खेळाडू, सैनिक, विद्यार्थी आणि उच्च अधिकारी या सगळ्यांच्या बुटाच्या गाठी वेगळ्या असतात. किती गाठी भवताली..आजच हे आठवायला एक कारण झाले. मी अनेकदा गानाडॉट कॉमवर गाणी ऐकते. ही साईट लोड होतांना एकमेकीत गुंफलेल्या दोन पोकळ गाठी एकमेकींच्या जीवात फिरत राहतात. ते पाहून मला घुसमटल्यासारखे होते. कधीतरी मी त्यात अडकेन असे वाटत राहते.



माणसांच्या नात्यातल्या गाठींना 'रेशीम गाठ' म्हणतात. रेशीम कितीही नाजूक असले तरी त्यावर गाठ घट्ट बसते. सुटता सुटत नाही. ती सोडवायची म्हणजे तोडावीच लागते. आणि महत्प्रयासाने सोडवली जरी, तरी रेशमावर तिचे वळ राहतात. हट्टाने ते वळ काढायचे म्हंटले तर उकळत्या पाण्यावर चाळणीत ते रेशीम ठेवावे लागते. ते चटके बसून सरळ होते, पण त्याची चमक जाते, रया जाते. हे सारे 'मानवी नात्या'च्या संदर्भातही होते. हट्टाने सोडवलेल्या गाठीचे रेशीम कधीच पूर्वीसारखे सरळ, चमकदार होत नाही. आणि मग वरवर पाहता नाती सुरु राहिली तरी ती आतून निर्जीव होतात. हे पाहिल्यावर वाटते, कुणी बरं सर्वप्रथम या नात्यांना 'रेशीम-गाठ' म्हटले असेल? त्याला सलाम.

मी शक्यतो कुठलीही गाठ तोडत/कापत नाही. अगदी वाणसामानाच्या पिशव्यांच्या गाठी असल्या तरी त्या निगुतीने सोडवते. गाठी सोडवण्याच्या या सवयीमुळेच कदाचित, मी एकदा जोडलेली नाती कालपरत्वे बदलली तरी पूर्णपणे तुटत नाहीत. माझा गोतावळा वाढत राहतो. काहींच्या बाबतीत मनात वळ राहतात. ते काढण्याचा हट्ट न करता तसेच जपत राहते. हे बरं की वाईट मला माहीत नाही. पण गाठी मी तोडत नाही हे मात्र नक्की. मला गाठ तुटण्याची धास्तीच वाटते. त्यापेक्षा मुकाट्याने वळ जपत राहणे परवडले.

दुसरी अत्यंत महत्वाची गाठ म्हणजे जी आपण कुणाच्या तरी विरोधात मनाशी बांधतो. बघा, शब्द तोच. पण भावना एकदम वेगळी. रेशीम गाठीत जो एक दिलासा आहे, तसल्ली आहे, ती या गाठीत अजिबात नाही. ही अगदीच नकारात्मक गाठ आहे. अशा गाठीही अनेकजण वर्षानुवर्ष जपत असतात.कधी त्या गैरसमजातून आलेल्या असतात, कधी तात्कालिक रागाच्या भावनेतून. या गाठी ठसठसत्या असतात. त्यात तिरस्काराची दुर्गंधी असते. पण गाठी न तोडणे हा जसा एक स्वभाव असतो तसाच मनातल्या गाठी विनाकारण जपत राहणे हाही एक स्वभावविशेषच. अशी माणसे गाठीवर गाठी बांधत राहतात.या लोकांनी पायांनी मारलेल्या गाठी आपण हाताने सोडवू शकत नाही. हतबल व्हायला होते मग.

हल्ली स्कार्फची अशी काही गाठ मारतात की ती खेचली तर सरळ फासच.भीती वाटते ती गाठ पाहून. टायची गाठ हेही एक कौशल्यच.तसे तर पक्की बसणारी कुठलीही गाठ कौशल्यानेच मारलेली असते.

याच गाठींचे एक मनोरम रूप मी काश्मीरमधे पाहिले. तिथले कलावंत गाठींचा एक टेबलक्लॉथ बनवतात.आपल्याला तो टेबल-स्प्रेड म्हणून वापरायचा नसेल तर त्या सगळ्या गाठी सोडवायच्या, त्यातून फूल उमलावे तसा गालिचा उमलतो. हेही गाठीचेच एक रूप.मनातल्या तिरस्काराच्या सगळ्या गाठी जर अशाच सहज सुटून, फुलासारख्या उमलू शकणाऱ्या सुरगाठी असत्या तर..


**मिथिला सुभाष**

# शिक्षण व्यवस्थेचा 'थ्री इडियट' जंतर-मंतरवर मरणासन्न, सरकार मात्र ढिम्म!

**'ज**ब-जब व्यवस्था बहरी होती है, तब-तब चीखना लाजिमी होता है,
पर जहाँ हुक्मरान ही अंधे-बहरे हों, वहाँ खून खौलाना लाजिमी होता है।'

जगाला भारताची तांत्रिक आणि शैक्षणिक ताकद दाखवून देणारे, ज्यांच्या जीवन प्रवासावरून प्रेरित होऊन 'थ्री इडियट्स' सारखा जागतिक कीर्तीचा चित्रपट बनला, तेच जागतिक कीर्तीचे शिक्षणतज्ज्ञ आणि वैज्ञानिक सोनम वांगचुक दिल्लीच्या जंतर-मंतरवर उघड्या आभाळाखाली, ऊन-वारा-पावसाचा मारा झेलत आमरण उपोषणाला बसले आहेत. आज त्यांच्या उपोषणाचा १९ वा दिवस उलटला आहे. त्यांचे वजन ९ किलोने घटले आहे, शरीराने साथ सोडायला सुरुवात केली आहे.सोबतीला असलेल्या तरुण विद्यार्थ्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. एका संवेदनशील देशभक्ताची ही अवस्था पाहून आज प्रत्येक भारतीयाचे मन पिळवटून निघत आहे.

पण, ज्या व्यवस्थेला जाग आणण्यासाठी हे आंदोलन सुरू आहे, ती व्यवस्था मात्र अजूनही निगरगट्टपणे ढिम्म बसलेली आहे! नीट आणि टीईटी पेपरफुटीचं दुष्टचक्र सुरू आहे. हा देश केवळ कागदावर महासत्ता बनू पाहत आहे का? कारण प्रत्यक्षात देशाचा कणा असलेला तरुण वर्ग पेपरफुटीच्या आणि शैक्षणिक भ्रष्टाचाराच्या दलदलीत रुतत चालला आहे. 'नीट' पेपरफुटीमुळे हताश होऊन देशभरातील तब्बल २० निष्पाप विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. ज्या पालकांनी आपल्या मुलांच्या




भविष्यासाठी रक्ताचे पाणी केले. त्यांच्या पदरी आज फक्त आपल्या मुलांची प्रेतं आणि अंधार उरला आहे. अभिजित दिपके आणि 'कॉकरोच जनता पार्टी'च्या तरुणांनी पुकारलेल्या या लढ्याला धार देण्यासाठीच वांगचुक यांनी आपले प्राण पणाला लावले आहेत.

आता जनतेचा संयम सुटत चालला! अत्यंत शांततावादी, लोकशाही आणि घटनात्मक मार्गाने चालणारे वांगचुक जेव्हा रस्त्यावर उतरतात, तेव्हा समजून जावे की पाणी डोक्यावरून गेले आहे. वारंवार होणाऱ्या पेपरफुटीची आणि विद्यार्थ्यांच्या सामूहिक हत्येची (आत्महत्यांची) नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा दिलाच पाहिजे. ही देशातील कोट्यवधी विद्यार्थ्यांच्या भविष्याची क्रूर थट्टा आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या:-शिक्षणमंत्र्यांनी जबाबदारी स्वीकारून तात्काळ पद सोडावे.परीक्षा प्रक्रियेत संपूर्ण पारदर्शकता आणण्यासाठी युद्धपातळीवर कठोर पावले उचलली जावीत.पेपरफुटीमुळे आत्महत्या केलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या कुटुंबाला १ कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळावी.परीक्षा प्रक्रिया ऑफलाईन राबवाव्यात.वांगचुक यांच्या खालावत चाललेल्या प्रकृतीमुळे आज संपूर्ण देश अस्वस्थ आहे. अशा मूठभर लोकांमुळे लोकशाही जिवंत आहे. तरुणाईचे आंदोलन चिरडण्याचा प्रकार देशाला परवडणारा नाही. गांधी-आंबेडकरांच्या विचारक्रांतीचा डीएनए असलेल्या भारतातील तरुणाई अन्यायाविरुद्ध न्यायासाठी प्राणपणाने लढेल.व्यवस्थेविरुद्ध जनतेच्या मनात तीव्र चीड निर्माण झाली आहे. सरकारने त्वरित या आंदोलनाची दखल घेऊन तोडगा काढावा आणि वांगचुक यांचे उपोषण सोडवावे.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते:-
'चुप रहने की इस बीमारी ने मुल्क को बर्बाद किया है, अब तो जाग ए हुकूमत, युवाओं ने तुझे आबाद किया है।' आता आणखी उशीर झाल्यास, या तरुणांच्या आणि वांगचुक यांच्या प्रत्येक थेंबाचा हिशोब या देशाचा इतिहास नक्कीच मागेल!

**हरीश कुडे**
जवळा, ता. आर्णी, जि. यवतमाळ
मो.९८५०३०११३४

## कुंभमेळा विकास: पर्यावरण दुर्लक्षित

राज्यातील नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी सिंहस्थ कुंभमेळा होऊ घातला आहे. कुंभ पर्वाच्या निमित्ताने शहरात विकासकामांचा वेग प्रचंड वाढलेला आहे. रस्ते, उड्डाणपूल, रिंगरोड, पाइपलाइन, गोदावरी नदी सभोवतालचे सुशोभीकरण अशा सर्व प्रकल्पांचा सध्या धडाका सुरु आहे. कागदोपत्री पाहता हा विकास नाशिकच्या प्रगतीचा दाखला वाटतो. परंतु, प्रत्यक्षात नाशिककरांच्या जीवनात तो मोठ्या प्रमाणावर अस्वस्थता, त्रास आणि असंतोष निर्माण करणारा ठरत आहे. यापैकी सर्वात गंभीर मुद्दा म्हणून मोठ्या प्रमाणात होत असलेली वृक्षतोड आहे. शासनाकडून तोडलेल्या झाडांच्या बदल्यात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्याचा दावा केला जात आहे. मात्र, या विकासाच्या बुलडोझरमुळे नाशिकमधील शेकडो वर्षांची जुनी झाडे हटवण्यात येत आहेत.यावर्षी मात्र, सिंहस्थाचे आगमन लोकांच्या अधिकच लक्षात राहण्याजोगे ठरत आहे. सिंहस्थ कुंभ पर्व ही भारतीयांची प्राचीन परंपरा मानली जाते. परंतु, आपल्या ऋषीमुनींनी कधीही पर्यावरण ऱ्हासाचे समर्थन केलेले नाही. कुंभ पर्वासाठी चाललेल्या तयारीमुळे नाशिक शहर सध्या मोठ्या संक्रमणातून जात आहे. सिंहस्थाच्या निमित्ताने विकासाची संधी निर्माण झाली असली तरी पर्यारणाचा विनाश कुठल्याही परिस्थितीत टाळता जाण्याची लोकांची अपेक्षा आहे. निसर्गाला सोबत घेऊनच माणूस खऱ्या अर्थाने विकासाची वाट चाल करू शकतो. अन्यथा हा सर्व देखावा केवळ तात्पुरता आणि दिखाऊ ठरू शकतो.

**प्रा. मधुकर चुटे**

# निरोगी आरोग्य आणि आहार

**मेंं**दू 'हॅक' करायला लाखो रुपयांचं gadget नको... पोटातल्या ३ सवयी पुरेशा आहेत. आजकाल जगभरात एक नवीन tren दिसतो आहे. Chin मधील BrainCo सारख्या कंपन्यांनी असे wearable headbands तयार केले आहेत जे मेंदूच्या लहरी (brain waves) मोजतात आणि focus वाढण्यास मदत होऊ शकते असा दावा करतात. Social media वर त्याचे हजारो videos viral होत आहेत.पण एक प्रश्न स्वतःला विचारा...आपल्या शरीरात आधीपासून असलेली सर्वात शक्तिशाली 'neural technology' आपण वापरतो का?

विज्ञान सांगते की तुमचा मेंदू आणि तुमचं पोट एका अतिशय महत्त्वाच्या मज्जातंतूमुळे जोडलेले आहेत. तिचं नाव आहे[illegible]. ही हीन पचन, हृदयाची गती, ताणाला शरीराची प्रतिक्रिया, झोप, भावनिक संतुलन आणि मेंदूशी होणारा सततचा संवाद यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.

आणखी एक आश्चर्यकारक गोष्ट...शरीरातील सुमारे ९०% Serotonin हे आतड्यांमध्ये तयार होतं. मात्र हे लक्षात ठेवा की आतड्यांमध्ये तयार होणारं Serotonin थेट मेंदूत जात नाही. त्याऐवजी ते पचनसंस्था आणि Vagus Nerve मार्फत शरीर-मेंदू संवादावर परिणाम करतं. म्हणूनच निरोगी आतडं म्हणजे केवळ चांगलं पचन नव्हे, तर एक निरोगी Gut–Brain Axis देखील.

अलीकडील संशोधनातून असे दिसून आलं आहे की निरोगी Gut Microbiome आणि Vagus Nerve यांच्यात सतत संवाद चालू असतो. आतड्यातील उपयुक्त जीवाणू विविध रसायनं आणि संकेत तयार करतात, ज्यांचा संबंध मेंदूच्या कार्यक्षमतेशी, ताण सहन करण्याच्या क्षमतेशी आणि मानसिक आरोग्याशी आढळतो. प्राण्यांवरील अभ्यासांमध्ये Antibiotics



मुळे microbiome बदलल्यावर vagal signaling कमी झाल्याचंही दिसून आलं आहे. मानवी संशोधन या क्षेत्रात वेगाने पुढे जात असलं, तरी अजूनही अनेक गोष्टींचा अभ्यास सुरू आहे.म्हणजे...आपण काय खातो, कसं खातो आणि कसं जगतो याचा परिणाम आपल्या मेंदूवरही होऊ शकतो.आणि इथेच आपल्या आजीच्या स्वयंपाकघरातलं शहाणपण विज्ञानाशी हात मिळवते.

**पहिली सवय** – ताक किंवा दही.यामध्ये Lactobacillus सारखे उपयुक्त जीवाणू असतात. नियमित आणि संतुलित प्रमाणात घेतल्यास ते उलू श्ग्म्दिंग्दस च्या आरोग्यास मदत करू शकतात. जेवणानंतर एक वाटी ताक ही साधी सवय अनेकांसाठी फायदेशीर ठरू शकते.

**दुसरी सवय** – डाळी, कडधान्यं, मेथी आणि भरपूर तंतुमय (fiber-rich) आहार.ही Prebiotic अन्न आतड्यातील चांगल्या जीवाणूंना पोषण देतात. हे जीवाणू Butyrate सारखी Short-Chain Fatty Acids तयार करतात, जी आतड्यांच्या आरोग्यासाठी आणि Gut–Brain संवादासाठी महत्त्वाची मानली जातात. (फक्त हिंगाचं किंवा मेथीचं पाणी यापेक्षा संपूर्ण तंतुमय आहार अधिक प्रभावी मानला जातो.)

**तिसरी सवय – दीर्घ श्वसन आणि प्राणायाम.**

नाकाने हळूहळू, खोल श्वास घेणं आणि नियंत्रित श्वसनाच्या पद्धती या Parasympathetic Nervous System सक्रिय करण्यास मदत करतात. अनेक अभ्यासांमध्ये नियमित श्वसनाभ्यासामुळे Vagal Tone सुधारण्याची, ताण कमी होण्याची आणि मन शांत राहण्याची शक्यता दर्शवली आहे.

महत्त्वाचे म्हणजे...कोणतंही gadget तुमच्या जीवनशैलीची जागा घेऊ शकत नाही.Technology तुमचा डेटा दाखवू शकते; पण तुमच्या रोजच्या सवयीच तुमचं शरीर बदलतात. Epigenetics आपल्याला सांगतं की आहार, झोप, व्यायाम, ताण आणि जीवनशैली यांचा आपल्या जनुकांच्या अभिव्यक्तीवर (Gene Expression) परिणाम होऊ शकतो. म्हणजेच, आरोग्याचा मोठा भाग आपल्या रोजच्या निवडींमध्ये दडलेला असतो. म्हणून ४०,००० gadget घेण्यापूर्वी एकदा स्वतःला विचारा...

आज माझ्या ताटात ताक आहे का? पुरेसा तंतुमय आहार आहे का? आज मी पाच मिनिटं शांतपणे श्वास घेतला का? कदाचित तुमच्या मेंदूला सर्वात जास्त गरज एखाद्या gadget ची नाही... तर तुमच्या आतड्यांची योग्य काळजी घेण्याची आहे.

**डॉ. कीर्ती गुरव**

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

अकोला जिल्हा विशेष

# बोगस बियाणे विक्रेत्यांवर कारवाईचा 'मुहूर्त' कधी?

## – पातूर तालुक्यात शेतक–यांची मोठी आर्थिक फसवणूक
## – चौकशी, गुन्हे आणि नुकसानभरपाईची वाढती मागणी

■ प्रतिनिधी | पातूर ■

खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच पातूर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांसमोर गंभीर संकट उभे ठाकले आहे. मोठ्या अपेक्षेने आणि कर्ज काढून खरेदी केलेल्या काही बियाण्यांची उगवण अत्यल्प झाली, तर काही ठिकाणी बियाणे उगवलेच नसल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. परिणामी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट कोसळले असून, आर्थिक नुकसानासह मानसिक त्रासही सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित बियाणे उत्पादक कंपन्या, वितरक आणि विक्रेत्यांच्या भूमिकेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी तीव्र झाली आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, खरीप हंगामासाठी त्यांनी प्रमाणित असल्याचे सांगून विक्री करण्यात आलेले बियाणे खरेदी केले. मात्र पाऊस समाधानकारक असतानाही अनेक शेतांमध्ये अपेक्षित उगवण झाली नाही. काही ठिकाणी उगवण अत्यंत कमी राहिली, तर काही शेतांमध्ये बियाणे पूर्णपणे निष्फळ ठरल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे पेरणीवर झालेला खर्च, मजुरी, मशागत आणि वेळ या सर्वांचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला आहे.



शेतकरी संघटनांनी या प्रकरणात कृषी विभागाने तातडीने पंचनामे करून संबंधित शेतांची पाहणी करावी, बियाण्यांचे नमुने अधिकृत प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत आणि अहवालाच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तपासात बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत त्रुटी अथवा नियमभंग आढळल्यास संबंधित उत्पादक कंपनी, वितरक किंवा विक्रेत्यांविरुद्ध लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींनुसार कारवाई करण्यात यावी, अशी भूमिका शेतकरी मांडत आहेत. दरम्यान, दुबार पेरणीमुळे शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडला आहे. बियाणे, खत, मजुरी आणि इतर खर्च पुन्हा करावा लागत असल्याने अनेक शेतकरी अडचणीत आले आहेत. त्यामुळे शासनाने तातडीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करून आर्थिक मदत आणि नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

कृषी तज्ज्ञांच्या मते, बियाण्यांची उगवण कमी होण्यामागे बियाण्यांची गुणवत्ता, साठवणूक, हवामान, जमिनीतील आर्द्रता, पेरणीची पद्धत आदी विविध कारणांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणे आवश्यक असते. त्यामुळे अंतिम निष्कर्ष अधिकृत तपासणी अहवालानंतरच स्पष्ट होऊ शकतो.

### बियाणे विक्रेत्यांना अभय कोणाचे?

पातूर तालुक्यात बोगस अथवा निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांची विक्री झाल्याचा आरोप अनेक शेतकऱ्यांनी केला आहे. संबंधित तक्रारी पुढे येऊनही दोषींची जबाबदारी निश्चित करण्याची प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. अधिकृत तपास पूर्ण होण्यापूर्वी कोणालाही दोषी ठरविणे योग्य नसले, तरी तक्रारींची तातडीने चौकशी, नमुन्यांची तपासणी आणि अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी जोर धरत आहे. चौकशीत दोष सिद्ध झाल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई व्हावी, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. प्रशासनाने वेळेत निर्णय न घेतल्यास शेतकऱ्यांचा संताप आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मात्र शेतकऱ्यांच्या तक्रारी गांभीर्याने घेऊन तत्काळ तपास सुरू करणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे मतही व्यक्त होत आहे. शेतकरी संघटनांनी इशारा दिला आहे की, चौकशी आणि कारवाईत विलंब झाल्यास तसेच नुकसानभरपाईबाबत निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. त्यामुळे आता कृषी विभाग आणि जिल्हा प्रशासन या प्रकरणात किती तत्परतेने पावले उचलते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# देवरी फाट्यावर सक्षम सामाजिक संघटनेचा रास्ता रोको

## रस्ता दुरुस्ती, टोलबंदीसाठी आंदोलन



■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट-अकोला तसेच देवरी-शेगाव मार्गावरील खड्डेमय रस्त्यांची तातडीने दर्जेदार दुरुस्ती करावी, अपघातग्रस्तांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी, प्रस्तावित टोल नाका बंद करावा आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, या प्रमुख मागण्यांसाठी सक्षम सामाजिक संघटनेच्या वतीने गुरुवारी देवरी फाटा येथे तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याचा आरोप करत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

आंदोलनामुळे काही काळ अकोट-अकोला आणि देवरी-शेगाव मार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस आणि संबंधित विभागाचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. संघटनेने निवेदनाद्वारे अकोट-अकोला व देवरी-शेगाव मार्गाचे तातडीने दर्जेदार डांबरीकरण करण्याची, खराब रस्त्यांमुळे मृत्यू झालेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याची, या मार्गावरील प्रस्तावित टोल नाका बंद करण्याची, भविष्यात टोल वसुली न करण्याची तसेच अकोट-अकोला मार्गावर तातडीने पथदिव्यांची व्यवस्था करण्याची मागणी केली. याशिवाय नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या आणि समस्येकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, या प्रश्नांबाबत यापूर्वी अनेक वेळा लेखी निवेदने देण्यात आली होती. मात्र प्रशासनाने केवळ आश्वासनांपलीकडे कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर अखेर रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची वेळ आल्याचे त्यांनी सांगितले. आंदोलनस्थळी संबंधित अधिकाऱ्यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारून मागण्यांबाबत वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करण्याचे आणि सकारात्मक निर्णयासाठी प्रयत्न करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले. मात्र, दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही, तर यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्यात येईल आणि त्यातून होणाऱ्या परिणामांना संबंधित प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा सक्षम सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिकेत नानाभाऊ पोतले आणि सचिव बजरंग दिलीपराव मिसळे यांनी दिला. आंदोलनात संघटनेचे तालुकाप्रमुख, सर्कलप्रमुख, शहरप्रमुख, शाखाप्रमुख तसेच मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.

# अकोला एमआयडीसीतील वीज समस्यांवर १५ दिवसांत उपाययोजनांचे आश्वासन

## मुख्य अभियंत्यांसोबत लघु उद्योग भारतीची बैठक; मागण्या पूर्ण न झाल्यास उद्योगांच्या चाव्या मुंबईत सुपूर्द करण्याचा इशारा



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला एमआयडीसी परिसरातील उद्योगांना भेडसावणाऱ्या वीजविषयक विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी लघु उद्योग भारतीच्या पुढाकाराने महावितरणच्या मुख्य अभियंत्यांसोबत गुरुवारी सविस्तर बैठक पार पडली. या बैठकीत वारंवार होणारे वीज खंडित होणे, अतिरिक्त टीओडी (टाइम ऑफ डे) शुल्काचा परतावा, सौरऊर्जा ग्राहकांच्या बँकिंग रिफंडसह विविध प्रश्नांवर चर्चा झाली. बहुतांश मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत महावितरणने १५ दिवसांत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

बैठकीत दादाजी व येवता फीडरवर वारंवार होणाऱ्या ट्रिपिंगच्या समस्येवर विशेष चर्चा झाली. संबंधित फीडरचे पोल-टू-पोल सर्वेक्षण करून तांत्रिक त्रुटी दूर करण्याचे काम पुढील दोन रविवारी पूर्ण करण्यात येणार असून, त्यानंतर ट्रिपिंगचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होईल, असे मुख्य अभियंत्यांनी स्पष्ट केले.

जुन्या वीजमीटरच्या जागी स्मार्ट मीटर बसविलेल्या ग्राहकांकडून चुकीने आकारण्यात आलेल्या अतिरिक्त टीओडी शुल्काच्या परताव्याबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. संबंधित रकमेची गणना करून १५ दिवसांच्या आत परतावा देण्यात येईल. तसेच उर्वरित ग्राहकांचे मीटर बदलण्याचे कामही गतीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

सौरऊर्जा प्रकल्पधारक उद्योजकांच्या बँकिंग रिफंडचा प्रश्नही बैठकीत उपस्थित करण्यात आला. या संदर्भातील माहिती मुख्यालयाकडून मागवून रिफंड प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. उद्योजकांच्या वैयक्तिक वीजविषयक तक्रारींवर स्वतंत्रपणे लक्ष देऊन त्या तातडीने निकाली काढण्याचे आश्वासन मुख्य अभियंत्यांनी दिले. तसेच उद्योगांच्या समस्या स्थानिक पातळीवरच सोडविण्यासाठी दर महिन्याला एमआयडीसीतील एआयए सभागृहात 'स्वागत सेल'ची नियमित बैठक घेण्याचा निर्णयही घेण्यात आला.

एमआयडीसीतील नवीन वीज उपकेंद्राबाबत संबंधित अधिकारी रजेवर असल्यामुळे या विषयावरील निर्णय पुढील बैठकीत जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. दरम्यान, लघु उद्योग भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा देत, पुढील १५ दिवसांत वीज समस्यांचे कायमस्वरूपी निराकरण झाले नाही, तर अकोला जिल्ह्यातील उद्योजक मुंबई येथे जाऊन महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आपल्या कारखान्यांच्या चाव्या सुपूर्द करतील, असा इशारा दिला. सातत्याने उद्भवणाऱ्या वीज समस्यांमुळे उद्योग चालविणे कठीण होत असल्याने प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.बैठकीतील निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी १५ दिवसांनंतर पुन्हा बैठक घेण्यात येणार आहे. बैठकीला संदेश खंडेलवाल, अमित सराफ, गुरमुख पारवानी, सुनील खंडेलवाल, आदेश राका, पीयूष केडिया, निखिल अग्रवाल, अमित सुरेखा, शंकर लीलवानी, मनीष चंदनानी यांच्यासह एमआयडीसी परिसरातील अनेक उद्योजक उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी यांच्या हस्ते तीन दत्तक विधान प्रक्रिया संपन्न

**अकोला :** जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, अकोला अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या समन्वयाने दिनांक १५ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे मा. जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा मीना यांच्या हस्ते दत्तक विधान प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली.

या दत्तक प्रक्रियेत उत्कर्ष शिशुगृह, मलकापूर येथील एका बालिकेला नांदेड येथील इच्छुक दत्तक पालकांकडे सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून दत्तक देण्यात आले. दत्तक प्रक्रियेमुळे बालकाला सुरक्षित, प्रेमळ व संगोपनासाठी योग्य कुटुंब उपलब्ध होऊन त्याच्या सर्वांगीण विकासास चालना मिळते, असे यावेळी नमूद करण्यात आले.

ही संपूर्ण दत्तक प्रक्रिया भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमांनुसार तसेच केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अत्यंत पारदर्शक, कायदेशीर व नियमानुसार पूर्ण करण्यात आली. यावेळी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजू लाडूलकर, जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे सुनील सरकटे, सुनील लाडुलकर आदी उपस्थित होते.

# फरार आरोपीला अखेर बेड्या

## राहुल सारसर हत्याकांडात रामदासपेठ पोलिसांची कारवाई



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील गाजलेल्या राहुल कालू सारसर हत्याकांडातील फरार आरोपीला अखेर अटक करण्यात रामदासपेठ पोलिसांना यश आले आहे. घटनेनंतर तब्बल दोन महिन्यांपासून फरार असलेल्या बलवीर उर्फ बल्लू विजय पारोचे याला धामणगाव रेल्वे (जि. अमरावती) येथून शिताफीने ताब्यात घेण्यात आले. न्यायालयाने आरोपीला १८ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. १५ मे २०२६ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास अकोल्यातील अलंकार मार्केट परिसरातील राजमंदिर बारच्या गल्लीत राहुल कालू सारसर (रा. विजयनगर) यांची जुन्या वादातून कट रचून हत्या करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणी राज चंदू सारसर यांच्या फिर्यादीवरून रामदासपेठ पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील संतोष पारोचे, बादशाहा पारोचे, हर्ष करोशिया आणि गौरव करोशिया या आरोपींना यापूर्वीच अटक करण्यात आली होती. मात्र, बलवीर उर्फ बल्लू विजय पारोचे हा घटनेपासून फरार होता. त्यामुळे त्याचा शोध घेण्यासाठी विशेष पथक कार्यरत होते. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली रामदासपेठचे पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे यांनी तपास पथकाला फरार आरोपीचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी धामणगाव रेल्वे परिसरात लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तेथे सापळा रचला. पाठलाग करून आरोपीला ताब्यात घेण्यात आले. अटक केलेल्या आरोपीला प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १८ जुलैपर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली. या कालावधीत हत्येच्या कटासह अन्य बाबींचा तपास करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. पी. रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे, हेमंत शिंदे, उपनिरीक्षक निलेश गायकवाड, संदीप बालोद, श्याम मोहळे, दादाराव टापरे, किरण गवई, अभिजित इंगळे, प्रेम नांदोकार, अनिल धनभर, इमाम चौधरी, पोलीस कॉन्स्टेबल माधुरी लाहोळे आदींच्या पथकाने पार पाडली.

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९५७/२०२६ — प्रोसेस नं. ८२७८/२०२६
चौ.ता. १०/०८/२०२६ — दिनांक : ०२/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीकांत नामदेव कांबळे २. प्रशांत नामदेव कांबळे ३. शारदा नामदेव कांबळे तिघेही रा. एच–५, म्हाडा कॉलनी, राम नगर, रतनलाल प्लॉट जवळ, अकोला. ता. जि. अकोला. ४. अंजली बाळासाहेब मोरे रा. बी-१०३, वेस्ट वूड इस्टेट, मॉट व्हर्ट ट्रॉपेझ रोड, कस्पाटे वस्ती, वाकड, पिंपरी चिंचवड, पुणे. ४११०५७

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नामदेव मुकिंदराव कांबळे
**पत्ता :-** रा. एच-५, म्हाडा कॉलनी, राम नगर, रतनलाल प्लॉट जवळ,अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नामदेव मुकिंदराव कांबळे यांचे दि. १६/०५/२०२० रोजी राहते घरी राम नगर, म्हाडा कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०५८/२०२६ — प्रोसेस नं. ८७७८/२०२६
चौ.ता. १८/०८/२०२६ — दिनांक : १४/०७/२०२६

**अर्जदार :** १. विश्वासराव ओंकार मानकर मो. नं. ९९२२३३२३०७ २. पियुष विश्वासराव मानकर दोघेही रा सरस्वती नगर, डाबकी रोड, भौरद, अकोला. ता. जि. अकोला. ३. शुभांगी गणेश पाटील रा. मु. पो. शेंबा खु. ता. नांदूरा, जि. बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शोभा विश्वास मानकर
**पत्ता :-** रा. सरस्वती नगर, डाबकी रोड, भौरद, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शोभा विश्वास मानकर यांचे दि. २०/०५/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापूर**
**दयानंद मारुती वाघमारे यांचे न्यायालयात**
**सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/१७९/२०२६
अरुणा संजय घोगरे वि. कोणीही नाही
पुढिल तारिख : ११-०९-२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती अरुणा संजय घोगरे वय अं ४० वर्ष धंदा घरकाम २. भावेश संजय घोगरे वय अं १४ वर्ष धंदा शिक्षण ३. आशितोष संजय घोगरे वय अं ११ वर्ष धंदा शिक्षण अर्जदार क २ व ३ करिता अ.पा.क म्हणून आई अर्जदार क्र. १ ४. कस्तुराबाई उमराव घोगरे वय अं ६५वर्ष धंदा घरकाम सर्व रा. भरतपूर ता. बाळापूर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळणे करीता वि.न्यायालयामध्ये अर्ज केला आहे. मय्यत संजय उमराव घोगरे हे दिनांक २९.११.२०२५ रोजी मौजे भरतपूर ता. बाळापूर जि. अकोला येथे मरण पावले. वरील नमुद अर्जदार हे मय्यत संजय उमराव घोगरे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ११/०९/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १६.०७.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०४६/२०२६ — प्रोसेस नं.८७८५/२०२६
चौ.ता. १९/०८/२०२६ — दिनांक : १४/०७/२०२६

**अर्जदार :** १. प्रविण मनोहर श्रृंगारपुरे २. नितीन मनोहर श्रृंगारपुरे (मयत) २अ. वैभवी नितीन श्रृंगारपुरे २ब. वैनतेय नितीन श्रृंगारपुरे २क. मिहीका नितीन श्रृंगारपुरे क. १ ते २क. रा. गोपाल गणेश आगरकर मार्ग, कॉटन सिटी हॉस्पिटल जवळ, रामदास पेठ, अकोला, ता. जि. अकोला. ३. राजेश मनोहर श्रृंगारपुरे रा. ३, ए/पि, सायली हिल, बि. जि. एन. रोड, मोरेश्वर कॉम्प्लेक्स, बारामती, ता. बारामती, जि. पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मनोहर रामकृष्ण श्रृंगारपुरे
**पत्ता :-** रा. कॉटन सिटी हॉस्पिटल जवळ, रामदास पेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मनोहर रामकृष्ण श्रृंगारपुरे यांचे दि. १०/०४/२०२४ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**Change In Name**

Passport file no NGC067871869826 I Have Change My name From
**ASHISH RAJU SAWALE**
-TO-
**ASHISH RAJIV SAWALE**
My Residential Address is Near Nandane Marriage Hall Santaji Nagar Dabki Road Akola 444001

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६८/२०२६ — प्रोसेस नं.२२७८/२०२६
चौ.ता. ०३/०८/२०२६ — दिनांक : १०/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती रुख्माबाई नाशिकराव घावट, वय-८० वर्ष धंदा गृहिणी रा. पातोंडा पोस्ट जउळखेड, ता. अकोट जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन ॠछ्छ १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

That the applicant is the permanent resident of the above mentioned address. That Ranjit Nashikrao Ghawat, died on 03.01.2026 at Patonda, tq. Akot Dist Akola At the time of his death, the deceased was unmarried. The applicant no. 1 is the mother of deceased Ranjit Nashikrao Ghawat. That the father of the deceased Ranjit Nashikrao Ghawat is already died. Thus the applicant is the only Class-I legal heir of deceased Ranjit Nashikrao Ghawat. Except the applicant there are no class- I legal heir of the deceased Ranjit Nashikrao Ghawat. Hence the applicant is filing this application for grant of legal heirship cetificate in the name of applicant.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०/०७/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट, जि. अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०९५/२०२६ — प्रोसेस नं.८७७४/२०२६
चौ.ता. ११/०८/२०२६ — दिनांक : १४/०७/२०२६

**अर्जदार :** १. शशिकला प्रभाकर खेडकर २. मंगेश प्रभाकर खेडकर ३. योगेश प्रभाकर खेडकर तिघेही रा: मोठी उमरी, राष्ट्रीय शाळा रोड, नेहरू नगर, अकोला. ता. जि. अकोला. ४. सौ. कल्पना संजय ताले रा. अनिकठ आखाडा, अनिकठ पोलीस लाइन, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रभाकर नारायण खेडकर
**पत्ता :-** रा. मोठी उमरी, राष्ट्रीय शाळा रोड, नेहरू नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रभाकर नारायण खेडकर यांचे दि. २७/०८/२०२३ रोजी नेहरू नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रक. रची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २१९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय



## संक्षिप्त

### मद्यधुंद वाहनचालकांवर पोलिसांचा दणका

**वर्धा-** शहरात मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली असून, नाकाबंदी दरम्यान तीन वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले. संबंधितांची वाहनेही जप्त करण्यात आली आहेत. तपासणीदरम्यान पंकज गौतम कांबळे, प्रवीण सुधाकर उराडे आणि लखन सुरेश चाचारकर हे मद्यप्राशन करून वाहन चालवत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांना ताब्यात घेऊन शहर पोलिस ठाण्यात गुन्हे नोंदविण्यात आले. ही कारवाई पोलिस निरीक्षक विलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेच्या पथकाने केली. शहरातील अपघातांना आळा घालण्यासाठी अशी कारवाई यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले असून, वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### सायबर फसवणुकीतील 'म्यूल' खात्याचा पर्दाफाश

**वर्धा-** सायबर फसवणुकीत वापरल्या जाणाऱ्या 'म्यूल' बँक खात्यांचा शोध घेत असताना सायबर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपासात वडनेर येथील सुमित आनंद धाबर्डे यांच्या नावाने बँक ऑफ बडोदामध्ये खाते उघडून त्यामध्ये विविध सायबर फसवणुकांतील रक्कम जमा केली जात असल्याचे उघड झाले. त्यानंतर ही रक्कम वर्ध्यातील सोहेल मेमनच्या मदतीने इतर खात्यांमध्ये हस्तांतरित केली जात होती. आर्थिक व्यवहारांची सखोल छाननी केल्यानंतर पोलिसांनी दोघांविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला. या प्रकरणाच्या तपासातून आणखी काही संशयितांची नावे समोर येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, सायबर फसवणुकीचे संपूर्ण जाळे उघड करण्यासाठी तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### पानटपरीवरून २५० खर्रा पुड्या जप्त

वर्धा - अन्न व औषध प्रशासन विभागाने सिद्धार्थनगर परिसरातील एका पानटपरीवर धाड टाकून प्रतिबंधित खर्र्याच्या २५० पुड्या जप्त केल्या. या कारवाईत सुमारे १२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, अमीर खॉं हमीद खॉं पठाण याच्याविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात आली आहे. तपासणीदरम्यान पानटपरीमध्ये मोठ्या प्रमाणात खर्रा विक्रीसाठी साठवून ठेवण्यात आल्याचे आढळून आले. त्यानंतर संपूर्ण माल जप्त करण्यात आला. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर अशी कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला.

### वादातून सोयाबीन पिकाची नासधूस

**आष्टी-** शेतीच्या जुन्या वादातून सात एकरांतील सोयाबीन पिकावर रोटावेटर चालवून नुकसान केल्याची घटना जोलवाडी शिवारात घडली. याप्रकरणी किशोर शेटे यांनी दिलेल्या तक्रारीवरून आष्टी पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. तक्रारीनुसार वनिता घुलक्षे यांचा नातेवाईकांसोबत शेतीचा वाद सुरू आहे. या वादातून नंदा शेटे, प्रवीण घुलक्षे, आशिष जाणे आणि अविनाश जाणे यांनी पेरणी केलेल्या शेतात रोटावेटर चालवून सुमारे ३० हजार रुपयांचे नुकसान केल्याचा आरोप करण्यात आला आहे. घटनेनंतर पोलिसांनी पंचनामा करून तपास सुरू केला आहे. शेतीच्या वादातून पिकांची नासधूस होण्याच्या घटना वाढत असल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे.

## आज पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**वर्धा-** महाराष्ट्र शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार धोरणानुसार जागतिक कौशल्य विकास दिनाचे औचित्य साधून जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वर्धा आणि समृद्धी प्रायव्हेट औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देवळी यांच्या संयुक्त विद्यमाने १७ जुलै रोजी सकाळी १० वाजता पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा तथा प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले आहे.

समृद्धी प्रायव्हेट औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देवळी येथे होणाऱ्या या मेळाव्यात वैभव एंटरप्रायझेस, नागपूर अंतर्गत सन्वीजय इन्फ्रास्ट्रक्चर बुटीबोरी, स्पेसवूड ऑफिस सोल्यूशन नागपूर, लिंक अप टेक्सटाईल्स, सगुणा फूड्स प्रा. लि. हिंगणघाट, ऑटो मशिनरी प्रा. लि., कोल्ब्रो नागपूर, एलआरसी पुलगाव, संस्कार ॲग्रो वायगाव तसेच अरिका स्पिनटेक वायगाव-निपाणी, उत्कर्ष स्माल फायनन्स नागपूर आदी नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. या रोजगार मेळाव्यात ट्रेनिंग मेकॅनिक, ऑपरेटर, सर्व्हेअर, विमा सखी, एलआयसी एजंट आदी विविध पदांसाठी सुमारे २१९ रिक्त जागांसाठी उमेदवारांच्या थेट मुलाखती घेण्यात येणार आहेत. दहावी, बारावी, आयटीआय (सर्व ट्रेड), पदवीधर, डिप्लोमा धारक तसेच बीएससी, एमएससी (केमिस्ट्री) उत्तीर्ण उमेदवारांना या भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. या मेळाव्यात बेरोजगार उमेदवारांना प्राधान्य देण्यात येणार असून इच्छुकांनी आपल्या मूळ शैक्षणिक कागदपत्रांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त डॉ. सु.रा. झळके यांनी केले आहे.

# शौचालय की मृत्यूचा सापळा : दलपतपूरच्या विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ

## भेगाळलेल्या भिंतींमुळे भीतीचे सावट; नवीन बांधकामाच्या मागणीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील किन्हाळा ग्रामपंचायतीअंतर्गत वर्धा नदीकाठावरील दलपतपूर येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी असलेले शौचालय अत्यंत धोकादायक अवस्थेत पोहोचले आहे. शौचालयाच्या भिंतींना मोठमोठे तडे गेल्याने त्या कधीही कोसळण्याची शक्यता निर्माण झाली असून, निष्पाप विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकारामुळे पालक आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

ग्रामपंचायत सदस्य प्रदीप पाथरे यांनी अनेकवेळा ग्रामपंचायतीत ठराव मंजूर करून नवीन शौचालयाच्या बांधकामाची मागणी केली. तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा केला. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



सध्या सुरू असलेल्या पावसामुळे भेगाळलेल्या भिंती अधिक कमकुवत झाल्या असून, शौचालयाचा वापर विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरत आहे. एखादी अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार, असा प्रश्न ग्रामस्थ आणि पालकांकडून उपस्थित केला जात आहे. यासंदर्भात ग्रामपंचायत प्रशासनालाही वारंवार माहिती देण्यात आली आहे. मात्र संबंधित अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याने नागरिकांच्या तक्रारींकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी धोकादायक शौचालयाचा वापर तातडीने बंद करून नवीन शौचालयाचे बांधकाम मंजूर करावे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. दुर्घटना घडल्यानंतर हालचाल करण्यापेक्षा प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा पालकांनी व्यक्त केली आहे.

## सावंगी-पालोती रस्ता तातडीने पूर्ण करा

### खा.अमर काळे यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र

**वर्धा/जनमाध्यम**

सावंगी–पालोती मार्गाचे अपूर्ण असलेले काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी खा.अमर काळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी पत्र पाठवून नागरिकांना होत असलेल्या गैरसोयींकडे लक्ष वेधले आहे. सन २०२४ मध्ये या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन झाले. मात्र दोन वर्षे उलटूनही काम पूर्ण झालेले नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या मार्गावर सावंगी रुग्णालय, विविध शैक्षणिक संस्था तसेच अनेक गावांची दळणवळण व्यवस्था अवलंबून असल्याने दररोज हजारो नागरिक, विद्यार्थी, कर्मचारी आणि रुग्ण या रस्त्याचा वापर करतात. अपूर्ण कामामुळे वाहतुकीचा खोळंबा होत असून रुग्णवाहिकांनाही अडथळ्यांचा सामना करावा लागत असल्याचे खासदारांनी पत्रात नमूद केले आहे. यापूर्वीही या प्रश्नाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला होता. मात्र अद्याप काम पूर्ण झाले नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. सावंगी–पालोती मार्गाचे काम तातडीने पूर्ण करून नागरिकांची गैरसोय दूर करावी. तसेच भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडू नये.



## पावसाने पाठ फिरविल्याने हजारो हेक्टरवरील पीक धोक्यात

### दहा दिवसांपासून पावसाचा खंड, दुबार पेरणीची भीती, शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडण्याची शक्यता

**साहूर/जनमाध्यम**

अलनिनोच्या प्रभावामुळे यंदाच्या मान्सूनने लहरीपणा कायम ठेवला असून साहूरसह परिसरात गेल्या दहा दिवसांपासून पावसाने दिलेल्या खंडामुळे खरीप हंगाम संकटात सापडला आहे. कपाशी. सोयाबीन. तूर. उडीद आणि मूग या पिकांची उगवण धोक्यात आली असून हजारो हेक्टरवरील पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे दुबार पेरणीची वेळ येण्याची भीती निर्माण झाली असून शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे.



यंदा रोहिणी आणि मृग नक्षत्रात समाधानकारक पाऊस न झाल्याने पेरण्या रखडल्या होत्या. त्यानंतर आद्रा नक्षत्रात झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने खरीप पेरण्या पूर्ण केल्या. मात्र पिके उगवत असतानाच पावसाने अचानक दडी मारल्याने शेतातील कोवळी रोपे कोमेजू लागली आहेत. अनेक ठिकाणी उगवण खुंटली असून पिकांनी माना टाकण्यास सुरुवात केली आहे. सध्या शेतकरी डवरणी आणि निंदणीची कामे करत असले तरी आभाळाकडे डोळे लावून बसण्याची वेळ आली आहे. पुढील काही दिवसांत चांगला पाऊस झाला नाही तर अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागू शकते. त्यामुळे बियाणे. खत. कीटकनाशके. मशागत आणि मजुरीवर झालेला खर्च वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे.यावर्षी परिसरातील हजारो हेक्टर क्षेत्रात कपाशी. सोयाबीन. तूर. उडीद आणि मूग पिकांची लागवड करण्यात आली आहे. मात्र दीर्घ पावसाच्या खंडामुळे सर्वच पिकांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. अनेक शेतांमध्ये ओलाव्याअभावी उगवण थांबली असून पिके वाळू लागल्याचे चित्र दिसत आहे.

यंदा आधीच बोगस बियाणे आणि निकृष्ट खतांच्या तक्रारींनी शेतकरी त्रस्त आहेत. त्यातच वाढलेला उत्पादन खच. मजुरीचे वाढते दर आणि पावसाची अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे. शासनाकडून मदत मिळेल की नाही याबाबतही साशंकता असल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडले आहेत.

कृषी तज्ज्ञांच्या मते पुढील दोन ते तीन दिवसांत समाधानकारक पाऊस झाल्यास पिकांना काही प्रमाणात जीवदान मिळू शकते. मात्र पावसाचा खंड आणखी वाढल्यास दुबार पेरणी अटळ ठरण्याची शक्यता असून खरीप हंगामावर मोठे संकट ओढवेल. सध्या साहूर आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या ओठांवर एकच प्रश्न आहे. पाऊस कधी बरसणार आणि खरीप हंगाम वाचणार का.

## गुरुपौर्णिमेला भक्तीचा गोड अर्पणभाव

### गजानन महाराजांसाठी लाडू साहित्य समर्पण महायज्ञ

**वर्धा/जनमाध्यम**

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने श्री गजानन महाराजांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वर्धा शहरात लाडू साहित्य समर्पण महायज्ञ आयोजित करण्यात आला आहे. २१ ते २८ जुलैदरम्यान शहरातील विविध संकलन केंद्रांवर भक्तांकडून चणाडाळ, साखर, साजूक तूप आणि सुका मेवा स्वीकारण्यात येणार असून, गुरुपौर्णिमेच्या दिवशी हे साहित्य शेगाव येथे समर्पित करण्यात येणार आहे.

गेल्या सात वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमाला भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. मागील वर्षी वर्धा शहरातून सुमारे सहा लाख रुपयांचे लाडू साहित्य श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव येथे अर्पण करण्यात आले होते. यंदा आठव्या वर्षात प्रवेश करणाऱ्या या उपक्रमात अधिकाधिक भक्तांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शेगाव येथे दररोज हजारो भाविकांना महाप्रसादासह बुंदी लाडू प्रसाद दिला जातो. त्यासाठी मोठ्या प्रमाणात चणाडाळ, साखर, साजूक तूप आणि सुका मेवा लागतो.

या सेवाकार्यात आपल्या क्षमतेनुसार योगदान देण्याची संधी या महायज्ञातून उपलब्ध होत आहे. चारही साहित्य देणे बंधनकारक नसून, इच्छेनुसार कोणतेही एक किंवा अधिक साहित्य समर्पित करता येणार आहे.

मुख्य संकलन केंद्र शांतीभवन, राधिका रेस्टॉरंटजवळ, एलआयसी कार्यालयासमोर, मुख्य रस्ता, वर्धा येथे ठेवण्यात आले असून, प्रतापनगर, पावडे चौक, वंजारी चौक, मगणवाडी, रामनगर, गोंडप्लॉट, धंतोली, म्हाडा कॉलनी, गीताईनगर, मुरारका लेआऊट, बँक ऑफ इंडिया कॉलनी, नागपूर रोड, सिंदी मेघे, स्वागत कॉलनी, सहयोग नगर, रेवतकर लेआऊट, स्वामी समर्थ मंदिर (आलोडी), स्नेहलनगर आणि म्हसाळा आदी भागांतही संकलन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. अधिक माहितीसाठी प्रशांत महल्ले यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## कठड्यावर दुचाकी आदळून मृत्यू

**वर्धा-** भरधाव दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने संरक्षक कठड्यावर जोरदार धडक बसून चालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना भूगाव रेल्वे स्टेशनजवळील कृषक विद्यालय परिसरात घडली. या अपघातात शहालंगडी येथील विलास उगे (५२) यांचा जागीच मृत्यू झाला. ते दुचाकीने हिंगणघाटकडे जात होते. वाहनावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करूनही दुचाकी थेट कठड्यावर आदळली. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी मदतीसाठी धाव घेतली; मात्र गंभीर दुखापतीमुळे त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणाची नोंद पोलिसांनी घेतली असून अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

## डाक विभागाकडून अभिकर्ता पदासाठी अर्ज आमंत्रित

**वर्धा/जनमाध्यम**

भारतीय डाक विभागाकडून डाक जीवन विमा योजनेंतर्गत टपाल जीवन विमा योजनेसाठी थेट अभिकर्ता यांची नेमणूक करण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहे.

अभिकर्ता करिता उमेदवाराचे किमान वय १८ वर्ष असावे, शैक्षणिक पात्रता किमान १० वी पास असावी. बेरोजगार किंवा स्वयंम रोजगारीत शिक्षित युवा, माजी जीवन सल्लागार, इन्शुरन्स कंपनीचे माजी एजेंट, माजी सैनिक, अंगणवाडी सेविका, महिला मंडळ सेविका, सेवानिवृत्त शिक्षक व इतरांना प्राधान्य राहील. उमेदवार दुसऱ्या इन्शुरन्स कंपनीत अभिकर्ता नसावा.

उमेदवाराची निवड थेट मुलाखतीद्वारे व्यावसायिक कौशल्य, व्यक्तिमत्व, परस्पर संबंधाचे कौशल्य, जीवन विम्याबाबत ज्ञानाच्या आधारावर केली जाईल. निवड झालेल्या उमेदवारास ५ हजार रुपयांची अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून ठेवावी लागेल. प्रशिक्षणानंतर डाक विभागाकडून तात्पुरता परवाना देण्यात येईल व परवाना परीक्षा पास केल्यानंतर कायमच्या परवान्यामध्ये रुपांतरीत केल्या जाईल. निवड झालेल्या उमेदवारास टपाल विभागाने वेळोवेळी ठरविलेले कमिशन दिले जाईल.

इच्छुक उमेदवारांनी अधीक्षक डाक घर कार्यालय वर्धा येथे विहित नमुन्यातील अर्ज आणि सर्व शैक्षणिक प्रमाणपत्र तसेच पॅनकार्ड, आधार कार्ड, दहावी किंवा बारावी बोर्डाचे प्रमाणपत्र, जन्मतारखेचे प्रमाणपत्र, संगणक ज्ञानाचे प्रमाणपत्रासह ३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजताच्या दरम्यान उपस्थित राहावे.

अधिक माहितीसाठी जवळच्या डाक कार्यालयास संपर्क साधावा किंवा www.maharashtrapost.gov.in संकेतस्थळाला भेट द्यावी, असे अधीक्षक डाकघर एम.एम.निकम यांनी कळविले आहे.

## रोपांची कलम बांधणी व जैविक खत निर्मितीबाबत प्रशिक्षण कार्यशाळा

**वर्धा/जनमाध्यम**

सामाजिक वनीकरण विभाग, वर्धा आणि कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा यांच्या संयुक्त विद्यमाने रोपांची कलम बांधणी तसेच जैविक खत निर्मिती व वापराबाबत एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी सुहास बढेकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी त्यांनी प्रास्ताविकातून प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांविषयी माहिती दिली. प्रमुख पाहुणे म्हणून वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा केंद्रप्रमुख जीवन कातोरे उपस्थित होते. त्यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देत प्रशिक्षणार्थींना



मार्गदर्शन केले. यावेळी कृषी विद्यापीठ केंद्र यवतमाळचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा केंद्रप्रमुख डॉ. दीपक कच्छवे यांनी विविध प्रजातींच्या रोपांची कलम तयार करण्याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. त्यानंतर विषयतज्ज्ञ पीक संरक्षण व कीटकशास्त्र विभागाचे डॉ. निलेश वजिरे यांनी जैविक खत निर्मिती आणि त्याचा प्रभावी वापर याबाबत पॉवर पॉइंट सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. तसेच प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिकांमधून प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला. कार्यक्रमाला सहाय्यक वनसंरक्षक अंकिता तेलंग, वनपरिक्षेत्र अधिकारी एस. जे. ढोबळे, शीतल डोंगरे, सारिका वैरागडे, जे.बी.लांबाडे, रितेश उमक, एस. डी. एलकेवाड यांच्यासह सामाजिक वनीकरण विभागातील अधिकारी-कर्मचारी, वनपाल, वनरक्षक, वनमजूर आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन विषयतज्ज्ञ विस्तार शिक्षण विभागाच्या डॉ. अंकिता अंगाईतकर यांनी केले.

### नावात बदल

माझे पूर्वी NASEEB KHAN असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील NASIB KHAN MEHBUB KHAN PATHAN नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- झाकीर हुसेन कॉलनी वर्धा 442001**

### नावात बदल

माझे पूर्वी NAZMA KHAN असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील NAZMA KHATUN NASIB KHAN PATHAN नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- झाकीर हुसेन कॉलनी वर्धा 442001**

### नावात बदल

माझे पूर्वी MASUMBEGAM RAHEMTULLA SHAIKH असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील SHAIKH MASUMBI SHAIKH RAHMTULLA नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- विठ्ठल वॉर्ड हिंगणघाट वर्धा 442301**

# आरोग्य मित्र गौरव पुरस्काराने आरोग्य कर्मचाऱ्यांचा सन्मान

**वर्धा/जनमाध्यम**

जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत सन २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आरोग्य संस्था, शल्यचिकित्सक, अधिकारी, कर्मचारी, आशा स्वयंसेविका तसेच एका मुलीवर शस्त्रक्रिया करणाऱ्या दाम्पत्यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्याहस्ते 'आरोग्य मित्र गौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला.

स्व. सिंधुताई सपकाळ सभागृह, जिल्हा परिषद वर्धा येथे आयोजित करण्यात आलेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थान जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) डॉ. ज्ञानदा फणसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा कुरसंगे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नलिनी विखे, माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. मंगेश रेवतकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. हेमंत पाटील, बालरोगतज्ज्ञ डॉ. संजय गाठे, जिल्हा प्रशिक्षण पथकाच्या डॉ. सुवर्णा खोब्रागडे तसेच जिल्हा आयुष अधिकारी डॉ. संदीप नखाते उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. कुटुंब कल्याण शस्त्रक्रियांच्या उद्दिष्टाच्या १०० टक्क्यांहून अधिक कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करत पुढील वर्षातही अशीच उल्लेखनीय कामगिरी करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आरोग्य मित्र गौरव पुरस्कारांतर्गत जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या एकूण ३६ आरोग्य संस्था, शल्यचिकित्सक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे पुरस्कार, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. तसेच १०० टक्क्यांपेक्षा अधिक उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांचाही गौरव करण्यात आला.

एका मुलीवर कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करणाऱ्या दाम्पत्यांचा साडी, चोळी, शाल आणि श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. क्षयरोग, हिवताप आणि कुष्ठरोग विभागातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले यांनी सांगितले की, सन २०२५-३६ या वर्षासाठी वर्धा जिल्ह्याला ५ हजार ६४० कुटुंब कल्याण शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी ७ हजार ६९६ शस्त्रक्रिया पूर्ण करून जिल्ह्याने निर्धारित उद्दिष्ट गाठले आहे. यामध्ये पुरुष शस्त्रक्रियांचे प्रमाण वाढविण्याची गरज असून, पुरुषांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत वाडीभस्मे यांनी केले. तर उपस्थित मान्यवर आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांचे आभार डॉ. संदीप नखाते यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आम्रपाली मोरे, शेख हुसेन, गजानन पिसे, शशिकांत अरसड, गजानन थुल, प्रदीप लोखंडे, कविता बकाले, आरती मावकर आणि शास्वतुल मेश्रामम यांनी सहकार्य केले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २३०**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# राजपूत समाजाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार सन्मान

**अमरावती/ प्रतिनिधीः-** महाराणा प्रतापसिंह सार्वजनिक सेवा समितीच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त राजपूत समाजातील गुणवंत विद्यार्थी आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या युवकांचा सन्मान १ ऑगस्ट रोजी श्याम चौक येथील जोशी हॉलमध्ये करण्यात येणार आहे. अशी माहिती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आज गुरुवार १६ जुलै रोजी पत्रकार परिषदेत दिली. पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, इयत्ता १० वी आणि १२वीच्या परीक्षेत ८० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी, खेळ, साहित्य आणि कला क्षेत्रात विशेष कामगिरी करणारे विद्यार्थी तसेच पदवी स्तरावर प्रथम श्रेणी किंवा त्याहून अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी या सन्मानासाठी पात्र आहेत.

यामध्ये वैद्यक, अभियांत्रिकी, कृषी सह सर्व पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थी अर्ज करू शकतात. इच्छुक विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक आणि इतर क्षेत्रातील कामगिरीचे कागदपत्र २५ जुलैपर्यंत ठाकूर फटाका भांडार, गांधी चौक, अमरावती येथे जमा करावे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, स्मृतीचिन्ह आणि रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. कार्यक्रमात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवन आणि स्वातंत्र्य लढ्यातील योगदानावर वक्ते प्रकाश टाकतील.

या सोहळ्याचे अध्यक्षस्थानी सुरेशसिंह ठाकूर असतील.समितीचे अध्यक्ष डॉ. जितेंद्रसिंह राजकुमार आणि सचिव प्रा. राकेशसिंह ठाकूर यांनी अमरावती शहर, बडनेरा आणि नांदगावपेठ परिसरातील पात्र विद्यार्थी आणि पालकांना वेळेत अर्ज करून सन्मान समारंभाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. पत्रकार परिषदेमध्ये समितीचे अध्यक्ष डॉ.जितेंद्र सिंह राजकुमार, राकेश सिंह ठाकुर, उपाध्यक्ष शक्तिसिंह राठोड, सहसचिव गजाननसिंह ठाकूर, संजयसिंह पवार, विजयसिंह सिसोदिया, रुद्रपाल सिंह ठाकुर आदी उपस्थित होते.

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 56/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक शिव शक्ती सेवा ट्रस्ट बुन्देलपुरा अचलपूर, ता.अचलपूर जि.अमरावती
बाबत अर्जदार - श्री सागर आसाराम गौर

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत (वर्णन) - २५,०००/-
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०५.०५.२०२६** रोजी दिली.

शिक्का
अधीक्षक,(न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

## जाहीर नोटीस

प्रो.नं.१७१९/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१६.०७.२०२६

**वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**
**किरकोळ अर्ज क्र.२९४/२०२६** **दिनांक १७.०८.२०२६**

अर्जदार -
१. **सुधाकर ओंकारराव कावडकर,** वय ७३ वर्षे, धंदा - शेती
२. **अशोक ओंकारराव कावडकर,** वय ६३ वर्षे, धंदा - शेती
३. **दिलीप ओंकारराव कावडकर,** वय ५३ वर्षे, धंदा - शेती
४. **दिवाकर ओंकारराव कावडकर,** वय ६५ वर्षे, धंदा - शेती
५. **प्रतिभा विलास निचळ,** वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा. गणेशपुर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

--- विरुध्द ---

**गैरअर्जदार- निरंक**

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **ओंकार दामोधर कावडकर** हे दिनांक ०१.०६.२००८ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१६.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** - जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा बु. येथील भूमापन गट नं.१०२ याचे एकुण क्षेत्र ०० हे.६३ आर यापैकी लिहून देणार **१) विनोद महादेव पांडे** यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे.६३ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अमरावती
दिनांक १७.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के.डी.शिराळे,
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.एस.बी.कळदाते,सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४०८/२०२६
**चंदा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०८.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Chanda PurushottamMudholkar, Age 46 Yrs. Occu.: Housewife R/o At Near Panchashil Nagar, Wadarpura, Amravati.
2. Puja Sumit Pawar, Age 29 Yrs. Occu.: Education R/o.At NearZP School, Buranda, Yavatmal
3. Arati Jivanlal Jain, Age 25 Yrs. Occu.: Education R/o Tarkhedi, Jhabua M.P.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **पुरुषोत्तम परसराम मुधोळकर** हे दिनांक 07.08.2014 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **चंदा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **चंदा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **११.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३०९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
**वि.श्री. एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१०२४/२०२६**
**कांतादेवी विरुध्द निरंक**
**पुढील ता.०४.०९.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Kantadevi Lunkaran Jajoo,** Age 86 Yrs. Occu.: Household R/o. Shriniketan Apartment Khaparde Bagicha, Amravati
2. **Karuna Hemant Murkey,** Age 64 Yrs. Occu.: Doctor R/o. Murkey Hospital Walcut Compound, Amravati
3. **Veena Sudarshan Indani,** Age 63 Yrs. Occu.: Household R/o Neelkanth Apartment Model Colony, Pune
4. **Sanjiv Lunkaran Jajoo,** Age 59 Yrs. Occu.: Business R/o A-506, C.S. Road, Dahisar East Mumbai
5. **Varsha Mohan Rathi**, Age 56 Yrs. Occu.: Household R/o 104, Shri Niketan Apartment, Khaparde Bagicha Amravati
6. **Shailesh Lunkaran Jajoo,** Age 54 Yrs. Occu.: Business R/o Poonayai, Rallies Plot Near Daryav School, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत लुनकरण नंदकिशोर जाजू** हे दि.२९.०८.२०२५ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार कांतादेवी व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार कांतादेवी व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

## जाहीर नोटीस
**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३३३/२०२६ ने.ता.०७.०८.२०२६

अर्जदार :
१. नुरजहाबी मीर अली करार, वय ६७ धंदा - मजुरी
२. अमरीन जावेद अली, वय ३९ धंदा - घरकाम
३. सैयदा सुगरा फातेमा जावेद अली, वय १० धंदा - शिक्षण
४. मोहम्मद जाफर अली जावेद अली, वय ०८ धंदा - शिक्षण
अर्जदार नं.३ व ४ अज्ञान अ.पा.क.आई अर्जदार क्र.२
सर्व रा.गवळी पुरा, चांदुर बाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक जावेद अली मीर अली करार** यांचा मृत्यू दिनांक **३१.०३.२०२६** रोजी **ॲन्झॉन हॉस्पीटल, अमरावती, ता.जि.अमरावती** येथे झालेला असून ते कायमचे रा.गवळीपुरा, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होते. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३३३/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१०.०७.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.ए.बी.कट्टे,२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३२३/२०२६
**शिवकन्या व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१९.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Shivkanya Gokuldas Sadar, Age 63 Yrs. Occu.: Household
2. Rushikesh Gokuldas Sadar, Age 34 Yrs. Occu.: Service Both R/o.Infront of Takhatmal School, Near Sai Nagar Temple, Chandravati Nagar, Amravati
3. Rutika Abhishek Purohit, Age 28 Yrs. Occu.: Household R/o Gajanan Jinig Old Bus Stand Malegaon, Dist.Washim

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **गोकुलदास गोविंदराव सदार** हे दिनांक 12.02.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शिवकन्या व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शिवकन्या व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.एस.बी.कळदाते,२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११८६/२०२६
**निर्मला व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२०.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Nirmala Dadarao Madane, Age 57 Yrs. Occu.: Housewife R/o Bhoipura At Pardi, Tq. Dist. Amravati
2. Sunita Ramesh Babnekar, Age 76 Yrs. Occu.: Household R/o.Kazipura At Post Kapustalani, Tq.Anjangaon Surji, Dist.Amravati.
3. Harida Ramkrushna Mahore, Age 56 Yrs. Occu.: Labour R/o Ward No.3, Surwadi Khurd, Tq. Tiosa, Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **किसनराव उर्फ रामकृष्ण नारायण आणि शांताबाई किसनराव माहोरे** हे अनुकमे दिनांक 21.02.2003 व 27.10.2005 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **निर्मला व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निर्मला व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**CHANGE IN NAME**

**Vandana Dinesh Gulhane**
लग्नानंतरचे नाव...
**Puja Milind Dhole**
हे दोन्ही नाव एकाच व्यक्तीचे आहे

## जाहीर नोटीस

नमुना क्रमांक १

अमरावती येथील मा.वि.प्र.पाटकर, प्रमुख न्यायाधिश, कौटूंबिक न्यायालय यांच्या न्यायालयातील

पिटीशन क्र.अ-७०/२०२६ पेशी दिनांक ११ ऑगस्ट २०२६

**गोपाल शंकरप्रसाद तिवारी** ...वादी
-- विरुध्द --
**सौ.गिता गोपाल तिवारी** ....प्रतिवादी

**प्रति,**
**सौ.गिता गोपाल तिवारी**
**रा.जयप्रकाश चौबे यांचे घरी रामापूर, सासन, ता.दर्यापूर, जि.अमरावती**

ज्याअर्थी उपरनामित अर्जदारांनी आपल्या विरुध्द वाद पत्रात नमुद केल्याप्रमाणे दावा दाखल केला आहे.

आपणास हे समन्स बजावल्यापासून ३ आठवडयाच्या आत न्यायालयाच्या परवानगीसह व्यक्तीश आपली उपस्थिती याव्दारे आवश्यक आहे, आणि त्याअर्थी सदरहू दावा निर्देशाकरिता दिनांक **११ ऑगष्ट २०२६** दिवशी न्यायाधिशांच्या बोर्डावर ठेवण्यात येईल

आपणास या व्दारे फर्माविण्यात येते की, आपण वादीच्या दाव्याला उत्तर देण्याकरिता न्यायधिशांच्या समोर दिनांक **११ ऑगस्ट २०२६** या दिवशी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहावे.

वर नमुद केलेल्या उपस्थित पक्षकाराचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायाधिश, कौटूंबिक न्यायालयाचे समूपदेशक यांचे समोर सुनावणीच्या तारखेसंबंधी आणि पिटीशन संबंधातील अन्य प्रकरणाबाबत निर्देश देतील याची नोंद घ्यावी.

आपणास अधिक सूचना देण्यात येते की, आपणावर निर्देश दिल्या प्रमाणे व्यक्तीगत आपली उपस्थिती दाखल करण्या कामी कसूर केल्यास किंवा वर नमुद केलेल्या दिवशी न्यायाधिशासमोर उपस्थित राहण्यास कसूर केल्यास पिटीशन त्याच दिवशी किंवा कोणत्याही पुढील दिवशी बचाव दिलेला नाही. या मथळ्याखाली बोर्डावर ठेवण्यात येईल आणि आपणा विरुध्द हुकूमनामा किंवा आदेश संमतपात्र राहाल.

मुख्य न्यायाधिश कौटूंबिक न्यायालय, अमरावती यांचे साक्षेने
आज दिनांक ०७ जुलै २०२६ रोजी दिले.

शिक्का
**आदेशानुसार,**
**सही/-**
**प्र.प्रबंधक**
**कौटूंबिक न्यायालय, अमरावती**

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 101/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक त्रिरत्न बौध्द उपासक व्यवस्थापन सेवा समिती ट्रस्ट परसोडा ता. जि.अमरावती
बाबत अर्जदार - सौ.रत्ना सोमेश्वर सोनोने

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत (वर्णन) - ५०००/-
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **१४.०७.२०२६** रोजी दिली.

शिक्का
अधीक्षक,(न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३५६/२०२६
**श्रीमती दीपा अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१७.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Smt.Deepa @ Sindhutai Wd/o Dilip Wane, Age 60 Yrs. Occu.: Housewife
2. Ashwini D/o Dilip Wane (Before Marriage) Sau.Ashwini W/o Nitesh Gangasagar (After Marriage), Age 32 Yrs. Occu.: Service
3. Ku.Kajal D/o Dilip Wane, Age 27 Yrs. Occu.: Education All R/o Ambika Apartment, G-2, New Colony, Dastur Nagar, Rukhmini Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Dilip Devidas Wane हे दिनांक 19.03.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Deepa @ Sindhutai Wd/o Dilip Wane+2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Deepa @ Sindhutai Wd/o Dilip Wane+2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१४.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२१२/२०२६
**श्रीमती शहनाज बी अधिक पाच -वि- निरंक**
पुढील ता.१०.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Shahnaz Bee Shaikh Karim, Age 58 Yrs. Occu.:
2. Shaikh Salim Shaikh Karim, Age 40 Yrs. Occu.: Labour
3. Mohd Sajid Shaikh Karim, Age 38 Yrs. Occu.: Labour
4. Shaikh Aqueel Mansoori Shaikh Karim Mansoori,Age 34 Yrs. Occu.: Labour
5. Sheikh Shakeel Shaikh Karim Mansoori,Age 33 Yrs. Occu.: Labour
6. Shaikh Sabir Sheikh Karim Mansoori Pinjari Age 39 Yrs. Occu.: Labour All R/o Near Masjid Masanganj, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शेख करीम शेख अल्लाहुदीन मन्सुरी** हे दिनांक 06.07.2018 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शहनाज बी अधिक पाच विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शहनाज बी अधिक पाच विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०८.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**फ्लॅट विकणे आहे**

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.
**संपर्क:**
**९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**

**CHANGE IN NAME**

**मिलिंद देविदास ढोले**
**Milind Devidas Dhole**
**Milind Devidaspant Dhole**
हे दोन्ही नाव एकाच व्यक्तीचे आहे.

## सूचना

सर्व लोकांस जाहीर सूचित करण्यात येते कि मी रावसाहेब नीलकंठ गाडे रा. जळका हिरापूर ता. भातकुली जि. अमरावती, मौजे देवरी ता. भातकुली जि. अमरावती येथील भुमापन क्र व उपविभाग २०४ भोगवट दार वर्ग २ या शेत मालमत्तेत माझा अविभाजीत हिस्सा आहे. तेव्हा या शेत मालमत्तेची मला विचारात नं घेता कोणीही खरेदी विक्री करू नये केल्यास ते अवैध ठरण्यात येईल याची नोंद घ्यावी

रावसाहेब नीलकंठ गाडे

## जाहीर सूचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **सतीश दौलतराव चव्हाण, रा. ऐश्वर्या अपार्टमेंट, कोट बागी हॉस्पिटल जवळ, डीपी रोड, औंध पुणे जिल्हा पुणे ४११ ००७** यांनी **मनोज विनायकराव डफळे, रा.अतुल मंगल कार्यालयाजवळ, सिंधू अपार्टमेंट, रुख्मिणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती** यांच्या सोबत त्यांच्या मालकी व ताब्यातील खाली वर्णन केलेली मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मालमत्तेचे वर्णन**

**मौजा-मंगरुळ चौव्हाळा प्र.व ता. नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती ग्रा.प.आहे.स.डी. नांदगाव खंडेश्वर, जि.प.अमरावती,** पं.स.सर्वे नं./गट क्र.३४१ भो.वर्ग १, ४ हे ६० आर.रु. ६०.५० पै. यातील माझे मालकीचे व ताब्यातील पूर्व पश्चिम वाटणीचे उत्तरे कडील भागाची १ हे २१ आर जमीन पूर्व तदंगभूत वस्तूसह इतर झाड झुडुपासह माती गोटे सह सदर कोरड वाहू जमीन सर्व हक्कांसह सतीश दौलतराव चव्हाण, रा.ऐश्वर्या अपार्टमेंट, कोट बागी हॉस्पिटल जवळ, डीपी रोड, औंध पुणे जिल्हा पुणे ४११ ००७ यांना मालकी हक्काने खरेदी देत आहे.

सदर्हू शेत हे हंगामी ओलीतांचे आहे, या शेताची चतुर्सिमा खालीलप्रमाणे -

**पुर्वेस - मुन्ना कलोजी यांचे शेत, पश्चिमेस - चंद्रकला अंबादास भुमरे यांचे शेत**
**उत्तरेस - नारायण हरी लोणारे यांचे शेत , दक्षिणेस- हायवे रोड**

वरील नमुद मालमत्तेमध्ये अथवा त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा, कोणताही हक्क, गहाण, बोजा, हितसंबंध, अधिकार, धारणाधिकार, सुविधाधिकार, करार, इत्यादी असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आंत आपला आक्षेप असल्यास खालील पत्त्यावर संबंधीत कागदपत्रांसह येऊन भेटावे.

असा कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार सदर्हू मालमत्तेची खरेदी करुन घेतील व त्यांनतर माझे पक्षकाराचे खरेदी व मालकी हक्का बाबत कोणत्याही प्रकारची आक्षेप, वाद अथवा उजर चालणार नाही व तो माझ्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक १६/०७/२०२६**

**सही /-**
**ॲड. मनिष जी. बिडकर**
ॲडव्होकेट/नोटरी
रा.लक्षव्दीप कॉलनी, शेगाव-रहाटगाव रोड, अमरावती, ता.जि.अमरावती
मो.-९९७५२०१९०८

## जाहीर नोटीस

प्रो.नं.१६७६/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१४.०७.२०२६

**वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**
**किरकोळ अर्ज क्र.२९०/२०२६** **दिनांक १३.०८.२०२६**

**अर्जदार - १. श्रावण नारायण वानखडे,**
वय ४७ वर्षे, धंदा - मजुरी
रा.बोराळा, ता.दर्यापूर, जि.अमरावती

--- विरुध्द ---

**गैरअर्जदार- निरंक**

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **गुणाबाई नारायण वानखडे** हया दिनांक २३.०२.२०२५ रोजी व त्यांचे पति नारायण पांडूरंग वानखडे हे दि. ०९/१०/२००८ रोजी मरण पावलेले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१४.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११००/२०२६
**आशुतोष व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२९.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Ashutosh Narendra Ingale, Age 33 Yrs. Occu.: Pvt. Job R/o Kakkad Layout Near Gajanan Maharaj Sai Nagar, Amravati
2. Damini Narendra Ingale, Age 28 Yrs. Occu.: Job R/o.Ward No.4, At Post Wathoda Shukleshwar, Tq.Bhatkuli, Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रेखाताई बाजीराव देशमुख व नरेंद्र उर्फ उमेश गोविंदराव इंगळे** हे अनुकमे दिनांक 23.07.2006 व 17.11.2008 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **आशुतोष व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **आशुतोष व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.एस.बी.कळदाते,२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२१७/२०२६
**आशा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०४.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Nirmala Dadarao Madane, Age 68 Yrs. Occu.: Household
2. Sunita Ramesh Babnekar, Age 41 Yrs. Occu.: Household R/o.Kazipura At Post Kapustalani, Tq.Anjangaon Surji, Dist.Amravati.
3. Harida Ramkrushna Mahore, Age 41 Yrs. Occu.: Labour R/o Ward No.3, Surwadi Khurd, Tq. Tiosa, Dist. Amravati.
4. Sarika Bhagwanrao Bawane, Age 43 Yrs. Occu.: Household R/o Ward No.4, Amani Road Shastri Nagar, Arni, Tq.Arni Dist.Wardha

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **भगवान नागोजी बावणे** हे दिनांक 28.06.2017 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **आशा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **आशाव ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### पांदण रस्त्याचे काम पूर्ण शेतकरी आनंदी

**शिराळा** - येथील शिराळा ते खराळा व शिराळा ते कोल्ही रस्ता या पांदण रस्त्याचे मातोश्री पांदण रस्त्या अंतर्गत काम पूर्ण झाले असून या कामाचे श्रेय आ. राजेशजी वानखडे यांच्याकडे जाते त्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार त्यांनी काम पूर्ण केले असून शेतकऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहे. या रस्त्यावरून शेतकऱ्यांची ये जा दळणवळण सुरू झालेले असून त्यामुळे पेरणीचे काम सुलभ झाले आहे त्याकरिता शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.तसेच शिराळा गावातील सर्व पांदण रस्ते पुर्ण झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. या बाबींचे श्रेय आ. राजेश वानखडे यांना दिले आहे.त्यांनी शिराळा येथील शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते त्याप्रमाणे शिराळा येथील सर्व पांदण रस्ते झाले आहे.

### घरातून लाखांचे सोन्याचे दागिने लंपास

**धामणगाव रेल्वे**-दत्तापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तेलघाणी मोहल्ला परिसरात घरातून सुमारे १ लाख ७० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची घटना घडली. दुर्गा भगवानसिंग राणा (वय ३०, व्यवसाय मजूर, रा. तेलघाणी मोहल्ला, धामणगाव रेल्वे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार,त्यांच्या घरातील कपाटातून १५ ग्रॅम सोन्याची पोत, ८० सोन्याचे मणी आणि ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पेंडॉल असे एकूण २५ ग्रॅम वजनाचे, सुमारे १ लाख ७० हजार रुपये किमतीचे दागिने चोरीला गेले.बिशीचे पैसे देण्यासाठी कपाट उघडून बाहेर गेल्या असता कपाटाची चावी तशीच राहिली होती. त्यावेळी घरात उपस्थित असलेल्या मंगला (वय ४०, रा. रामीलचाळ, बडनेरा, अमरावती) व ज्योती संतोष खोब्रागडे (वय ४०, रा. तेलघाणी मोहल्ला, धामणगाव रेल्वे) यांच्यावर चोरीचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### घरासमोर उभ्या ऑटोतून बॅटरीची चोरी

**वरूड**-शेघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पुनर्वसन परिसरात घरासमोर उभ्या असलेल्या ऑटोरिक्षामधून बॅटरी चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. गुलाब सुदामजी देशभ्रतार (वय ६४, व्यवसाय – ऑटो चालक, रा. पुनर्वसन ७२, पुसला, ता. वरूड, जि. अमरावती) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार,१५ जुलै रोजी दुपारी ३ वाजेदरम्यान त्यांच्या घरासमोर उभ्या असलेल्या अल्फा कंपनीच्या एमएच-१९-बीयू-२२६१ क्रमांकाच्या ऑटोरिक्षामधील काळ्या रंगाची बॅटरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. चोरीस गेलेल्या बॅटरीची किंमत सुमारे ६ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी शेघाट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# प्रलंबित मागण्यांकरीता मेंढपाळ आक्रमक

**अमरावती/का.प्र.**

मेंढपाळ समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, या मागणीसाठी मेंढपाळ समाजाने १६ जुलै पासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी, अमरावती यांच्यामार्फत राज्य शासनाला सादर करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्रातील मेंढपाळ समाज अनेक वर्षांपासून वन विभाग, पशुसंवर्धन विभाग तसेच इतर शासकीय विभागांशी संबंधित विविध समस्यांना सामोरे जात आहे. वारंवार निवेदने व पाठपुरावा करूनही मागण्यांची पूर्तता न झाल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे.



## बेमुदत अन्नत्याग आंदोलनाचा इशारा

समाजाच्या काही मागण्यांमध्ये वनक्षेत्रात पारंपरिक पद्धतीने मेंढ्या-शेळ्या चारण्यास अडथळे निर्माण करू नयेत, वन विभागाकडून दाखल करण्यात आलेल्या अन्यायकारक गुन्हे व दंड प्रकरणांचा पुनर्विचार करावा, चराई मार्ग, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व मुक्कामासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, पशुसंवर्धन विभागामार्फत नियमित लसीकरण, मोफत आरोग्य तपासणी व पशुवैद्यकीय सेवा गावपातळीवर उपलब्ध कराव्यात, मेंढपाळ समाजासाठी स्वतंत्र कल्याणकारी योजना, आर्थिक सहाय्य व विमा संरक्षण लागू करावे, भटक्या मेंढपाळांच्या पारंपरिक व्यवसायाचे संरक्षण करावे, स्वतंत्र आरक्षणाची तरतूद करावी, स्वतंत्र मेंढपाळ विकास महामंडळाची स्थापना करून निधी उपलब्ध करावा तसेच साथीचे रोग, विषबाधा, नैसर्गिक आपत्ती किंवा वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या मेंढ्यांसाठी तातडीने पंचनामा करून योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशा मागण्यांचा समावेश आहे. या मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा १६ जुलै पासून सुरू होणाऱ्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वनमंत्री, पशुसंवर्धन मंत्री, मुख्य सचिव, प्रधान मुख्य वनसंरक्षक, प्रधान सचिव (वन), पशुसंवर्धन आयुक्त, संचालक, विभागीय आयुक्त, संबंधित जिल्हाधिकारी, उपवनसंरक्षक आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

## पत्रकार व वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मागण्या शासन स्तरावर सोडविणार-आ.प्रवीण पोटे

**कुऱ्हा/वार्ताहर**

प्रिंट मीडिया व इलेक्ट्रॉनिक मीडिया पत्रकारांच्या तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांच्या समस्या अनेक वर्षापासून शासन स्तरावर प्रलंबित आहे. याबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करून सोडविणार असल्याचे प्रतिपादन नवनिर्वाचित विधानपरिषद आ.तथा माजी पालकमंत्री प्रवीण पोटे यांनी केले आहे.

अमरावती जिल्हा स्थानिक स्वराज्यसंस्था मतदारसंघातून विधानपरिषदेमध्ये प्रवीण पोटे निवडून आल्याबद्दल अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाकडून त्यांचा सत्कार करण्यात आला आहे. व यावेळेस पत्रकार व वृत्तपत्र विक्रेता मागण्या बाबत त्यांना निवेदन देण्यात आले आहे. पत्रकार शासनाचे धोरण व शासन योजनाजागृती वृत्तपत्र व इलेक्ट्रॉनिक इंडियाच्या माध्यमातून करीत आहे. ते वृत्तपत्र नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचण्याचे काम वृत्तपत्र विक्रेता करीत आहे. परंतु अनेक वर्षापासून यांच्या समस्या व मागण्या शासन स्तरावर प्रलंबित आहे. अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन २०२२ मध्ये प्राईम हॉटेल अमरावती येथे घेण्यात आले होते त्यामधील २१ ठराव निवेदनाच्या माध्यमातून प्रवीण पोटे यांना देण्यात आले आहे. यावेळी अखिल भारतीय पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर सुने, राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रदीप जोशी, राष्ट्रीय चिटणीस अशोक पवार,प्रदेश संघटक दिनेश भटकर, नागपूर महिला मंच कार्याध्यक्ष प्रिती पडोळे, निलेश राजस हजर होते.



## मतदार यादी अचुक,दोषमुक्त,पारदर्शक करण्यासाठी सर्वांनी पुढे यावे- अरखराव

**अचलपू/वार्ताहर**

मतदार यादी अचूक, अद्यावत, पारदर्शक आणि दोषमुक्त करण्याच्या उद्देशाने ०४२ अचलपूर विधान सभा मतदार संघात विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ (एस.आय.आर ) अभियानाला प्रारंभ झाला असुन या मोहीमच्या यशस्वी अंमलबजावणी करीला मतदारांसह राजकीय पक्ष तसेच प्रसार माध्यमांनी सक्रीय सहभाग नोंदवावा असे आवाहन मतदार नोंदणी आधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी केले.

या संबधी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलतांना विशेश सखोल पुनरीक्षण (एस. आय.आर) अभियानाची उद्दीष्टे, कार्यपध्दती आणि मतदारांची भूमिका याबाबत सविस्तर माहिती सांगितली. प्रशासनाने दिलेल्या माहिती नुसार प्रत्येक पात्र मतदाराने आपल्या मतदार केद्र स्तरीय अधिकारी (बिएलओ) यांच्याशी संपर्क साधून गणना अर्ज भरावा. मतदार यादीत नाव,पत्ता,वय छायाचित्र आदी तपशिला मध्ये आवश्यक दुरुस्ती असल्यास ही तातडीने करुण घेऊण मय्यत स्थालातरीत,दुबार मतदारांनी मतदाराची वगळणी करावी.तसेच कोणत्याही पात्र मतदार नोंदणी पासुन वंचित राहणार नाही. यासाठी मतदारांनी पुढाकार घेण्याचे आवाहण करण्यात आले.

# राज्यातील विजेची मागणी २५ हजार मेगावॅटवर

## पाऊस लांबल्यास मागणीत आणखी वाढ होणार

**नागपूर**-राज्यातील अनेक भागात पावसाने उघडीप दिल्यामुळे तापमान वाढले असून विजेची मागणी पुन्हा वाढली आहे. घरगुती ग्राहकांकडून पंखे, कुलर आणि वातानुकूलित यंत्रांचा वापर वाढला आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांकडून कृषी पंप सुरू झाल्याने बुधवारी दुपारी २ वाजता राज्यातील विजेची मागणी २४ हजार ९२५ मेगावॉटवर पोहोचली. पाऊस आणखी लांबल्यास ही मागणी वाढण्याची शक्यता वीज क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

राज्यात बुधवारी दुपारी २ वाजता राज्यात १५ हजार ७८७ मेगावॉट वीजनिर्मिती होत होती. केंद्र सरकारच्या वाट्यातून राज्याला ९ हजार ३३१ मेगावॉट वीज उपलब्ध झाली.

त्यामुळे वाढलेली मागणी पूर्ण करण्यात कोणतीही अडचण आली नाही. राज्यात सर्वाधिक ५ हजार ८१ २९२ मेगावॉट वीजनिर्मिती महानिर्मितीकडून होत होती. त्यामध्ये औष्णिक प्रकल्पांतून ४ हजार ९५७मेगावॉट, उरण गॅस प्रकल्पातून २५३ मेगावॉट, सौर प्रकल्पातून १८८ मेगावॉट आणि इतर स्रोतांचा समावेश होता.

खासगी प्रकल्पांमधून जिंदलकडून ६११ मेगावॉट, अदानीकडून १ हजार ४६३ मेगावॉट, रतन इंडियाकडून ९१९ मेगावॉट, बुटीबोरी आरईएलकडून ४१४ एसडब्लूपीजीएलकडून मेगावॉट, ३०२ मेगावॉट, जिंदल पॉवरकडून १७३ मेगावॉट तसेच इतर स्रोतांकडूनही वीज उपलब्ध होत होती.

दरम्यान, राज्यात पाऊस आणखी लांबल्यास कृषी पंपांचा वापर वाढेल. त्याचा थेट परिणाम विजेच्या मागणीवर होण्याची शक्यता वीज क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

**विजेची मागणी २० हजार मेगावॉटवर**

महावितरणकडील विजेची मागणी पुन्हा झपाट्याने वाढत आहे. ६ जुलै २०२६ रोजी ती १३ हजार ३९२ मेगावॉटपर्यंत घसरली होती. मात्र १५ जुलै रोजी ही मागणी १९ हजार ९०७ मेगावॉटपर्यंत पोहोचली आहे.

### महानिर्मितीचे चार संच बंद

बुधवारी दुपारी महानिर्मितीच्या खापरखेडा येथील संच क्रमांक ४, चंद्रपूर येथील संच क्रमांक ७ तसेच भुसावळ येथील संच क्रमांक ५ आणि ६ बंद होते. काही संच नियोजित देखभाल-दुरुस्तीसाठी, तर काही तांत्रिक बिघाडामुळे बंद असल्याचे सांगण्यात आले. हे संच लवकरच सुरू होतील, असा दावा अधिकाऱ्यांनी केला.

## हैदतपूर-वडाळा टोल नाक्यावर रविवारी रास्ता रोको

### टोलमुक्तीसाठी लोक विकास संघटनेचे निवेदन

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

हैदतपूर-वडाळा टोल नाक्यावर स्थानिक नागरिकांकडून अन्यायकारक पद्धतीने टोल आकारला जात असून, महामार्गाचे बांधकाम पूर्ण होण्यापूर्वीच टोल वसुली सुरू करण्यात आल्याचा आरोप करत लोक विकास संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे. या संदर्भात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) व टोल नाका व्यवस्थापकांना निवेदन देत १९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता हैदतपूर-वडाळा टोल नाक्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची पूर्वसूचना देण्यात आली आहे.

लोक विकास संघटनेचे संस्थापक तथा अध्यक्ष गोपाल म. भालेराव यांनी दिलेल्या निवेदनात टोल नाक्याच्या २५ किलोमीटर परिसरातील सर्व स्थानिक नागरिकांना टोलमुक्त करण्यात यावे, महामार्गाचे पूल व इतर सर्व अपूर्ण कामे पूर्ण झाल्यानंतरच टोल वसुली सुरू करावी आणि स्थानिक नागरिकांवरील अन्याय तातडीने थांबवावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

या मागण्यांकडे वारंवार लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. त्यामुळे जनहितासाठी शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने रास्ता रोको आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच प्रशासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घेऊन आंदोलनाची वेळ येऊ नये, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

आंदोलनाबाबतची प्रत पोलिस स्टेशन, चांदूर बाजार येथेही देण्यात आली आहे.

## साऊर-तळवेल मार्गावर जीवघेणा खड्डा!



**साऊर ते तळवेल मार्गावर रस्त्याच्या मध्यभागी नाल्यासारखा तब्बल ५ ते ६ फूट खोल व मोठा खड्डा पडला आहे. पावसाचे पाणी साचल्यामुळे हा खड्डा वाहनचालकांना दिसत नाही. त्यामुळे दुचाकी, चारचाकी आणि इतर वाहनांना अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ या धोकादायक खड्ड्याची दुरुस्ती करून नागरिकांचा जीव वाचवावा, अशी परिसरातील नागरिकांची जोरदार मागणी आहे.**

**छायाचित्र : संतोष शेंडे,** टाकरखेडा शंभू

## पी.आर.पोटे पाटील नर्सिंग महाविद्यालय तर्फे हेल्थ चेक अप कॅम्प

**अमरावती/का.प्र.**

आपल्या विविध नावीन्यपूर्ण उपक्रमातून जनमानसात आपली अनोखी ओळख निर्माण केलेल्या पी. आर. पोटे पाटील नर्सिंग महाविद्यालय, अमरावती तर्फे नर्सिंग अभ्यासक्रमाचे महत्व आणि मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजावित तथा सामाजिक बांधिलकीची जान व्हावी ह्या हेतूने स्थानिक ईश दया निराधार केंद्र, अमरावती येथे नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून केंद्रातील निराधार तसेच मानसिक-शारीरिक विकलांग असलेल्या ५७ मुलींची आणि महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

ह्यामध्ये रक्त, थायरॉईड अशा विविध प्रकारच्या महत्वपूर्ण वैद्यकीय चाचण्या निशुल्कपणे करण्यात आल्या.




महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शेबा शाजी ह्यांच्या संकल्पनेतून आणि संस्थेच्या डॉ. शरयू वानखडे ह्यांच्या वैद्यकीय मार्गदर्शनातून ही आरोग्य तपासणी यशस्वीपणे पार पडली. अशा सामाजिक उपक्रमातून विद्यार्थ्यांना समाज मन आणि त्यांचे आरोग्य कळण्यास मदत होते, असे मत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शेबा शाजी ह्यांनी ह्यावेळी व्यक्त केले. डॉ. शरयू वानखडे ह्यांनी रुग्णांची तपासणी करीत त्यांना आरोग्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कॅम्पच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शेबा शाजी, संस्थेच्या आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयातील डॉ. शरयू वानखडे तसेच विविध विभागांचे तंत्रज्ञ, तसेच नर्सिंग महाविद्यालयाचे आशिष ईंगळे, शुभांगी केळझरे, विद्यार्थ्यांचे व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## कला व विज्ञान महाविद्यालयात 'एक पेड माँ के नाम'उपक्रमांतर्गत वृक्षलागवड





**कुऱ्हा/वार्ताहर**

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे. याच उद्देशाने भारत सरकारने 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाद्वारे प्रत्येक नागरिकाने आपल्या आईच्या सन्मानार्थ एक वृक्ष लावावा, त्याचे संगोपन करावे आणि पर्यावरण संरक्षणात आपले योगदान द्यावे, असा संदेश दिला.

पर्यावरण रक्षण व संवर्धनाच्या दृष्टीने महाविद्यालयाचे निसर्ग मंडळ राशी व विभाग सतत कार्यरत असतो पावसाळ्यात महाविद्यालयात १जुलै ते ३१ जुलै या कालावधीत वृक्षारोपण केले जाते. महाविद्यालयाचा परिसर हिरव्यागार वनराईने समृद्ध असावा या दृष्टीने वृक्षांचे जतन व संवर्धन केले जाते त्याकरिता विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

यानंतर सर्व विद्यार्थी, शिक्षक,कर्मचारी व उपस्थित नागरिकांनी आपल्या आईच्या नावाने विविध प्रकारची झाडे लावली. लावलेल्या रोपांना पाणी घालण्यात आले तसेच प्रत्येक रोपाचे नियमित संगोपन करण्याचा संकल्प करण्यात आला.या उपक्रमात शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, तसेच स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सर्वांनी मिळून वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनासाठी आपले योगदान दिले.हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला असून भविष्यातही अशा उपक्रमांचे नियमित आयोजन करण्याचा संकल्प करण्यात आला.याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय अभ्यंकर यांचे मार्गदर्शन लाभले.या उपक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य,सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## वाढदिवसानिमित्त अशोकाच्या ५० वृक्षांची लागवड



**आसेगाव पूर्णा**-टाकरखेडा पूर्णा येथील नारायण विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद पु. नवले यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त बुधवारी ५० अशोकाच्या वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी संदेश दिला. विद्यार्थ्यांमध्ये वृक्षसंवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी आणि पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून द्यावे.

या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या वृक्षारोपण कार्यक्रमात शाळा समितीच्या सल्लागार सदस्या उमा वानखडे, सुधीर प्रजापती, मोहन रघुवंशी,छोटेलालजी कैथवास, राजेंद्र कैथवास, सादिर्क, जया भोनखडे,सतीश पवार, जिल्हा परिषद मुख्याध्यापिका काकडे, पवार,मालवे, शिरभाते, श्रद्धा, सुशील वानखडे व संदीप देवळे यांच्यासह शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

सर्वांच्या सहकार्याने वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# अकोल्यात दोन गुटखा निर्मिती कारखान्यांवर धडक कारवाई

## १ कोटींहून अधिकचा मुद्देमाल जप्त, -गुटखा माफियांना मोठा आर्थिक फटका

### एलसीबी, एमआयडीसी पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाची संयुक्त मोहीम





**अकोला /प्रतिनिधीः-:** अकोला शहरातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुरू असलेल्या प्रतिबंधित गुटखा व पान मसाला निर्मिती कारखान्यांवर स्थानिक गुन्हे शाखा, एमआयडीसी पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाने संयुक्त धाड टाकून मोठी कारवाई केली. दोन्ही कारवायांमध्ये मिळून १ कोटी रुपयांहून अधिक किमतीचा प्रतिबंधित गुटखा, कच्चा माल, अत्याधुनिक यंत्रसामग्री, पॅकिंग साहित्य आणि तयार माल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुटखा माफियांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

पहिल्या कारवाईत पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे एमआयडीसी फेज-२ परिसरातील अभिषेक गजानन गई यांच्या मालकीच्या गोदामावर छापा टाकण्यात आला. येथे गौरव शर्मा याच्या माध्यमातून प्रतिबंधित गुटखा तयार करून विक्री केली जात असल्याचे निष्पन्न झाले. कारवाईदरम्यान अशोक केदारनाथ शर्मा (वय ६०) आणि अजय लक्ष्मण जुंजाळेकर (वय २४) यांना ताब्यात घेण्यात आले.

या कारवाईत सुपारी ग्राइंडर, केमिकल मिक्सर, पॅकिंग व सीलिंग मशिन्स, ट्रे ड्रायर, एअर कॉम्प्रेसर, पाउच प्रिंटिंग मशीन, कृत्रिम फ्लेवर्स, ग्लिसरीन, मॅग्नेशियम कार्बोनेट, सुपारी, कथ्था, मेंथॉल, तंबाखू, विविध ब्रँडचे पॅकिंग साहित्य आणि तयार गुटखा असा ५० लाख ७२ हजार ५६४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याच दिवशी एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एमआयडीसी क्रमांक ४ परिसरातील आणखी एका गुटखा निर्मिती कारखान्यावर अन्न व औषध प्रशासन आणि एमआयडीसी पोलिसांनी संयुक्त धाड टाकली. या कारवाईतही ५० लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीचा प्रतिबंधित गुटखा, कच्चा माल, उत्पादन साहित्य आणि तयार माल जप्त करण्यात आला.

अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त देवानंद वीर यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित कारखाना गौरव शर्मा चालवत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. त्याच्याविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्याच्यावर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याचाही विचार सुरू आहे.

या दोन्ही कारवायांमुळे जिल्ह्यातील अवैध गुटखा निर्मिती व वितरण साखळीचा मोठा भाग उघडकीस येण्याची शक्यता असून, या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, (पान २ वर)

# मनपा प्रशासनाला अजून किती बालिकांचे लचके हवेत?

## नगरसेवक अनिल अग्रवाल यांचा संतप्त सवाल





**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक रुख्मिणीनगर भागातील साई हॉस्पिटलजवळ अवघ्या १० वर्षांच्या एका निरागस बालिकेवर भटक्या कुत्र्याने अत्यंत भीषण हल्ला केला. या भटक्या श्वानाने बालिकेच्या चेहऱ्याचे अक्षरशः लचके तोडून तिला मरणप्राय यातना दिल्या आहेत. या भयंकर घटनेमुळे संपूर्ण अमरावती शहरात प्रचंड संतापाचा डोंब उसळला असून, या श्वान हल्ल्याला अमरावती महानगरपालिका प्रशासनच जबाबदार असल्याची टीका नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी केली आहे.

एका खाजगी गाडीवर चालक म्हणून काम करणाऱ्या सचिन कावरे यांची १० वर्षांची मुलगी सनिदी हिच्यावर हा भीषण प्रसंग ओढवला. रुख्मिणीनगर परिसरात सनिदीच्या चेहऱ्याचे भटक्या कुत्र्याने भयंकर लचके तोडले. या कोवळ्या वयातील चिमुरडीला त्या हिंस्त्र श्वानासमोर स्वतःचा (पान २ वर)

# मालकाची हत्या करून मृतदेहासह ट्रक जाळला

## चिखलसावंगी शिवारातील घटना



**मोर्शी/प्रतिनिधीः-** नजीकच्या चिखलसावंगी येथील प्रवासी निवाऱ्याजवळ एक जळत असलेला ट्रक आढळला. आग विझविल्यानंतर त्यात चालकाचाही जळालेला मृतदेह आढळून आला. यावरून चालकाची हत्या करून मृतदेह ट्रकसह जाळण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मोर्शी पोलिस स्टेशनच्या हद्दीतील चिखलसावंगी येथील प्रवासी निवाऱ्याजवळ बुधवारी, १५ जुलैला रात्री अकरा वाजताच्या सुमारास उभा असलेल्या एका ट्रकची केबिन जळत असल्याची माहिती ११२ क्रमांकावर मोर्शी पोलिसांना मिळाली होती. मोर्शी पोलिसांनी घटनास्थळावर जाऊन अग्निशामक विभागाच्या गाडीच्या मदतीने ट्रकची आग विझविली. मात्र, गुरुवारी सकाळी त्या ट्रकमधून दुर्गंध येत असल्यामुळे पुन्हा मोर्शी पोलिसांना माहिती देण्यात आली. जळालेल्या ट्रकची पोलिसांनी पाहणी केली असता ट्रकच्या केबिनच्या आत पूर्णपणे जळालेला मृतदेह आढळून आला. याबाबतची माहिती चंद्रपूर येथील ट्रक मालकाला पोलिसांनी बुधवारी रात्रीच दिली होती. वृत्तलिहीपर्यंत पोलिसात तक्रार दाखल करण्याचे काम सुरू होते. अधिक तपास मोर्शी पोलिस करीत आहे.

ट्रक मालकाचे नातेवाईक गुरुवारी सकाळी मोर्शी (पान २ वर)

# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा



**अमरावती/प्रतिनिधीः-** : पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे शुक्रवार, दि. १७ जुलै, रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.दौऱ्यानुसार पालकमंत्री बावनकुळे हे सकाळी १० वाजता मोटारीने नागपूर येथून अमरावतीकडे प्रयाण करतील. दुपारी १२ वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. दुपारी ४.३० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा नियोजन समितीव्दारा (पान २ वर)

# नोकरी लावण्याच्या नावावर महिलेवर अत्याचार

## अकोल्यातील नराधमावर गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** नोकरी लावून देण्याचे आणि लग्न करण्याचे आमिष दाखवून एका ४१ वर्षीय महिलेवर ३ वर्षे लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित महिलेने याप्रकरणी तक्रार दाखल केली. दर्यापूर पोलिसांनी तक्रारीच्या आधारे आरोपी प्रतापसिंह श्रीराम झाकर्डे (वय ४५,अकोला) याच्या विरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे. माहिती नुसार, पीडित महिलेने नागपूर येथील हिंगणा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून आरोप केला की, ती नोकरीच्या शोधात होती. याच दरम्यान २०२२ च्या नोव्हेंबर महिन्यात प्रतापसिंह (पान २ वर)

# अमरावती शहरात २४ जुलैपासून हेल्मेट सक्ती

**शहर पोलिसांनी काढली अधिसूचना**



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात दुचाकीस्वारांना २४ जुलैपासून हेल्मेट वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. या संदर्भातील अधिसूचना आज गुरुवारी काढण्यात आली. वाहतूक नियमांचे पालन आणि नागरिकांच्या प्राणांचे रक्षण करणे ही पोलिस प्रशासनाची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे पोलिस विभागाने स्पष्ट केले आहे. अमरावती पोलिस आयुक्तालय हद्दीत २०२४ मध्ये एकूण ४५४ अपघात झाले. २०२५ मध्ये एकूण ४१७ अपघात झाले तर १ जानेवारी ते ३० जून २०२६ पर्यंत २१० अपघात झाले आहेत. एकूण अपघातांपैकी सुमारे ६० टक्के अपघात मोटारसायकलचालकांचे होतात. मोटारसायकल अपघातांमध्ये दुचाकी स्वारांचा मृत्यू हा डोक्यात हेल्मेट नसल्यामुळे होतो, हे अभ्यासाअंती स्पष्ट झाले आहे.

मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम १२९ (सुधारित कायदा २०१९) नुसार सर्व दुचाकीचालक आणि त्यांच्या मागे बसणाऱ्या व्यक्तीला आय.एस.आय. मार्क असलेले हेल्मेट वापरणे कायद्याने बंधनकारक आहे. दुचाकी वाहन अपघातामध्ये वाढलेले मृत्यूचे प्रमाण कमी (पान २ वर)

# सानुग्रह अनुदानासाठी प्रकल्पग्रस्तांचा नागपूरच्या सिंचन भवनावर मोर्चा

## हेक्टरी पाच लाखांचे अनुदान तातडीने वितरित करण्याची मागणी



### विविध प्रकल्पांतील प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चेचे आश्वासन

**आसेगाव पूर्णा/प्रतिनिधीः-** विदर्भातील सरळ खरेदी धारक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मंजूर करण्यात आलेले हेक्टरी पाच लाख रुपये सानुग्रह अनुदान अद्यापही अनेक प्रकल्पग्रस्तांच्या खात्यावर जमा झाले नाही. त्यामुळे याच्या निषेधार्थ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या शेकडो कार्यकर्त्यांनी गुरुवारी नागपूर येथील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या सेवा सिंचन (पान २ वर)

# विद्यार्थ्यांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी शासनाला अल्टीमेटम

## -एबीव्हीपीची पत्रकार परिषदेत माहिती




**अमरावती/प्रतिनिधीः-** अखिल भारतीय विद्यार्थी परिषदच्या वतीने राज्यातील विद्यार्थ्यांशी संबंधित प्रलंबित शैक्षणिक आणि इतर मुद्द्यांबाबत विविध विभागांच्या मंत्र्यांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. याची माहिती एबीव्हीपीच्या विदर्भ क्षेत्रीय कार्यालय मंत्री महेश डोकरिमारे यांनी आज गुरुवार १६ जुलै रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. त्यांनी सांगितले की विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आंबिटकर, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अण्णा सावे, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्यासह विविध मंत्र्यांना विभागनिहाय निवेदन दिले. त्यांच्याशी भेट करून चर्चाही केली.

विद्यापीठाच्या परीक्षा आणि निकाल वेळेवर जाहीर करणे, सीईटी प्रवेश प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी दूर करणे, शिष्यवृत्तीचे वेळेवर वितरण, खाजगी विद्यापीठांच्या फीवर नियंत्रण, रिक्त प्राध्यापक पदे भरणे, राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी. शिक्षक भरती लवकर पूर्ण करणे, (पान २ वर)

# अमरावती ग्रामीणमध्ये अपघातांचे प्रमाण घटले

**-हेल्मेट न वापरणे ठरत आहे मृत्यूचे प्रमुख कारण**

**-४८ प्राणांतिक अपघातांत ५४ जणांचा मृत्य**



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात यंदाच्या वर्षी प्राणांतिक रस्ते अपघातांमध्ये घट झाली असली, तरी दुचाकीस्वारांकडून हेल्मेटचा वापर न केल्यामुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण चिंताजनक असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी नागरिकांना हेल्मेटचा वापर आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

जिल्हा वाहतूक शाखेने दिलेल्या माहितीनुसार, १ मे ते १५ जुलै २०२६ या कालावधीत अमरावती ग्रामीण जिल्ह्यात ४८ प्राणांतिक अपघात झाले असून त्यामध्ये ५४ जणांचा मृत्यू झाला आहे. याच कालावधीत २०२५ मध्ये ६४ प्राणांतिक अपघातांमध्ये ७० जणांचा मृत्यू झाला होता. यंदा अपघातांच्या संख्येत १६ ने, तर मृत्यूच्या संख्येतही १६ ने घट झाली आहे.

मात्र, या कालावधीतील बहुतांश अपघात हे दुचाकीस्वारांचे असून, अपघातावेळी हेल्मेट न घातल्यामुळे डोक्याला गंभीर दुखापत होऊन मृत्यू झाल्याचे आकडे (पान २ वर)

# सिंधुताई जळमकर यांचे निधन



दर्यापूर : प्रकाश एम्पोरियम चे संचालक दीपक उर्फ बाळाभाऊ जळमकर यांच्या मातोश्री सिंधुताई रामचंद्र जळमकर यांचे आज गुरुवार दिनांक १६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५:३० ला दुखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८८ वर्षे होते. त्यांच्या पाठीमागे तीन मुलं,सुना, नातू पणतू असा मोठा आप्त परवार असून त्यांची अंत्ययात्रा १७ जुलै सकाळी ११ वाजता शिवाजीनगर त्यांच्या निवासस्थानापासून निघणार आहे. ती अंतयात्रा आशा मनीषा चंद्रभागा नदीच्या तिरास वरील मोक्षधाम येथे जाऊन तिथे अग्नी देण्यात येणार आहे अशी माहिती आयडियल कॉम्प्युटरचे संचालक राजू पाटील उगले यांनी दिली. ग्राम विस्तार अधिकारी राजूभाऊ उगले यांच्या त्या मावशी होत्या.

# ऐतिहासिक निर्णय : महानगरपालिकेचा वर्धापन दिन दरवर्षी साजरा होणार

## सभागृह नेता तथा माजी महापौर चेतन गावंडे यांचा ठराव सर्वानुमते मंजूर



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या इतिहासात आज एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय नोंदविण्यात आला. महानगरपालिकेचा वर्धापन दिन दरवर्षी अधिकृतरीत्या साजरा करण्यात यावा, हा सभागृह नेता तथा माजी महापौर चेतन गावंडे यांनी मांडलेला ठराव अमरावती महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ठराव मांडताना गावंडे यांनी सांगितले की, अमरावती महानगरपालिका ही शहराच्या विकासाची प्रमुख संस्था असून, तिच्या स्थापनेपासून अनेक लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिले आहे. या गौरवशाली प्रवासाचे स्मरण राहावे, नागरिकांमध्ये शहराबद्दल अभिमानाची भावना निर्माण व्हावी आणि महानगरपालिकेचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने वर्धापन दिन साजरा करणे आवश्यक आहे.

यावेळी त्यांनी वर्धापन दिनानिमित्त विविध विकासकामांचे लोकार्पण, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, गुणवंत विद्यार्थी व उत्कृष्ट कर्मचारी (पान २ वर)

# विशेष लोकअदालत १८ जुलै रोजी

**अमरावती/प्रतिनिधीः-** न्यायप्रक्रियेत सामान्य नागरिकांचा सहभाग वाढवून 'न्याय आपल्या दारी' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती यांच्या वतीने शनिवार, दिनांक १८ जुलै २०२६ रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार आयोजित या लोकअदालतीमध्ये परकाम्य संलेख अधिनियम, कलम १३८ (N.I. Act १३८ - चेक बाऊन्स प्रकरणे) अंतर्गत न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा तडजोडीने निपटारा केला जाणार आहे. दीर्घकाळ चालणाऱ्या न्यायालयीन प्रक्रियेतून पक्षकारांना वेळेत दिलासा मिळावा आणि परस्पर संमतीने व सलोख्याने हे वाद तात्काळ मिटवता यावेत, हा या विशेष (पान २ वर)

# श्री हव्याप्र मंडळाची आशियाई जलतरण स्पर्धेत तिरंगी झेप

## तीन जलतरणपटूंची भारतीय संघात निवड



**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरण विभागाने आणखी एक ऐतिहासिक यश आपल्या नावावर नोंदवत अमरावतीच्या क्रीडा क्षेत्राचा मान उंचावला आहे. थायलंडमधील बँकॉक येथे १५ ते २५ जुलै २०२६ या कालावधीत होणाऱ्या १२व्या एशियन एज ग्रुप वॉटर पोलो चॅम्पियनशिपसाठी मंडळाच्या स्वर्णिम मिलिंद चेपे, मंथन लोमहर्ष मंथन आणि शौर्य अमित गुप्ता या तीन गुणवान जलतरणपटूंची भारतीय संघात निवड झाली आहे. या निवडीमुळे संपूर्ण विदर्भासह अमरावतीच्या क्रीडा विश्वात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ हे देशातील जलतरण आणि (पान २ वर)